K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD-Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.A

Subject:- Micro Economics (S1-II)

सूक्ष्म अर्थशास्त्र (S1) SEM IV

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

घटक :- Unit No 3 घटक किमती

उपघटक :- विभाजनाचा किंवा वाटणीचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त ,

खंड : अर्थ, रिकार्डोचा खंड सिद्धान्त, खंडाचा आधुनिक सिद्धान्त,आभास खंडाची संकल्पना

व्याज : अर्थ, व्याजाचा कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्त, व्याजाचा रोखता पसती सिद्धान्त, नफा : अर्थ, नफ्याचा धोका आणि अनिश्चितता सिद्धान्त, नफ्याचा सिद्धान्त

Unit No. 3

घटक किमती

FACTOR PRICING

3.1 विभाजनाचा किंवा वाटणीचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त

Marginal Productivity Theory of Distribution

3.2 खंड : अर्थ, रिकार्डोचा खंड सिद्धान्त, खंडाचा आधुनिक सिद्धान्त,आभास खंडाची संकल्पना

Rent : Meaning, Ricardian Theory of Rent, Modern Theory of Rent, Concept of Quasi Rent

3.3 मजुरी/वेतन

Wages

3.3.1 मजुरी/वेतन : अर्थ आणि प्रकार

Meaning and Types of Wages

(a) किमान/ न्यूनतम वेतन

Minimum Wages

(b) पैशातील/चलनी/मौद्रिक/नाममात्र वेतन

Money Wages

(c) वास्तविक/वास्तव वेतन

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

Real Wages

(d) निर्वाह वेतन

Subsistence Wages

(e) योग्य/वाजवी/रास्त/न्याय वेतन/ मजुरी

Fair Wages

3.3.2 श्रमाचा पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र

Backward Bending Supply Curve of Labour

3.3.3 वेतन निर्धारणात सामुदायिक सौदाशक्तीची भूमिका

Role of Collective Bargaining in Wage Determination

3.4 व्याज : अर्थ, व्याजाचा कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्त, व्याजाचा रोखता पसती सिद्धान्त

Interest : Meaning, Loanable Fund Theory, Liquidity Preference Theory

3.5 नफा : अर्थ, नफ्याचा धोका आणि अनिश्चितता सिद्धान्त, नफ्याचा गतिशीलता सिद्धान्त, नफ्याचा नवप्रवर्तन सिद्धान्त

Profit : Meaning, Risk and Uncertainty Theory of Profit, Dynamic Theory of Profit, Innovation Theory of Profit

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

प्रास्ताविक

अर्थशास्त्रीय विश्लेषणात उत्पादनाबरोबरच उत्पन्नाच्या वाटणीला विशेष महत्त्व अग्यः उत्पादन प्रक्रियेत जमीनदार, श्रमिक, भांडवलदार आणि संयोजक भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन कौशल्य या उत्पादन घटकांचा पुरवठा करतात. उत्पादन प्रक्रियेत सहभाग, झाल्याबद्दल उत्पादन घटक मालकांना खंड, मजुरी, व्याज आणि नफा हे घटक मोबदः प्राप्त होतात. वस्तू आणि सेवांच्या किमती ज्याप्रमाणे वस्तू व सेवांच्या मागणी पुरवठ्याच अनुरोधाने ठरतात; त्याचप्रमाणे उत्पादन घटकांच्या किमतीसुद्धा उत्पादन घटकांच्या मागणी पुरवठ्यानुसार ठरतात. उत्पादन घटकांच्या किमतीवर वस्तूंच्या किमतीचा आणि वस्तु । सेवाच्या किंमतीवर उत्पादन घटकांच्या किंमतीचा प्रभाव पडतो. वस्तूची मागणी प्रत्या असते तर उत्पादन घटकांची मागणी अप्रत्यक्ष असते.

3.1 विभाजनाचा किंवा वितरणाचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त

(Marginal Productivity Theory of Distribution)

उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रम, भूमी, भांडवल आणि संयोजक हे चार घटक सहभाग) होतात. त्यांच्या सहभागाबद्दल त्यांना घटक मोबदले द्यावे लागतात. हे मोबदले कोणत्या तत्त्वानुसार द्यायचे हा मूलभूत प्रश्न आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप कार्यानुसार झाले पाहिजे, "उत्पादनाच्या प्रत्येक घटकाला त्याच्या सीमांत उत्पादकतेएवढा मोबदला द्यावा" विभाजनाचे मूळ तत्त्व आहे. या तत्त्वावर हा सिद्धान्त आधारलेला आहे. म्हणून ने सिद्धान्ताला "विभाजनाचा सर्वसाधारण सिद्धान्त किंवा विभाजनाचा सीमांत उत्पादकत सिद्धान्त असे म्हणतात."

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सुरुवातीला हा सिद्धान्त सर एडवर्ड वेस्ट आणि डेव्हिड रिकार्डो यांनी मांडला. २ सिद्धान्ताचा विकास जेव्हान्स, विस्टिड, डॉ. मार्शल, जे. बी. क्लार्क, जे. आर. हिर वॉलरस इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेला आहे. श्रीमती जोन रॉबिन्सन यांनी या सिद्धान्ताच विस्तार केला.

सिद्धान्ताचे विधान

"उत्पादनाच्या विशिष्ट परिस्थितीत प्रत्येक उत्पादन घटकाचा मोबदला हा त्यात्या उत्पादन घटकाच्या सीमांत उत्पादकतेबरोबर असतो."

सीमांत उत्पादकतेचा अर्थ

"इतर घटक स्थिर ठेवून एका घटकाच्या परिणामात एका मात्रेने वाढ केली असता एकूण उत्पादनात जी शुद्ध भर पडते तिला त्या घटकाची सीमांत उत्पादकता असे म्हणतात."

उदाहरणार्थ, 1 मजूर 6 नगांचे उत्पादन करतो. दुसरा मजूर कामावर घेतल्यास 11 नगांचे उत्पादन होते. या उदाहरणात मजूर संख्येत 1 मात्रेने वाढ केल्यास एकूण उत्पादनात 5 नगांनी वाढ होते. दुसऱ्या मजुराची सीमांत उत्पादकता 5 नग येते.

सीमांत उत्पादकतेचे प्रकार

सीमांत उत्पादकतेचे पुढील दोन प्रकार पडतात.

(1) सीमांत वास्तव उत्पादकता :

उत्पादन घटकाच्या शेवटच्या मात्रेमुळे वस्तूच्या स्वरूपात एकूण उत्पादनात होणारी निव्वळ वाढ म्हणजे सीमांत वास्तव उत्पादकता होय.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

उदा., 1 श्रमिक 6 मीटर कापड उत्पादन करतो. दुसरा श्रमिक कामावर नेमल्यास 11 मीटर कापडाचे उत्पादन होते. यावरून असे म्हणता येते की, दुसऱ्या श्रमिकाची सीमांत उत्पादकता 5 मीटर कापड आहे.

(2) सीमांत प्राप्ती उत्पादकता :

उत्पादन घटकाच्या शेवटच्या मात्रेमुळे एकूण प्राप्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे सीमांत प्राप्ती उत्पादकता होय. संयोजकाच्या दृष्टीने वास्तव सीमांत उत्पादकतेपेक्षा सीमांत प्राप्ती उत्पादकता जास्त महत्त्वाची असते.

सीमांत प्राप्ती उत्पादकता मापनाचे सूत्र

सीमांत प्राप्ती उत्पादकता = घटकांची सीमांत वास्तव उत्पादकता X वस्तूची किंमत

उदा, एक मीटर कापडाची किंमत ₹ 20 प्रतिमीटर आहे. पहिला श्रमिक 6 मीटर कापडाची निर्मिती करतो त्यामुळे प्राप्ती ₹ 120 होईल. (6 मीटर कापड X ₹ 20) दुसरा श्रमिक कामावर घेतल्यास कापडाच्या एकूण उत्पादनात 5 मीटरने वाढ होते म्हणजे कापडाचे एकूण उत्पादन 11 मीटर होते. त्यामुळे एकूण प्राप्ती र 220 (11 मीटर X ₹ 20) होते व सीमांत प्राप्ती उत्पादकता 5 मीटर x ₹ 20 = ₹ 100 होते किंवा ₹ 220 ₹ 120 ₹ 100 होईल.

संयोजक श्रम, भूमी, भांडवल या तीन घटकांना एकत्र करून उत्पादन करतो. पाटनमाणील मुख्य उद्देश महत्तम नफा मिळविणे हा असतो. त्यामुळे संयोजक उत्पादन ₹ M घटकांना कामावर घेताना त्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता व त्या उत्पादन घटकाला दिला जाणारा मोबदला यांची तुलना करतो. त्याकरिता संयोजक

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता व घटकाला द्यावा लागणारा मोबदला समान होईल एवढेच घटक कामावर घेतो. समजा उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता जास्त व उत्पादन घटकाला दिला जाणारा मोबदला कमी आहे तेव्हा संयोजकास नफा होतो व संयोजक उत्पादन घटकाची मागणी वाढवितो. उत्पादन घटकाचा पुरवठा वाढल्यास सीमांत उत्पादकतेत घट होते. जेथे घटकाची सीमांत उत्पादकता = घटक मोबदला होतो तेथे संयोजक त्या उत्पादन घटकाची मागणी थांबवितो. त्यापुढे उत्पादन घटक कामावर घेतल्यास घटकाची सीमांत उत्पादकता कमी व उत्पादन घटकाला दिला जाणारा मोबदला जास्त होईल. त्यामुळे संयोजकाला तोटा होईल.

सीमांत उत्पादकता सिद्धान्ताची गृहीते

1. वस्तू बाजार व घटक बाजारात पूर्ण स्पर्धा आहे.

2. अर्थव्यवस्था स्थैतिक आहे.

3. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झालेला आहे.

4. बाजारपेठेत किंमतनिश्चितीत सरकारचा हस्तक्षेप नाही.

5. सीमांत उत्पादकतेचे मापन करता येते.

6. उत्पादनाचे सर्व घटक एकजिनसी आहेत.

7. उत्पादन घटक पूर्णपणे गतिशील आहेत.

8. उत्पादन घटक विविध उपयोगी आहेत.

9. उत्पादन घटक एकमेकांना पर्यायी वापरता येतात.

10. उत्पादन घटकाचा पुरवठा वाढल्यास सीमांत उत्पादकता घटते,

11. श्रमिक व संयोजक यांची सौदाशक्ती समान आहे.

12. उत्पादन तंत्र व घटकांची कार्यक्षमता स्थिर आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

13. या सिद्धान्ताचे विवेचन दीर्घकाळात लागू पडते.

14. संयोजकाचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो.

15. एका घटकाची सीमांत उत्पादकता मोजण्यासाठी इतर घटक स्थिर आहेत व एका घटकाचे परिणाम वाढविता येते असे गृहीत मानण्यात आले आहे.

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण : सीमांत उत्पादकता सिद्धान्त पुढील उदाहरणाद्वारे स्पष्ट करता येतो.

उत्पादन घटकांच्या मात्रा (श्रमिक)	सीमांत उत्पादकता (₹)	मजुरी (₹)
1	120	80
2	100	80
3	80	80
4	60	80
5	40	80
6	20	80

वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे उत्पादन घटकाची पहिली मात्रा उपयोगात आणल्यानंतर सीमांत उत्पादकता ₹ 120 आहे. परंतु घटकाचा मोबदला मात्र कमी म्हणजे ₹ 80 आहे. त्यामुळे संयोजक उत्पादन घटकाची दुसरी मात्रा उपयोगात आणतो. दुसऱ्या मात्रेमुळे एकूण उत्पादनात 100 रुपयांची, तिसऱ्या मात्रेमुळे 80 रुपयांची, चौथ्या मात्रेमुळे 60 रुपयांची, पाचव्या मात्रेमुळे 40 रुपयांची व सहाव्या मात्रेमुळे 20 रुपयांची भर पडते. येथे संयोजक केवळ 3 श्रमिक मात्रांची मागणी करेल कारण उत्पादनाच्या तिसऱ्या श्रमिक मात्रेची सीमांत उत्पादकता व घटक मोबदला दोन्ही ₹ 80 म्हणजे समान आहे. संयोजकाने चौथी, पाचवी व सहावी मात्रा उपयोगात आणली

HRM Micro E S.Y.B.A.

तर संयोजकाला अनुक्रमे ₹ 20, ₹ 40 आणि ₹ 60 तोटा होतो. म्हणून संयोजक फक्त तीन श्रमिक मात्रांचीच मागणी करतो.

नियमाचे आकृतीद्वारे स्पष्टीकरण :



आकृती क्र. 3.1 मध्ये x अक्षावर उत्पादन घटकांच्या मात्रा आणि Y अक्षावर उत्पादन घटकांचा मोबदला आणि सीमांत उत्पादकता रुपयांमध्ये दर्शविली आहे. सी.उ. (MP) हा सीमांत उत्पादकतेचा वक्र आहे. तो ऋणात्मक आकाराचा आहे. पहिल्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता ₹ 120 आहे. दुसऱ्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता ₹ 100 आहे. तिसऱ्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता ₹ 80 आहे. चौथ्या, पाचव्या व सहाव्या मात्रेची सीमांत उत्पादकता अनुक्रमे र 60, ₹ 40, ₹ 20 आहे.

सीमांत उत्पादकता व मोबदला ज्या ठिकाणी समान होईल तेवढ्याच मात्रेची मागणी संयोजक करतो. सीमांत उत्पादकता वक्रावरील 'C' बिंदूच्या ठिकाणी सीमांत उत्पादकता व घटकाचा मोबदला ₹ 80 एवढा समान झालेला आहे. त्यामुळे संयोजक उत्पादन घटकाच्या तीन मात्रा उपयोगात आणतो. तीनपेक्षा जास्त मात्रा उपयोगात आणल्यास संयोजकाला तोटा होतो. तसेच तीनपेक्षा कमी मात्रा उपयोगात आणल्यास संयोजकाला महत्तम नफा प्राप्त होत नाही. अशा प्रकारे संयोजक उत्पादन घटकांना त्याच्या सीमांत उत्पादकतेएवढाच मोबदला देत असतो. सी.उ. (MP) वक्रावरील a, b, c, d, e व f हे बिंदू अनुक्रमे ₹ 120, ₹ 100, ₹ 80, ₹ 60, ₹ 40 व ₹ 20 सीमांत उत्पादकता व उत्पादन घटकाच्या 1 ते 6 मात्रा यांची संयुगी दर्शवितात.

डॉ. मार्शल यांचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त

डॉ. मार्शल यांनी आपल्या सीमांत उत्पादकता सिद्धान्तांची मांडणी तीन भागांत केलेली आहे.

1. प्रत्येक घटकाची किंमत त्या घटकाच्या सीमांत उत्पादकतेच्या मूल्याबरोबर असते.

2. प्रत्येक घटकाची सीमांत उत्पादकता समान असते.

3. प्रत्येक घटकाची सीमांत उत्पादकता त्याच व्यवसायातील इतर घटकांच्या सीमांत उत्पादकतेबरोबर असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

या सिद्धान्तानुसार उत्पादनाच्या प्रत्येक घटकाला त्याच्या सीमांत उत्पादकतेएवढा मोबदला मिळतो. जर एखाद्या घटकाला त्याच्या सीमांत उत्पादकतेपेक्षा कमी मोबदला मिळाला तर त्या ठिकाणाहून तो उत्पादन घटक स्थलांतरित होतो व जेथे सीमांत उत्पादकतेएवढा मोबदला मिळतो तेथे काम करणे पसंत करतो. त्यामुळे सर्व उत्पादन घटकांच्या बाबतीत त्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता व घटक मोबदला यांचे गुणोत्तर समान होते. डॉ. मार्शल यांनी सूत्र रूपाने ही संकल्पना पुढीलप्रमाणे मांडलेली आहे.

$$\frac{\text{श्रमाची सीमांत उत्पादकता}}{\text{मजुरी}} = \frac{\text{भांडवलाची सीमांत उत्पादकता}}{\text{व्याज}} = \frac{\text{भूमीची सीमांत उत्पादकता}}{\text{खंड}}$$

श्रमाची सीमांत उत्पादकता भांडवलाची सीमांत उत्पादकता भूमीची सीमांत उत्पादकता मजुरी डॉ. मार्शल यांच्या मते दीर्घकाळात पूर्ण स्पर्धेत उत्पादनाच्या प्रत्येक घटकाला मिळणारा मोबदला हा त्या घटकाच्या सरासरी व सीमांत व्याज खंड उत्पादकतेबरोबर असतो.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण : पुढील आकृती क्र. 3.2 मध्ये X अक्षावर उत्पादन घटकाच्या मात्रा (श्रमिक संख्या) व Y अक्षावर सीमांत उत्पादकता व मजुरी दर दर्शविलेला आहे. PP, P_1P_1 व P_2P_2 हे सरासरी मजुरी व सीमांत मजुरीचे वक्र आहेत तर ARP व MRP हे वक्र अनुक्रमे सरासरी प्राप्ती उत्पादकता व सीमांत प्राप्ती उत्पादकतेचे वक्र आहे. हे वक्र प्रारंभी धनात्मक व नंतर ऋणात्मक उताराचे काढलेले आहेत.

HRM Micro Economics S.Y.B.A.

सरासरी प्राप्ती उत्पादकता व सीमांत प्राप्ती उत्पादकता यांचा समतोल A बिंदूत होऊन श्रम बाजारात OP मजुरी निश्चित होते. अशा वेळी OQ एवढी श्रम या घटकाची मागणी व तेवढाच पुरवठा असतो. जर मजुरीचा दर OP_1 एवढा होईल तर A_1 बिंदूच्या ठिकाणी सीमांत प्राप्ती उत्पादकता व मजुरी समान होते.

परंतु हे संतुलन स्थिर राहू शकत नाही. कारण OQ_1रोजगार पातळीला मजुरी OP_1 किंवा Q_1A_1 ठरते व सरासरी उत्पादकता Q_1B ठरते. मजुरीपेक्षा सरासरी उत्पादकता कमी असल्याने संयोजकास एका श्रमिकामागे A_1B इतका तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे संयोजकाला श्रम हा घटक इतर घटकांच्या तुलनेत महाग वाटेल व संयोजक श्रम या घटकाऐवजी इतर स्वस्त घटकांचे प्रतिस्थापन करेल. त्यामुळे श्रम या घटकांची मागणी कमी होऊन मजुरीचा दर OP1 वरून घटून OP एवढा राहतो. जर श्रमबाजारात मजुरीचा दर OP2 असेल तर तो A2 बिंदूत सीमांत उत्पादकतेबरोबर समान होईल. त्यामुळे श्रम या घटकाची मात्रा OQ वरून OQ2 पर्यंत वाढेल.

परंतु अशा स्थितीत OQ2 रोजगार पातळीला श्रमिकाची सरासरी प्राप्ती उत्पादकता सीमांत प्राप्ती उत्पादकतेपेक्षा जास्त असल्याने संयोजकाला अतिरिक्त लाभ मिळेल. श्रम हा घटक स्वस्त वाटू लागेल. त्यामुळे इतर महाग घटकाऐवजी श्रम या स्वस्त घटकाचा जास्त वापर वाढेल. परिणामतः मजुरीचा दर OP) वरून वाढून OP इतका होईल. अशा रीतीने पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात श्रमिकाला मिळणारा मोबदला हा त्याच्या सरासरी व सीमांत उत्पादकतेबरोबर असतो. श्रमाबाबत असणारे हेच विवेचन उत्पादनाच्या इतर घटकांना लागू होते असे मत डॉ. मार्शल यांनी व्यक्त केलेले आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.



आकृती क्र. 3.2

सीमांत उत्पादकता सिद्धान्तावरील टीका

सीमांत उत्पादकता सिद्धान्त अनेक गृहीतांवर आधारित असल्यामुळे या सिद्धान्तावर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी टीका केलेल्या आहेत. यातील काही प्रमुख टीका पुढीलप्रमाणे आहेत

(1) पूर्ण स्पर्धा : हा सिद्धान्त पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारलेला आहे. पण हे गृहीत वस्तुस्थितीशी विसंगत ठरते. आज जगात कोणत्याही राष्ट्रात पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ दिसून येत नाही. मात्र अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत उत्पादन घटकांच्या किंमती कशा ठरतात याचे विवेचन देण्यास हा सिद्धान्त असमर्थ आहे.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.

(2) स्थैतिक अर्थव्यवस्था : या सिद्धान्तात अर्थव्यवस्थेत कोणतेही बदल होत नाही असे चुकीचे गृहीत मान्य केलेले आहे. प्रत्यक्षात अर्थव्यवस्था गतिशील असते. या बाबीचा विचार सिद्धान्तात झालेला नाही.

(3) पूर्ण रोजगार : या सिद्धान्ताचा तिसरा दोष असा की, हा सिद्धान्त अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो असे गृहीत धरतो. प्रत्यक्षात कोणत्याही देशात आज पूर्ण रोजगार दिसून येत नाही. याउलट, प्रत्येक अर्थव्यवस्थेत बेकारीचा प्रश्न गंभीर होत आहे. बेकारीचे अस्तित्व असणाऱ्या अर्थव्यवस्थेत या सिद्धान्ताचा प्रत्यय येत नाही.

(4) सीमांत उत्पादकतेचे मापन : 'उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता मोजता येते,' हा या सिद्धान्ताचा आधार आहे. जेथे लहान प्रमाणावर उत्पादन केले जाते; तेथे ती मोजणे शक्य आहे पण ज्या उद्योगात हजारो कामगार काम करतात तेथे एखाद्या मजुराची सीमांत उत्पादकता मोजणे कठीण असते. टॉसिंग व डेव्हन पोर्ट या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, संयुक्त उत्पादन पद्धतीत कोणत्या एका घटकाची सीमांत उत्पादकता मोजणे जवळपास अशक्यच आहे.

(5) एकजिनसी किंवा एकरूप उत्पादन घटक : 'उत्पादन घटक एकरूप असतात' हे या सिद्धान्ताचे गृहीत बरोबर नाही. भूमी सुपीकतेच्या बाबतीत भिन्न असते, श्रमिकामध्ये कार्यक्षमतेच्या बाबतीत भिन्नता असते. संयोजकाच्या चातुर्यामध्ये भिन्नता आढळते. कालावधीनुसार भांडवलदारांना दिला जाणारा व्याजदर भिन्न असतो. परंतु या सिद्धान्तात हे सर्व घटक एकरूप असतात असे मानण्याची मोठी चूक झाली आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(6) उत्पादन घटकांची गतिशीलता : सीमांत उत्पादकता सिद्धान्तानुसार अर्थव्यवस्थेत उत्पादन घटक संपूर्ण गतिशील असतात. पण वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. उत्पादन घटकांची गतिशीलता त्याला मिळणाऱ्या मोबदल्यावर जशी अवलंबून असते तशीच ती भाषा, चालीरीती, रूढी-परंपरा यांसारख्या सामाजिक घटकांवरही अवलंबून असते. त्यामुळे 'उत्पादन घटक संपूर्ण गतिशील असतात' या म्हणण्यात सत्यता नाही.

(7) उत्पादन घटकांची विभाज्यकता : श्रमिक, संपूर्ण यंत्र, इमारत इत्यादी घटक अविभाज्य असताना सिद्धान्तात घटक पूर्णतः विभाज्य मानण्याची चूक झालेली आहे. उत्पादकाला उत्पादनात उत्पादनाच्या घटकाचे पाहिजे त्या प्रमाणात विभाजन करता येत नाही.

(8) उत्पादन घटकांची पर्यायता : श्रमाऐवजी भांडवलाचा उपयोग काही मर्यादेपर्यंतच करता येतो. परंतु श्रमाला भांडवल परिपूर्ण पर्याय नाही. या सिद्धान्ताने उत्पादन घटक एकमेकांना पूर्णपणे पर्यायी असतात असे गृहीत मानण्यात चूक केलेली आहे.

(9) स्थिर उत्पादन तंत्र : सीमांत उत्पादकता सिद्धान्तानुसार दीर्घकाळात उत्पादन तंत्र स्थिर असते. प्रत्यक्षात उत्पादक आपल्या उत्पादन तंत्रात बदल करून जास्तीत जास्त नफा कसा मिळेल याचा विचार करतो. त्यामुळे उत्पादन तंत्र स्थिर असते असे म्हणणे अयोग्य वाटते.

(10) अल्पकाळ : हा सिद्धान्त दीर्घकाळावर आधारित आहे. दीर्घकाळात उत्पादन घटकांचे मोबदले कसे ठरतात याचा विचार हा सिद्धान्त करतो. आधुनिक

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

अर्थशास्त्रज्ञांच्या मते अर्थशास्त्रज्ञातील सिद्धान्त हे अल्पकाळाचा विचार करणारे किंवा अल्पकाळात लागू पडणारे असावेत. कारण मानवी प्रश्न हे अल्पकालीन असतात; दीर्घकालीन नसतात. त्यामुळे दीर्घकाळापेक्षा अल्पकाळाचेच महत्त्व जीवनात जास्त असते. कारण केन्सच्या मते 'दीर्घकाळात आपण सर्वच मृत झालेले असतो.'

(11) एकांगी सिद्धान्त : सीमांत उत्पादकता सिद्धान्ताने फक्त उत्पादन घटकांच्या मागणीचा विचार केलेला आहे; परंतु उत्पादन घटकांच्या पुरवठ्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. उत्पादन घटकांचा मोबदला फक्त मागणीवरून ठरत नसून तो मागणी-पुरवठ्याच्या संतुलनाने ठरत असतो. म्हणून हा सिद्धान्त एकांगी आहे अशी टीका करण्यात येते.

(12) घटक मोबदला व सीमांत उत्पादकता परस्परसंबंध : या सिद्धान्तात सीमांत उत्पादकतेचा घटकाच्या मोबदल्यावर प्रभाव पडतो असा एकांगी विचार केलेला आहे. घटक मोबदल्याचाही सीमांत उत्पादकतेवर प्रभाव पडतो याचा विचार या सिद्धान्ताने केलेला नाही. उदा., श्रमाचा मोबदला जर जास्त असेल तर श्रमिकांचे राहणीमान उंचावते, त्यांची कार्यक्षमता वाढते व त्यामुळे सीमांत उत्पादकताही वाढते.

या सिद्धान्तावर वरील प्रकारच्या टीका केल्या जात असल्यातरी हा सिद्धान्त पूर्णपणे निरुपयोगी नाही. या सिद्धान्तात घटकांच्या मागणीची बाजू अत्यंत चांगल्या प्रकारे मांडलेली आहे. उत्पादन घटकांचे मोबदले ज्या घटकांवर अवलंबून असतात त्यांपैकी सीमांत उत्पादकता हा एक महत्त्वाचा घटक असतो, हे या सिद्धान्ताने स्पष्ट केलेले आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

3.2 खंड : अर्थ, रिकार्डोचा खंड सिद्धान्त, खंडाचा आधुनिक सिद्धान्त, आभास खंडाची संकल्पना

(Rent : Meaning, Ricardian Theory of Rent, Modern Theory of Rent, Concept of Quasi Rent)

खंड - अर्थ

(Meaning of Rent)

व्यवहारात 'खंड' हा शब्द भाटक किंवा भाडे या अर्थाने वापरला जातो. खंड कुळाने जमिनीच्या मालकाला जमिनीचा वापर करू दिल्याबद्दल दिलेला मोबदला, भाडेकरूने घरमालकास दिलेले भाडे या अर्थाने वापरले जाते. अर्थशास्त्रात खंड भूमीचा मोबदला या अर्थाने वापरला जातो. भूमी याचा अर्थ निसर्गदत्त संपत्ती होय. निसर्गाने मोफत दिलेल्या देणग्यांची मालकी ज्यांच्याकडे आहे त्यांना खंड हा मोबदला मिळतो.

खंड व्याख्या

- **"जमिनीच्या अंगी असलेल्या मूलभूत आणि अविनाशी गुणधर्माचा वापर करू दिल्याबद्दल जमीन मालकाला दिला जाणारा कृषी उत्पादनातील वाटा म्हणजे खंड होय."** डेव्हिड रिकार्डो

- **"भूमी किंवा निसर्गाकडून विनामूल्य मिळालेल्या देणगीबद्दल भूमीच्या मालकाला मिळणारे उत्पन्न म्हणजे खंड होय.'** डॉ. मार्शल

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

- **"उत्पादनाच्या संपादित नैसर्गिक घटकांच्या उपयोगातून उद्भवणारे अतिरिक्त उत्पादन म्हणजे खंड होय."** **- सिनियर**

वरील व्याख्यांवरूनं खंड हा मोबदला फक्त भूमी या घटकाशी निगडित आहे. भूमीची मालकी ज्यांच्याकडे आहे त्यांना भूमीचा वापर करू दिल्याबद्दल खंड हा मोबदला प्राप्त होतो. खंड हे अतिरिक्त उत्पादन किंवा वाढावा या स्वरूपाचा मोबदला आहे.

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी खंड ही संकल्पना वेगळ्या अर्थाने वापरली आहे.

- **“एखाद्या विशिष्ट उपयोगात एखादा घटक टिकून राहावा यासाठी त्याला जी किमान किंमत द्यावी लागते त्याला 'बदली उत्पन्न' असे म्हणतात. या बदली उत्पन्नावरील आधिक्य म्हणजे खंड होय."** **श्रीमती जोन रॉबिन्सन**

खंडाच्या आधुनिक दृष्टिकोनानुसार उत्पादनाच्या सर्वच घटकांना खंड हा मोबदला प्राप्त होतो. उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचीक झाल्यास खंड या स्वरूपात उत्पादन घटक मालकाला मोबदला मिळायला सुरुवात होते. आधुनिक दृष्टिकोनानुसार खंड हा वाढावा आहे. पुरवठ्याच्या अलवचीकतेमुळे खंड हा घटक मोबदला मिळायला सुरुवात होते. खंड हा घटक मोबदला भूमी विशिष्ट नसून तो उत्पादनाच्या कोणत्याही घटकाला प्राप्त होतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

रिकार्डोचा खंड सिद्धान्त (Ricardian Theory of Rent)

सुविख्यात सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकार्डो यांनी 'On the Principles of Political Economy and Taxation' या सुप्रसिद्ध ग्रंथातून एकोणिसाव्या शतकात सर्वप्रथम विस्तृतपणे खंडविषयक सिद्धान्त मांडला. रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धान्ताला परंपरागत किंवा सनातनवादी सिद्धान्त म्हटले जाते. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किमती सतत वाढत होत्या. खंड वाढला म्हणून अन्नधान्याच्या किमती वाढत आहेत असे स्पष्टीकरण त्या वेळी देण्यात आले. रिकार्डोला हे स्पष्टीकरण मान्य नव्हते. रिकार्डोच्या मते खंड वाढला म्हणून अन्नधान्याच्या किमती वाढल्या नाहीत तर अन्नधान्य महाग झाल्याने खंड निर्माण झाला. उच्च प्रतीच्या जमिनीला जास्त खंड आणि मध्यम प्रतीच्या जमिनीला कमी खंड का मिळतो याची संगती लावण्याच्या प्रयत्नातून रिकार्डोचा खंड सिद्धान्त उदयाला आला. रिकार्डोने आपल्या सिद्धान्तातून. खंडाची निर्मिती कशी होते, खंड व किंमत यांचा परस्परसंबंध काय आहे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

रिकार्डोच्या मते 'भूमी ही नैसर्गिक देणगी असल्यामुळे भूमीला उत्पादन व्यय नाही म्हणूनच खंड उत्पादन व्ययात समाविष्ट करता येत नाही. भूमीतील गुणभिन्नतेमुळे जास्त सुपीक जमिनीला कमी सुपीक जमिनीपेक्षा मिळणारे आधिक्य म्हणजे खंड होय.' रिकार्डोच्या मते सर्व जमीन सारखीच सुपीक नसते. त्यामुळे समान उत्पादन खर्च उच्च प्रतीच्या व मध्यम प्रतीच्या जमिनीत केल्यास मध्यम प्रतीच्या जमिनीच्या तुलनेत उच्च प्रतीच्या जमिनीतून जास्त उत्पादन होते. त्यामुळे मध्यम प्रतीच्या जमीन मालकाला उच्च प्रतीची जमीन कसण्यासाठी पाहिजे असल्यास खंड द्यावा लागेल. **हा खंड**

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

जमिनीच्या सुपीकतेतील फरकामुळे द्यावा लागतो म्हणून या खंडास 'गुणभेदजन्य वाढावा' असे म्हणतात.

खंडाची व्याख्या :

- **"जमिनीच्या उत्पादनातून जमिनीच्या मालकाला जमिनीच्या उपजत, मूलभूत आणि अविनाशी गुणधर्मांचा वापर करू दिल्याबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे खंड होय."** **- डेव्हिड रिकार्डो**

("Rent is that portion of the produce of the earth which is paid to the landlord for the use of the origional and idestructible powers of the soil." - David Ricardo)

वरील व्याख्येवरून खंड फक्त भूमीलाच मिळतो. खंड हा आधिक्य या स्वरूपाचा असतो. भूमीतील अविनाशी व मूलभूत द्रव्यांमुळे खंडाची निर्मिती होते हे स्पष्ट होते.

सिद्धान्ताची गृहीते:

1. भूमीचा पुरवठा मर्यादित आहे.

2. जमीन ही निसर्गनिर्मित देणगी आहे, त्यामुळे खंड फक्त भूमीलाच मिळतो.

3. जमिनीत मूलभूत व अविनाशी गुणधर्म आहेत.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

4. जमिनीच्या सुपीकतेत फरक असतो.

5. सुपीकतेतील फरकानुसार क्रमाक्रमाने जमीन लागवडीखाली येते.

6. जमिनीचा वापर फक्त अन्नधान्यांच्या पिकायाठी केला जातो.

7. सीमांत जमिनीला खंड मिळत नाही,

8. अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व आहे,

9. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराची परिस्थिती आहे.

10. उत्पादन तंत्र स्थिर आहे.

11. हा सिद्धान्त दीर्घकाळावर आधारलेला आहे.

12. शेतीक्षेत्रात घटत्या उत्पादन फलाचा नियम कार्यवाहीत असतो.

रिकार्डोच्या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण :

रिकार्डोच्या मते शेती दोन पद्धतीने केली जाते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(1) विस्तृत लागवड पद्धती (2) प्रकर्षित लागवड पद्धती.

रिकार्डोच्या मते विस्तृत आणि प्रकर्षित (सखोल) अशा दोन्ही लागवड पद्धतीत खंडाची निर्मिती होते.

(1) विस्तृत लागवड पद्धती आणि खंडाची मागणी : रिकार्डोच्या मते मानवाने सर्वात प्रथम विस्तृत लागवड पद्धतीने शेती केली. विस्तृत लागवड पद्धतीत श्रम व भांडवलाचे प्रमाण कायम ठेवून जमिनीच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केली जाते. अठराव्या शतकात लोकसंख्या विरळ होती. जमिनीचे प्रमाण मुबलक होते. अन्नधान्याची गरज भागविण्याकरिता मानवाने प्रथम नदीकाठची सुपीक जमीन कसायला सुरुवात केली. सुरुवातीला जमीन मुबलक उपलब्ध असल्याने खंड देण्याचा प्रश्न नव्हता. लोकसंख्या वाढल्याने ही जमीन पूर्णपणे लागवडीखाली आली. अन्नधान्याची मागणी वाढल्याने मध्यम प्रतीची जमीन लागवडीखाली आणण्यात आली. लोकसंख्या पुन्हा वाढल्याने मध्यम प्रतीची जमीनसुद्धा पुरेपूर वापरली गेली, लोकसंख्यावाढ व अन्नधान्याची मागणी वाढ यामुळे मध्यम प्रतीच्या जमिनीनंतर कनिष्ठ प्रतीच्या जमिनीवर लागवड करण्यात आली.

सुपीक किंवा उच्च प्रतीच्या जमिनीत ₹ 1000 खर्च केला तर 10 क्विंटल धान्य उत्पादित होते. तेवढ्याच आकारमानाच्या मध्यम प्रतीच्या जमिनीवर ₹ 1000 खर्च केल्यास 8 क्विंटल धान्य उत्पादित होते. जेव्हा उच्च व मध्यम प्रतीची जमीन लागवडीखाली आली तेव्हा मध्यम प्रतीची जमीन कसण्यासाठी मागितली जाणार नाही. मध्यम प्रतीची जमीन येथे

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सीमांत जमीन असून मध्यम प्रतीच्या जमीन मालकास जर उच्च प्रतीची जमीन कसण्यासाठी पाहिजे असल्यास उच्च प्रतीच्या जमीन मालकास मध्यम प्रतीच्या जमीन मालकाला दोन्ही जमिनीच्या उत्पादनातील फरकाएवढा खंड द्यावा लागेल. त्यामुळे उच्च प्रतीची जमीन मध्यम प्रतीच्या जमीन मालकास कसण्यासाठी पाहिजे असल्यास (10 क्विंटल - 8 क्विंटल 2 क्विंटल) उच्च प्रतीच्या जमीन मालकाला 2 क्विंटल एवढा खंड मिळेल. लोकसंख्यावाढ व अन्नधान्य मागणीवाढ यामुळे कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीसाठी वापरात आणली जाते. कनिष्ठ प्रतीच्या जमिनीत ₹ 1000 खर्च केल्यास 6 क्विंटल म्हणजे उत्पादन खर्चाएवढे उत्पादन होत असल्यास कनिष्ठ प्रतीच्या जमिनीस 'सीमांत जमीन किंवा खंडविरहित जमीन' असे संबोधले जाते. कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली आल्याने मध्यम प्रतीच्या जमीन मालकाला खंड मिळेल व तो मध्यम प्रतीच्या जमिनीतील उत्पादन व कनिष्ठ प्रतीच्या जमिनीतील उत्पादनातील फरकाएवढा (8 क्विंटल - 6 क्विंटल = 2 क्विंटल) म्हणजे 2 क्विंटल मिळेल. कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली असल्याने जर कनिष्ठ प्रतीच्या जमीन मालकाला उच्च प्रतीची जमीन कसण्यासाठी पाहिजे असल्यास उच्च प्रतीच्या जमीन मालकाला 4 क्विंटल एवढा खंड द्यावा लागेल. या ठिकाणी सीमांतपूर्व जमिनीला खंड प्राप्त होतो. सीमांत जमिनीला खंड मिळत नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण :

जमिनीचा प्रकार	लागवड खर्च (₹)	उत्पादन (क्विंटल)	खंड (क्विंटल)
उच्च प्रत	1000	10	4
मध्यम प्रत	1000	08	2
कनिष्ठ प्रत	1000	06	0

वरील तक्त्यावरून विस्तृत लागवड पद्धतीत खंड कसा मिळतो हे दर्शविले आहे. कनिष्ठ प्रतीची जमीन ही सीमांत जमीन आहे. या जमिनीवर ₹ 1000 खर्च केल्यास उत्पादन खर्च व उत्पादनाचे मूल्य समान होते. लागवड खर्चावरील आधिक्य म्हणजे खंड असल्याने कनिष्ठ प्रतीच्या जमिनीला खंड मिळत नाही. ₹ 1000 - ₹ 1000 ₹ 0, मध्यम प्रतीच्या जमिनीला 8 क्विंटल 6 क्विंटल 2 क्विंटल तर उच्च प्रतीच्या जमिनीला 10 क्विंटल - 6 क्विंटल = 4 क्विंटल खंड मिळतो. रिकार्डोच्या मते कनिष्ठ प्रतीची जमीन अस्तित्वात आहे म्हणून मध्यम व उच्च प्रतीच्या जमिनीला खंड मिळतो.

कनिष्ठ प्रतीची जमीन अस्तित्वात नसेल तर मध्यम प्रतीच्या जमिनीला खंड मिळणार नाही. जमिनीच्या गुणभिन्नतेमुळे आणि स्थितीदृष्ट्या भिन्नतेमुळे खंड निर्माण होतो. वरील उदाहरणात उच्च प्रतीची व मध्यम प्रतीच्या जमिनी सीमांतपूर्व आहेत. सीमांत जमीन अस्तित्वात आल्याने सीमांतपूर्व जमिनीला खंड मिळतो.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण : पुढील आकृती क्र. 4.3 मध्ये X अक्षावर समान आकारमानाच्या सुपीकतेतील फरकानुसार उच्च, मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B

जमिनीचे तीन तुकडे दर्शविले आहेत. Y अक्षावर एकूण उत्पादन क्विंटलमध्ये दर्शविले आहे. आकृतीतील रेखांकित भागाने खंड दर्शविला आहे. त्यापैकी उभ्या रेषांनी दर्शविलेला दर्शक भाग (2 क्विंटल) हा मध्यम प्रतीच्या जमिनीला मिळणारा खंड आहे. तर सरळ आडव्या रेषांनी दर्शविलेला दर्शक भाग (4 क्विंटल) हा उच्च प्रतीच्या जमिनीला मिळणारा खंड आहे. कनिष्ठ प्रतीच्या जमिनीला कोणताही खंड मिळत नाही. त्यामुळे कनिष्ठ प्रतीची जमीन सीमांत जमीन किंवा खंडविरहित जमीन आहे.



(2) प्रकर्षित किंवा सखोल लागवड पद्धती आणि खंडाची निर्मिती : भूमीचा किंवा जमिनीचा पुरवठा मर्यादित असतो. त्यामुळे शेतकरी प्रकर्षित लागवड पद्धतीचा अवलंब करतात. प्रकर्षित लागवड पद्धतीत जमिनीचे प्रमाण स्थिर ठेवून श्रम व भांडवल यांच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केली जाते.

HRM S.Y.B.A.

विशिष्ट परिस्थितीत, जमिनीचे विशिष्ट क्षेत्रफळ कायम ठेवून श्रम व भांडवलाच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केल्यास शेतीमध्ये घटत्या फलाचा नियम लागू होत असल्याने सीमांत उत्पादन घटत जाते. ज्या सीमांत उत्पत्तीला लागवड खर्च समान होतो, ती सीमांत मात्रा राहून तेथे खंड शून्य मिळतो. सीमांतपूर्व मात्रांना मात्र आधिक्य स्वरूपात खंड प्राप्त होतो. प्रकर्षित लागवड पद्धतीत खंडाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते.

- **“एकाच प्रकारच्या जमिनीवर श्रम व भांडवलाच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केल्यास सीमांत मात्रेपेक्षा सीमांतपूर्व मात्रेपासून मिळणारे आधिक्य स्वरूपाचे उत्पन्न म्हणजे खंड होय.”**

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण :

श्रम भांडवलाच्या मात्रा	लागवड खर्च (₹)	उत्पादन (क्विंटल)	खंड (क्विंटल)
पहिली मात्रा	1000	10	4
दुसरी मात्रा	1000	08	2
तिसरी मात्रा	1000	06	0

वरील तक्त्यामध्ये प्रकर्षित लागवड पद्धतीत मिळणारा खंड दर्शविलेला आहे. उदा., 2 एकर जमिनीत सुरुवातीला ₹ 1000 खर्च केल्यास 10 क्विंटल धान्य उत्पादित होते. नंतर त्याच जमिनीवर पुन्हा ₹ 1000 खर्च केल्यास 8 क्विंटल धान्य उत्पादित होते. त्यामुळे पहिल्या ₹ 1000 खर्च केलेल्या श्रम व भांडवलाच्या मात्रेला 2 क्विंटल खंड मिळेल. पुन्हा त्याच जमिनीत श्रम भांडवलाच्या मात्रेवर ₹ 1000 खर्च केल्यास 6

HRM Eco (S1) S.Y.B.A.

क्विंटल धान्य उत्पादित होते. 6 क्विंटल धान्याचे मूल्य ₹ 1000 म्हणजे उत्पादन खर्चाएवढे होते तर श्रम भांडवलाची तिसरी मात्रा ही सीमांत मात्रा असेल. त्यामुळे श्रम भांडवलाच्या दुसऱ्या मात्रेस 8 क्विंटल 2 क्विंटल खंड प्राप्त होईल. श्रम व भांडवलाच्या पहिल्या मात्रेस 10 क्विंटल - 6 क्विंटल = 4 क्विंटल खंड प्राप्त होईल.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :



आकृती क्र. 4.4 मध्ये x अक्षावर श्रम आणि भांडवलाच्या मात्रा दर्शविल्या असून Y अक्षावर एकूण उत्पादन क्विंटलमध्ये दर्शविले आहे. श्रम आणि भांडवलाच्या तिसऱ्या मात्रेला लागवड खर्च आणि सीमांत उत्पत्तीचे मूल्य समान होते त्यामुळे श्रम आणि भांडवलाच्या तिसऱ्या मात्रेला आधिक्य किंवा खंडरूपी उत्पन्न मिळत नाही. म्हणून श्रम भांडवलाच्या तिसऱ्या मात्रेला सीमांत मात्रा असे संबोधतात. सीमांतपूर्व पहिल्या व दुसऱ्या मात्रेला मात्र आधिक्य किंवा खंड स्वरूपाचे उत्पन्न प्राप्त होते. श्रम भांडवलाच्या दुसऱ्या मात्रेला 2 क्विंटल खंड प्राप्त होतो. आकृतीत तो सरळ उभ्या रेषांनी दर्शविला

आहे तर श्रम भांडवलाच्या पहिल्या मात्रेला 4 क्विंटल खंड प्राप्त होतो. आकृतीत तो सरळ आडव्या रेषांनी दर्शविलेला आहे.

रिकार्डोच्या खंड सिद्धान्ताची मूलभूत वैशिष्ट्ये :

(1) भूमी आणि खंड : खंड फक्त भूमीलाच मिळतो.

(2) सुपीकतेतील भिन्नतेमुळे खंड प्राप्त होतो : रिकार्डोच्या मते भूमी ही सुपीकतेच्या दृष्टीने भिन्न असते म्हणून भूमीला मिळणारा खंड हा 'गुणभेदजन्य वाढावा' असतो.

(3) उत्पन्नाचे उत्पादन खर्चावरील आधिक्य म्हणजे खंड : रिकार्डोच्या मते उत्पन्नाचे उत्पादन खर्चावरील आधिक्य म्हणजे खंड होय.

(4) खंड हे अनर्जित आधिक्य आहे : भूमी ही निसर्गनिर्मित देणगी आहे. भूमीमध्ये गुणभिन्नता आढळून येते. रिकार्डोच्या मते, जमिनीचा मालक आपला मालकी हक्क दाखवून कोणतेही कष्ट न करता खंडरूपी उत्पन्न मिळवितो. म्हणून खंड हे अनर्जित उत्पन्न आहे.

(5) खंडाचा किंमतीत समावेश होत नाही : रिकार्डोच्या मते भूमी ही निसर्गाने मानवाला दिलेली मोफत देणगी आहे. त्यामुळे भूमीचा उत्पादन खर्च शून्य असतो. म्हणूनच भूमीला मिळणारा खंड उत्पादन खर्चात समाविष्ट होत नाही. त्यामुळे खंड वाढला म्हणून अन्नधान्याच्या किंमती कधीच वाढत नसतात, तर अन्नधान्य महाग

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

झाल्याने खंड दिला जातो. खंड किंमतीवरून ठरतो. किंमत खंडावरून ठरत नाही. त्यामुळे खंडाचा किंमतीत समावेश होत नाही. P

(6) गुणभेदजन्य वाढावा : खंड हा गुणभेदजन्य वाढावा आहे.

(7) कायमस्वरूपी खंड : जमिनीला एकदा खंड मिळाला की, कायमस्वरूपी मिळत राहतो.

रिकार्डोच्या खंड सिद्धान्तावरील टीका :

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी रिकार्डोच्या खंड सिद्धान्तावर अनेक टीका केलेल्या आहेत. त्यातील काही प्रमुख टीका पुढीलप्रमाणे –

(1) जमिनीची मूलभूत व अविनाशी शक्ती : जमिनीत असलेल्या मूलभूत आणि अविनाशी गुणधर्मामुळे खंड निर्माण होतो. या रिकार्डोच्या मतावर टीकाकारांनी हल्ला चढविला आहे. जमिनीच्या अंगी असणाऱ्या सर्व शक्ती मूलभूत स्वरूपाच्या नसतात. कारण कोणतीही भूमी नैसर्गिक अवस्थेत वापरणे शक्य नसते. त्यासाठी मानवी प्रयत्नाने अनेक प्रक्रिया कराव्या लागतात. त्यामुळे कोणती शक्ती नैसर्गिक व कोणती मानवनिर्मित हे निश्चितपणे ओळखता येत नाही. तसेच जमिनीची शक्ती ही अविनाशी असते हे म्हणणे बरोबर नाही. कारण जमीन सतत लागवडीखाली आणल्यामुळे जमिनीची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होते. ऊन, वारा, पाऊस यांचा जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो ही बाब या सिद्धान्ताने विचारात घेतलेली नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(2) सुपीकतेचा मर्यादित अर्थ : रिकार्डोच्या मते, सुपीकता म्हणजे नैसर्गिक शक्ती होय. प्रत्यक्षात मात्र जमिनीची सुपीकता ही लागवड पद्धती, पिकांचा प्रकार, कृषितंत्र, रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादी घटकांवर अवलंबून असते. या बाबींचा विचार सिद्धान्तात करण्यात आलेला नाही.

(3) लागवडीचा क्रम : रिकार्डोने ऐतिहासिकदृष्ट्या जमिनीचा जो क्रम लावला तो चुकीचा आहे. रिकार्डोच्या मते प्रथम सुपीक किंवा उच्च प्रतीची नंतर मध्यम प्रतीची व शेवटी कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली येते. परंतु अमेरिकेत सुरुवातीला जी वसाहत झाली तेव्हा प्रथम खडकाळ व डोंगराळ म्हणजे कनिष्ट प्रतीची जमीन लागवडीखाली आणली गेली व नंतर सर्वांत चांगली जमीन लागवडीखाली आणली गेली.

(4) शेतजमिनीचा वापर : रिकार्डोच्या मते, शेतजमिनीचा वापर फक्त अन्नधान्याच्या पकांसाठी केला जातो. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र जमिनीचा वापर कारखानदारी, घरबांधणी, खेळांची मैदाने, रस्ते, विमानतळे इत्यादी अनेक कारणांसाठी केला गेला.

(5) सीमांत जमीन किंवा खंडविरहित जमीन : रिकार्डोच्या मते, सीमांत जमिनीस बुंड मिळत नाही. परंतु आज सर्वच प्रकारच्या जमिनींना खंड मिळत असल्याने सीमांत । जमिनीला खंड मिळत नाही, हे रिकार्डोचे म्हणणे चुकीचे ठरते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(6) खंड गुणभेदजन्य वाढावा : रिकार्डोच्या मते, जमिनीला सुपीकतेतील अंतरामुळे म्हणजेच गुणभेदजन्यतेमुळे खंड मिळतो. परंतु टीकाकारांच्या मते "सुपीकतेत अंतर असल्यामुळे खंड मिळत नाही तर खंड मिळण्याचे खरे कारण दुर्मीळता हे आहे."

(7) घटत्या उत्पादन फलाचा नियम : रिकार्डोच्या मते, शेतीक्षेत्रात घटत्या उत्पादन कलाचा नियम कार्यवाहीत असतो. जमिनीत श्रम व भांडवलाच्या प्रमाणात वाढ केल्यास शेती उत्पादन घटत्या दराने वाढते. भारतामध्ये 1960 च्या दशकात जी हरित क्रांती झाली त्यामध्ये उत्पादनवर्धन बियाणांच्या वापरामुळे शेतीक्षेत्रात वाढत्या उत्पादन फलाचा नियम दीर्घकाळापर्यंत टिकविता येतो हे सिद्ध झाले. त्यामुळे घटत्या उत्पादन फलाचे गृहीत चुकीचे करते.

(8) खंड फक्त भूमीलाच मिळतो : रिकार्डोच्या मते, खंड फक्त भूमीलाच मिळतो. टीकाकारांच्या मते जमिनीला जसे तिच्या दुर्मीळतेमुळे खंड मिळतो तसाच श्रम, भांडवल, संयोजक या उत्पादनाच्या इतर घटकांनासुद्धा जमिनीप्रमाणेच त्यांच्या दुर्मीळतेमुळे खंड स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे खंड ही एकट्या भूमीची मिरासदारी नाही.

(9) अल्पकाल आणि खंड : रिकार्डोच्या मते, खंड केवळ दीर्घकाळात प्राप्त होतो. डॉ. मार्शल यांच्या मते, अल्पकाळात मागणीच्या तुलनेत कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा कमी पडल्यास त्या घटकाची किंमत वाढून त्या घटक मालकाला जास्तीचे उत्पन्न मिळते या उत्पन्नालाच आभास खंड असे म्हणतात. दीर्घकाळात हा खंड नाहीसा होतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

(10) खंड हे अनर्जित उत्पन्न : रिकार्डोच्या मते, जमीन या नैसर्गिक देणगीचा वापर करू दिल्याबद्दल जमीनमालकाने जमिनीवर विहीर खोदणे, जमीन समतल करणे, कुंपण लावणे इत्यादी सुधारणा केल्यामुळे खंडरूपी उत्पन्न मिळत असते. म्हणूनच खंड हे अनर्जित उत्पन्न नसून अर्जित उत्पन्न आहे.

(11) खंड आणि किंमत : रिकार्डोच्या मते, खंडाचा किमतीवर प्रभाव पडत नाही. परंतु टीकाकारांच्या मते भूमी एक उत्पादन घटक आहे. खंड हा भूमी या उत्पादन घटकाचा मोबदला आहे. त्यामुळे खंड उत्पादन खर्चाचा एक भाग आहे. त्यामुळे खंडाचा अन्नधान्याच्या किमतीवर प्रभाव पडतो.

(12) पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते : रिकार्डोचा सिद्धान्त हा पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारलेला आहे. परंतु प्रत्यक्षात शेतीक्षेत्रात पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते. प्रत्यक्षात मात्र अपूर्ण स्पर्धा दिसून येते. अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत खंडाची निर्मिती कशी होते याचे स्पष्टीकरण करण्यास हा सिद्धान्त असमर्थ आहे.

वरील टीका रिकार्डोच्या खंड सिद्धान्तावर केल्या जातात. तथापि, हा सिद्धान्त आजही पूर्णपणे नाकारला जात नाही कारण या सिद्धान्ताने खंडाची निर्मिती का व कशी होते याचे स्पष्टीकरण देण्याचा पहिला प्रयत्न केलेला आहे. पुरवठ्याच्या मर्यादिततेमुळे खंडाची निर्मिती होते हे रिकार्डोचे मत आधुनिक अर्थशास्त्रज्ञसुद्धा मान्य करतात. त्यामुळे या सिद्धान्ताचे अर्थशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

खंडाचा आधुनिक सिद्धान्त

(Modern Theory of Rent)

रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धान्तात अनेक त्रुटी आहेत. रिकार्डोच्या मते, खंड फक्त भूमीलाच मिळतो आणि तो जमिनीच्या सुपीकतेतील भिन्नतेमुळे मिळतो. आधुनिक सिद्धान्तानुसार खंड हा भूमी विशिष्ट नसून भूमीप्रमाणेच इतर उत्पादन घटकांनाही त्याचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडल्यास खंड मिळायला सुरुवात होते. आधुनिक सिद्धान्तानुसार भूमीला तिच्या गुण भिन्नतेमुळे खंड मिळत नसून तिचा पुरवठा सीमित झाल्यामुळे खंड मिळतो. या सीमिततेच्या तत्त्वाला आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी भूमितत्त्व असे नाव दिले आहे. त्यांच्या मते, भूमितत्त्व (Land Element) श्रम, भांडवल व साहस या सर्व उत्पादन साधनांत असल्यामुळे त्यांनादेखील खंड मिळू शकतो. आधुनिक खंड सिद्धान्तात खंडाचा किंमतीवर प्रभाव पडतो. खंड ही जमीन या उत्पादन घटकसेवेची किंमत आहे म्हणजेच उत्पादन खर्चाचा भाग आहे, म्हणून खंडाचा जमिनीच्या किंमतीवर प्रभाव पडतो. आधुनिक खंड सिद्धान्तात खंडाचा अधिक व्यापक विचार केला म्हणून आधुनिक खंड सिद्धान्ताला 'खंडाचा सामान्य सिद्धान्त' असे म्हणतात.

आधुनिक खंड सिद्धान्त सुरुवातीला डॉ. मार्शल यांनी मांडला. व्हान विजर, प्रा. के. ई. बोल्डिंग यांनी या सिद्धान्तात मोलाची भर घातली, श्रीमती जोन रॉबिन्सन यांनी आधी खंड सिद्धान्ताचे योग्य व यथार्थ स्पष्टीकरण केले.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

खंडाची व्याख्या :

- **"ज्यांचा पुरवठा मर्यादित व अलवचीक आहे अशा कोणत्याही विशेषोपयुक्त साधनाला मिळणारे आधिक्य स्वरूपाचे उत्पन्न म्हणजे आर्थिक 'खंड' होय.'**

  - **प्रा. बेनहॅम**

- **"एका विशिष्ट काळात जर एखाद्या घटकाचा पुरवठा मर्यादित असेल आणि तो मानवी प्रयत्नाद्वारे वाढविता येत नसेल तर त्या साधनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाला नफ्याऐवजी खंड मानणे अधिक उपयुक्त ठरेल." डॉ. मार्शल**

- "खंड म्हणजे उत्पादनाच्या घटकाच्या एखाद्या मात्रेला त्या उत्पादन घटकांच्या पुरवठा किंमतीपेक्षा दिला जाणारा अतिरिक्त मोबदला होय." **प्रा, बोल्डिंग**

- "कोणत्याही उत्पादन घटकास त्या उत्पादन घटकाच्या बदली उत्पन्नापेक्षा मिळणारे आधिक्य म्हणजे 'खंड' होय." **श्रीमती जोन रॉबिन्सन**

खंडाची वैशिष्ट्ये:

वरील व्याख्यांवरून आधुनिक खंड सिद्धान्तानुसार खंडाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

1. खंड हे विशेषोपयुक्त साधनापासून मिळणारे उत्पन्न आहे. एका साधनाचे अनेक उपयोग होऊ शकतात. परंतु एक साधन हे एका कार्याकरिता विशेषोपयुक्त असते. उदा., समुद्रकाठची जमीन नारळाच्या उत्पादनाकरिता विशेष उपयुक्त असते.

2. खंड हा दुर्मीळतेमुळे निर्माण होतो. उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचीक झाल्यास त्या उत्पादन घटकाला खंड मिळायला सुरुवात होते.

3. आधुनिक खंड संकल्पनेनुसार उत्पादनाच्या सर्वच घटकांना खंड प्राप्त होतो.

4. खंड हे आधिक्य स्वरूपाचे उत्पन्न आहे. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार वैकल्पिक खर्चावरील आधिक्य म्हणजेच खंड होय.

5. खंड हे बदली उत्पन्नावरील आधिक्य असते.

आर्थिक खंडाची निर्मिती : आर्थिक खंडाची निर्मिती कशी होते हे स्पष्ट करण्यासाठी श्रीमती जोन रॉबिन्सन यांनी बदली उत्पन्नाची (Transfer Earning) संकल्पना मांडलेली आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

बदली उत्पन्न (Transfer Earning) :

- **“एखादा उत्पादन घटक एखाद्या विशिष्ट उपयोगात किंवा उद्योगात राहावा म्हणून त्याला जी किमान किंमत द्यावी लागते त्या किंमतीला बदली उत्पन्न असे म्हणतात.”** **- श्रीमती जोन रॉबिन्सन**

एखादा उत्पादन घटक विशिष्ट क्षेत्रात कार्यरत आहे. तो त्या क्षेत्रात ज्या प्रकारचे काम करतो तशाच प्रकारचे काम इतर क्षेत्रात उपलब्ध आहे. तेच काम इतरत्र केल्यास उत्पादन घटकमालकाला जेवढा मोबदला मिळतो तेवढाच मोबदला तो सध्या ज्या क्षेत्रात काम करतो त्या ठिकाणी मिळाला पाहिजे या मोबदल्याला ‘बदली उत्पन्न' असे म्हणतात. थोडक्यात, बदली उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात काम करण्यासाठी उत्पादन घटक मालकास दिली जाणारी कमीत कमी किंमत होय. या मोबदल्यापेक्षा कमी किंमत त्या उत्पादन घटकमालकाला दिल्यास तो उत्पादन घटकमालक जेथे काम करतो त्या क्षेत्रातून आपली बदली करेल किंवा दुसऱ्या क्षेत्रात काम करणे पसंत करेल. उदा., एक कामगार जिल्हा परिषद कार्यालयात कारकुनाची नोकरी दरमहा ₹ 5000 वेतनावर करतो. त्या कामगाराला कारकुनाच्या नोकरीसाठी बँकेने बोलाविले. तर तो कारकून बँकेत नोकरी स्वीकारण्यासाठी किमान त्याला जिल्हा परिषद कार्यालयात मिळणाऱ्या वेतनाएवढे दरमहा ₹ 5000 वेतन मिळाले पाहिजे. तेव्हाच तो कामगार बँकेत नोकरी स्वीकारायला तयार होईल. म्हणजेच दरमहा ₹ 5000 हे त्या कामगाराचे बदली उत्पन्न झाले. बँकेत कारकुनाच्या कामासाठी बँकेने त्या कामगाराला दरमहा ₹ 5500 वेतन देऊ केल्यास त्या कामगाराला दरमहा ₹ 500 खंडस्वरूप उत्पन्न मिळेल.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

वर्तमान उत्पन्नाचे बदली उत्पन्नावरील आधिक्य म्हणजे खंड होय. वरील उदाहरणात वर्तमान प्रत्यक्ष उत्पन्न ₹ 5500 - बदली उत्पन्न ₹ 5000 = खंड

₹ 500 राहील.

खंड = प्रत्यक्ष वेतन - बदली उत्पन्न

श्रम या उत्पादन घटकाप्रमाणेच भांडवल, संयोजक या घटकांना खंड स्वरूप उत्पन्न मिळते. उदा., एखादा भांडवलदार आपल्या जवळील रक्कम द.सा.द.शे. 10% दराने कर्जाऊ देण्यास तयार आहे. कर्जाची गरज असणारा उद्योजक ती रक्कम द.सा.द.शे. 12% दराने कर्जाऊ घेण्यास तयार आहे. तर या परिस्थितीत भांडवलदारास प्रतिवर्षी 100 रुपयांमागे 2% खंडस्वरूप व्याज मिळेल. अशा प्रकारे आधुनिक खंडाची संकल्पना ही बदली उत्पन्नावरील आधिक्यावर आधारलेली आहे.

आधुनिक खंड सिद्धान्तानुसार उत्पादन घटकांचा पुरवठा अलवचीक झाल्यास आणि उत्पादन घटकांच्या विविध उपयोगामुळे अथवा गुणभिन्नतेमुळे खंडाची निर्मिती होते. खंडनिर्मितीचे स्पष्टीकरण

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

उत्पादन घटकाच्या पुरवठ्याची लवचीकता आणि खंडाची निर्मिती :

(1) पूर्णपणे लवचीक पुरवठा : ज्या उत्पादन घटकाचा पुरवठा पूर्णपणे लवचीक असतो अशा उत्पादन घटकाला खंडस्वरूप उत्पन्न मिळत नाही. त्या उत्पादन घटकाला मिळणारा मोबदला केवळ बदली उत्पन्नाच्या स्वरूपाचा असतो.

आकृती क्र. 3.5 मध्ये X अक्षावर श्रमिकांची संख्या दर्शविली आहे. Y अक्षावर श्रमिकांना मिळणारा घटक मोबदला (वेतन) दाखविले आहे. DD हा श्रमाच्या मागणीचा वक्र असून INS हा श्रमाचा पुरवठा वक्र आहे. हा पुरवठा वक्र X अक्षाला समांतर आहे. म्हणजेच श्रमाचा पुरवठा पूर्णपणे लवचीक आहे. OW वेतनात श्रमाचा कितीही पुरवठा होऊ शकतो IWS श्रमाचा पुरवठा वक्र व DD श्रमाचा मागणी वक्र E बिंदूत छेदतो वेतन OW ठरते. श्रमिकांची संख्या OQ ठरते. एकूण वेतन OWEQ ठरते. OWEQ हे श्रमिकांना मिळणारे एकूण वेतन सर्वच्या सर्व बदली उत्पन्न आहे. यात खंडस्वरूप उत्पन्न मिळत नाही.



(2) अलवचीक पुरवठा : उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचीक झाल्यास उत्पादन घटकमालकाला खंड स्वरूपात उत्पन्न मिळायला सुरुवात होते. जादा श्रमिक

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

मिळविण्यासाठी जादा वेतन द्यावे लागते. उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचीक झाल्यास सीमांत मजुरांना जादा वेतन मिळणार नाही. परंतु सीमांतपूर्व मजुरांना जादा वेतन मिळेल. त्यांच्या वेतनात खंडाचा अंश राहील.



वरील आकृतीत X अक्षावर श्रमिकांची संख्या दर्शविली आहे. Y अक्षावर वेतन दर्शविले आहे. DD हा श्रमाचा मागणी वक्र व SS हा श्रमाचा पुरवठा वक्र आहे. OS ही बदली किंमत (व्यय) आहे. कारण OS पेक्षा कमी मोबदल्यास उत्पादन घटकाचा पुरवठा शून्य होतो. त्यानंतर मागणीत होणाऱ्या वाढीबरोबर पुरवठ्यात वाढ होऊन E बिंदूला मागणी व पुरवठा समान होतो. श्रमिकाचा वेतन दर OW ठरतो. अशा प्रकारे वास्तव वेतन दर OW व OS बदली दर असतो त्यामुळे

खंड = वास्तव वेतन दर - बदली उत्पन्न

WS = OW - OS

एकूण खंड = एकूण मोबदला - एकूण बदली उत्पन्न

HRM Micro Eco S.Y.B.A.

SWE = □OWEQ - □OSEQ

अशा रीतीने उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचीक झाल्यास जे एकूण वेतन मिळते त्या एकूण वेतनात काही भाग खंडाचा व काही भाग बदली उत्पन्नाचा असतो. वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे एकूण वेतन □OWEQ असून त्यापैकी SWE खंड असून □OSEQ बदली उत्पन्न आहे.

(2) **पूर्णपणे अलवचीक पुरवठा :** उत्पादन घटकाचा पुरवठा पूर्णपणे अलवचीक झाल्यास त्या उत्पादन घटकाला कोणतीच पुरवठा किंमत (Supply Price) नसते. या परिस्थितीत श्रमिकांना मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न खंड या स्वरूपाचे असते. श्रम या घटकाला मिळणाऱ्या मोबदल्यात बदली उत्पन्नाचा अंश नसतो.



वरील आकृतीत x अक्षावर श्रमिकांची संख्या दर्शविली आहे. Y अक्षावर वेतन दर्शविले आहे. QS हा श्रमाचा पुरवठा वक्र आहे तो Y अक्षाला समांतर असल्याने श्रमाचा पुरवठा पूर्णपणे अलवचीक आहे. याचाच अर्थ वेतनात कितीही वाढ अथवा घट

HRM M Eco (S1) S.Y.B.A.

झाल्यास श्रमाचा पुरवठा OQ राहील. DD हा श्रमाचा मागणी वक्र आहे. E बिंदूत श्रमाचा मागणी वक्र व पुरवठा वक्र परस्परांना छेदतात. वेतन दर OW ठरतो तर श्रमिक संख्या OQ ठरते. त्यामुळे एकूण वेतन □OWEQ ठरते. □OWEQ हे एकूण वेतन सर्वच्या सर्व खंड आहेत.

आधुनिक खंड सिद्धान्तानुसार श्रम या उत्पादन घटकाच्या बाबतीत असणारे विवेचन इतर उत्पादन घटकांनाही लागू पडते.

आधुनिक खंड सिद्धान्ताचे निष्कर्ष

1. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार खंड हा भूमी विशिष्ट नसून कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा मर्यादित झाला की त्या उत्पादन घटकाच्या मालकाला खंड मिळायला सुरुवात होते. .

2. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार कोणत्याही उत्पादन घटकास त्या उत्पादन घटकाच्या बदली उत्पन्नापेक्षा मिळणारे ज्यादा उत्पन्न म्हणजे खंड होय. 3. खंड हा आर्थिक वाढावा आहे.

4. जेव्हा कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा पूर्णपणे लवचीक असतो तेव्हा त्या उत्पादन घटकाला मिळणाऱ्या मोबदल्यात खंडाचा अंश नसतो. जेव्हा कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा कमी लवचीक असतो तेव्हा त्या उत्पादन घटकाला

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

मिळणाऱ्या उत्पन्नात खंडाचा अंश असतो. जेव्हा कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा पूर्णपणे अलवचीक असतो तेव्हा त्याला मिळणारे सर्व उत्पन्न खंडस्वरूप असते.

5. जेव्हा उत्पादन घटकाचा पुरवठा उत्पादन घटकाच्या मागणीपेक्षा जास्त होतो तेव्हा उत्पादन घटकाला मिळणारा खंड नाहीसा होतो.

6. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार खंडाची निर्मिती उत्पादन घटकाच्या दुर्मीळतेमुळे होते.

7. समाजाच्या दृष्टिकोनातून भूमीचा पुरवठा स्थिर असतो. त्यामुळे भूमीला मिळणारे सर्वच उत्पन्न हे खंड असून भूमीचे बदली उत्पन्न शून्य असते. 8. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार खंडाचा किमतीवर प्रभाव पडतो.

9. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार खंडाचे विविध प्रकार पडतात. जमिनीला मिळणारा खंड 'दुर्मीळता खंड' आहे. विशिष्ट प्रकारच्या श्रमाला मिळणारा जादा मोबदला हा 'योग्यता खंड' आहे. यंत्रसामग्रीसारख्या भांडवली वस्तूला मिळणारा जादा मोबदला 'कुशलता खंड' आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आभास खंड किंवा प्रतिरूप खंडाची संकल्पना

(Concept of Quasi Rent)

आभास खंडाला खंडसम उत्पन्न किंवा खंडसदृश्य उत्पन्न किंवा तात्पुरता खंड असे संबोधले जाते. आभास खंडाची संकल्पना सर्वांत प्रथम डॉ. मार्शल यांनी मांडली. डॉ. मार्शलच्या मते आभास खंड याचा अर्थ तत्कालीन खंड असा होतो जो फक्त अल्पकाळात मिळतो पण दीर्घकाळात नाहीसा होतो. हा खंड दीर्घकाळात नाहीसा होत असल्याने या खंडाचा फक्त अल्पकाळात भास होतो म्हणून त्यास आभास खंड असे म्हटले आहे.

डॉ. मार्शलच्या मते जमीन या उत्पादन घटकास जसा दुर्मीळतेमुळे खंड मिळतो. तसाच श्रमिक, यंत्रसामग्री, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापक, इमारत, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, कलावंत या मानवनिर्मित घटकांनाही अल्पकाळात त्यांचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडला की, म्हणजेच पुरवठा अलवचीक झाला की खंड मिळायला सुरुवात होते. जमिनीचा पुरवठा एकदाच ठरलेला असतो तो वाढविता येत नाही. त्यामुळे जमिनीला एकदा खंड मिळाला की कायमस्वरूपी मिळत राहतो. मानवनिर्मित घटकांचा पुरवठा अल्पकाळात मागणीच्या मानाने कमी पडला की खंड मिळायला सुरुवात होते मात्र दीर्घकाळात या घटकांचा पुरवठा वाढला की त्या मानवनिर्मित उत्पादन घटकांना मिळणारा खंड नाहीसा होतो. आभास खंडाच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

व्याख्या :

- **"मानवनिर्मित दुर्मीळ घटकांचा पुरवठा अल्पकाळात स्थिर असल्यामुळे त्यांना जे आधिक्य स्वरूपाचे उत्पन्न मिळते त्यालाच 'आभास खंड' असे म्हणतात."**

  - डॉ. मार्शल

- **"उत्पादनाच्या ज्या साधनांचा पुरवठा दीर्घकाळात वाढविणे शक्य असले तरी अल्पकाळात मात्र स्थिर असते अशा साधनांनी प्राप्त केलेल्या अतिरिक्त उत्पन्नाला तांत्रिकदृष्ट्या 'आभास खंड' असे म्हणतात." - सिल्व्हरमन**

आभास खंडाची संकल्पना पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येते. समजा मासळयांकरिता असणारी मागणी काही विशिष्ट कारणांमुळे एकदम वाढली त्यामुळे मासळयांच्या किंमतीत वाढ होऊन मासळयांची विक्री करणाऱ्या कोळयांना जादा उत्पन्न मिळू लागते. काही विशिष्ट काळ मिळणारे हे जादा किंवा अतिरिक्त उत्पन्न म्हणजे आभास खंड होय.

मासळयांकरिता असणारी ही मागणी दीर्घकाळ टिकून राहिल्यास नवीन कोळी या व्यवसायात येतात. होड्यांची व विणलेल्या जाळयांची संख्या वाढून दीर्घकाळात मागणीनुसार मासळयांच्या पुरवठ्यात वाढ होईल व मासळयांची वाढलेली किंमत कमी

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आभास खंड किंवा प्रतिरूप खंडाची संकल्पना

(Concept of Quasi Rent)

आभास खंडाला खंडसम उत्पन्न किंवा खंडसदृश्य उत्पन्न किंवा तात्पुरता खंड असे संबोधले जाते. आभास खंडाची संकल्पना सर्वांत प्रथम डॉ. मार्शल यांनी मांडली. डॉ. मार्शलच्या मते आभास खंड याचा अर्थ तत्कालीन खंड असा होतो जो फक्त अल्पकाळात मिळतो पण दीर्घकाळात नाहीसा होतो. हा खंड दीर्घकाळात नाहीसा होत असल्याने या खंडाचा फक्त अल्पकाळात भास होतो म्हणून त्यास आभास खंड असे म्हटले आहे.

डॉ. मार्शलच्या मते जमीन या उत्पादन घटकास जसा दुर्मीळतेमुळे खंड मिळतो. तसाच श्रमिक, यंत्रसामग्री, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापक, इमारत, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, कलावंत या मानवनिर्मित घटकांनाही अल्पकाळात त्यांचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडला की, म्हणजेच पुरवठा अलवचीक झाला की खंड मिळायला सुरुवात होते. जमिनीचा पुरवठा एकदाच ठरलेला असतो तो वाढविता येत नाही. त्यामुळे जमिनीला एकदा खंड मिळाला की कायमस्वरूपी मिळत राहतो. मानवनिर्मित घटकांचा पुरवठा अल्पकाळात मागणीच्या मानाने कमी पडला की खंड मिळायला सुरुवात होते मात्र दीर्घकाळात या घटकांचा पुरवठा वाढला की त्या मानवनिर्मित उत्पादन घटकांना मिळणारा खंड नाहीसा होतो.

आभास खंडाच्या व्याख्या :

- **"मानवनिर्मित दुर्मीळ घटकांचा पुरवठा अल्पकाळात स्थिर असल्यामुळे त्यांना जे आधिक्य स्वरूपाचे उत्पन्न मिळते त्यालाच 'आभास खंड' असे म्हणतात."**

- डॉ. मार्शल

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

- **"उत्पादनाच्या ज्या साधनांचा पुरवठा दीर्घकाळात वाढविणे शक्य असले तरी अल्पकाळात मात्र स्थिर असते अशा साधनांनी प्राप्त केलेल्या अतिरिक्त उत्पन्नाला तांत्रिकदृष्ट्या 'आभास खंड' असे म्हणतात." - सिल्व्हरमन**

आभास खंडाची संकल्पना पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येते. समजा मासळयांकरिता असणारी मागणी काही विशिष्ट कारणांमुळे एकदम वाढली त्यामुळे मासळयांच्या किंमतीत वाढ होऊन मासळयांची विक्री करणाऱ्या कोळयांना जादा उत्पन्न मिळू लागते. काही विशिष्ट काळ मिळणारे हे जादा किंवा अतिरिक्त उत्पन्न म्हणजे आभास खंड होय.

मासळयांकरिता असणारी ही मागणी दीर्घकाळ टिकून राहिल्यास नवीन कोळी या व्यवसायात येतात. होड्यांची व विणलेल्या जाळयांची संख्या वाढून दीर्घकाळात मागणीनुसार मासळयांच्या पुरवठ्यात वाढ होईल व मासळयांची वाढलेली किंमत कमी होईल व अल्पकाळात मिळत असलेले अतिरिक्त उत्पन्न दीर्घकाळात नाहीसे होईल. म्हणून या अतिरिक्त उत्पन्नाला आभास खंड असे म्हणतात. दुर्मीळतेमुळे अल्पकाळात आभाग्य खंडाची निर्मिती होते. दीर्घकाळात पुरवठ्यात वाढ झाली की हा खंड नाहीसा होतो. आभास खंडाची संकल्पना व्यक्तीच्या बुद्धिचातुर्यालासुद्धा लागू आहे. समजा, अल्पकाळात डोळयांची साथ आली की, त्यामुळे नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांची मागणी वाढेल व नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांना अल्पकाळात अतिरिक्त मोबदला प्राप्त होईल. पण जर हा आजार दीर्घकाळ टिकून राहिला तर या आजारावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची संख्या दीर्घकाळात वाढेल. परिणामतः नेत्रतज्ज्ञांचा पुरवठा वाढेल व नेत्रतज्ज्ञांना मिळणारा

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

अतिरिक्त मोबदला नाहीसा होईल. अशाच प्रकारचा आभास खंड अल्पकाळात कलावंतांनासुद्धा प्राप्त होतो व दीर्घकाळात कलावंतांची संख्या वाढल्यास तो नाहीसा होतो.

खंड व आभास खंडातील भेद :

1. खंड हा मोबदला भूमी या निसर्गनिर्मित घटकाला मिळतो. आभास खंड हा मोबदला श्रम, इमारत, यंत्रसामग्री, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ इ. मानवनिर्मित घटकांना त्यांच्या दुर्मीळतेमुळे प्राप्त होतो.

2. भूमीला मिळणाऱ्या खंडाचे अस्तित्व अल्पकालीन तसेच दीर्घकालीन असते. पण आभास खंडाचे अस्तित्व अल्पकालीन असते.

3. रिकार्डोच्या मते, भूमी या निसर्गनिर्मित घटकाला मिळणारा खंड हा अनर्जित आधिक्य आहे म्हणजेच भूमीला मिळणारा खंड हे अनर्जित उत्पन्न आहे. मानवनिर्मित घटकांचा पुरवठा मानवनिर्मित प्रयत्नांवर अवलंबून असतो त्यामुळे आभास खंड हे कष्टार्जित उत्पन्न आहे.

4. खंड हा कायमस्वरूपी असतो तर आभास खंड हा तात्पुरता असतो.

5. खंड हा ऋण असू शकतो; परंतु आभास खंड ऋण नसतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

6. रिकार्डोच्या मते जमिनीच्या सुपीकतेतील भिन्नतेमुळे खंड मिळतो. मार्शलच्या मते, मानवनिर्मित घटकांच्या दुर्मीळतेमुळे अल्पकाळात खंड मिळतो.

आभास खंड संकल्पनेवरील टीका :

1. अल्पकाळात मानवनिर्मित उत्पादन घटकाचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडला की खंड मिळायला सुरुवात होते. टीकाकारांच्या मते, अल्पकाळापेक्षा दीर्घकाळात मानवनिर्मित उत्पादन घटकांच्या मागणी-पुरवठ्यात मेळ बसविणे अवघड असते.

2. अल्पकाळात मागणीच्या तुलनेत मानवनिर्मित उत्पादन घटकांचा पुरवठा का कमी पडतो याचे स्पष्टीकरण ही संकल्पना देत नाही. उत्पादन घटक विशिष्ट उपयोगी असतात ही बाब या संकल्पनेत विचारात घेतलेली नाही.

3. आधुनिक खंड सिद्धान्तानुसार उत्पादनाच्या सर्वच घटकांना खंड मिळतो. त्यामुळे खंड आणि आभास खंड या दोहोंतील फरकास महत्त्व राहिले नाही.

4. जर अल्पकाळात मानवनिर्मित उत्पादन घटकांचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाल्यास या संकल्पनेनुसार खंड उणे (-) व्हायला पाहिजे. प्रत्यक्षात तसे होत नाही.

5. श्रमिकांच्या बाबतीत आभास खंड ही संकल्पना लागू करणे अवघड आहे. श्रमिकांच्या प्रयत्नामुळे किती उत्पादन झाले व अर्जित गुणामुळे किती उत्पादन झाले याचे विभाजन

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

करता येत नाही. जर श्रमिकास गुणभेदजन्य खंड दिला जात असेल तरच श्रमिकांच्या बाबतीत ही संकल्पना उपयोगी पडते.

3:3 मजुरी/वेतन : वेतनाचा आधुनिक सिद्धान्त, श्रमाचा पुरवठा वक्र

(Wages : Modern Theory of Wages,Supply Curve of Labour)

मजुरी : अर्थ आणि प्रकार (Wages : Meaning and Types)

श्रम हा उत्पादनाचा एक प्रमुख मानवनिर्मित सक्रिय उत्पादन घटक आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभाग घेतल्याबद्दल श्रम या उत्पादन घटकाला मिळणारा मोबदला म्हणजे मजुरी होय. श्रमिकाला दिली जाणारी मजुरी रोख पैशाच्या स्वरूपात अथवा वस्तूंच्या स्वरूपातही दिली जाऊ शकते. शेतीक्षेत्रात श्रमिकांना धान्याच्या स्वरूपात मजुरी देण्याचा प्रघात पूर्वी होता. श्रमिकाने श्रम ही घटक सेवा पुरविल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मोबदल्याला मजुरी/ वेतन असे संबोधतात. श्रमिक अथवा कामगार शारीरिक अथवा मानसिक श्रम करतो. श्रमामध्ये सेवा, शारीरिक कष्ट, बौद्धिक कष्ट इत्यादींचा समावेश होतो.

मजुरी/वेतन प्रमुख व्याख्या :

- **"श्रमिकाने पुरविलेल्या सेवेबद्दल मालकाकडून (विनियोक्त्याकडून) श्रमिकाला करारानुसार रोख पैशाच्या स्वरूपात मिळणारा मोबदला म्हणजे मजुरी होय."**

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

- प्रा. बेनहम

- **"श्रमिकाने उत्पादन कार्यात केलेल्या मदतीबद्दल श्रमिकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे मजुरी होय."** - प्रा. ए. एच. हॅन्सन

- **"श्रमिकाने पूर्ण केलेल्या कामाबद्दल मालकाकडून श्रमिकाला दिली जाणारी किंमत म्हणजे मजुरी होय."** - जे. आर. टर्नर

- **"मालकाने उद्योगामध्ये श्रमिकाकडून खरेदी केलेल्या श्रमसेवेबद्दल दर तासाला, दर दिवसाला, दर आठवड्याला अथवा दर पंधरवड्याला दिलेल्या मोबदल्याची रक्कम म्हणजे मजुरी होय."** आंतरराष्ट्रीय श्रम संघटना

वरील व्याख्यांचा विचार केला तर 'मजुरी' हा शब्द व्यापक अर्थाने विचारात घेतल्यास मजुरीमध्ये शारीरिक कष्ट करणाऱ्या श्रमिकांची मजुरी, व्यवस्थापक, अधिकारी, कारकून, शिपाई यांना दिले जाणारे वेतन, डॉक्टर, वकील, अभियंते इत्यादींना दिले जाणारे सेवाशुल्क, व्यावसायिकांच्या सेवा इत्यादींचा समावेश होतो.

मजुरीचे सकल किंवा मिश्र मजुरी आणि शुद्ध मजुरी असे दोन प्रकार पडतात.

मिश्र किंवा सकल मजुरी : श्रमिकाला मजुरीसमवेत इतर घटक सेवा पुरविल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मोबदल्यांची एकत्रित बेरीज म्हणजे सकल मजुरी होय. उदा.,

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

श्रमिकाने उत्पादन कार्यात स्वतःच्या मालकीची जमीन वापरली, दर दिवशी प्राप्त होणारी मजुरी महिन्याच्या शेवटी घेतल्यास मिळणारे व्याज आणि मजुराने संघटन कार्य केल्यास त्याबद्दल मिळणारा नफा या सर्वांची एकत्रित बेरीज म्हणजे सकल मजुरी होय.

शुद्ध/निव्वळ मजुरी : मिश्र मजुरीतून श्रमाव्यतिरिक्त पुरविलेल्या विविध घटक सेवांचे मोबदले वजा करता शिल्लक राहणारी रक्कम म्हणजे शुद्ध मजुरी होय.

3.3.1 वेतनाचा (मजुरीचा) आधुनिक सिद्धान्त (Modern Theory of Wages)

अर्थव्यवस्थेत श्रम या उत्पादन घटकाचा मोबदला कसा निर्धारित होतो याविषयी अर्थशास्त्रज्ञांनी वेतनाचे विविध सिद्धान्त मांडले. उदा., वेतनाचा जीवननिर्वाह सिद्धान्त, वेतन निधी सिद्धान्त, वेतनाचा शेष उत्पन्नधारी सिद्धान्त, वेतनाचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त इत्यादी. वेतनाच्या सीमांत उत्पादकता सिद्धान्तात श्रमिकाचे वेतन श्रमिकांच्या मागणीवरून ठरते असे स्पष्ट करून वेतन निश्चितीत श्रमाच्या पुरवठ्याकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले. डॉ. मार्शल या अर्थशास्त्रज्ञाने वेतन निश्चितीवर श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा यांचा समान प्रभाव पडतो. एक उत्पादन घटक म्हणून श्रमाची काही खास . वैशिष्ट्ये असली तरी व्यापक अर्थाने वेतन निश्चिती श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा यातून होते. आधुनिक अर्थशास्त्रांनी वेतन निश्चितीत श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा या दोन्ही घटकांना समान महत्त्व दिले आहे. म्हणून वेतनाच्या आधुनिक सिद्धान्ताला वेतनाचा 'मागणी पुरवठा सिद्धान्त' असे म्हणतात

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, बाजारपेठेत वस्तूचे मूल्य जसे वस्तूच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते. तसेच एका विशिष्ट धंद्यातील विशिष्ट प्रकारच्या श्रमिकांची मजुरी ही श्रमिकांच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते.

विधान : 'ज्याप्रमाणे वस्तूची किंमत वस्तूच्या मागणी पुरवठ्याने ठरते त्याचप्रमाणे श्रमाची मजुरी श्रमिकांच्या मागणी पुरवठ्यानुसार ठरते.'

सिद्धान्ताची गृहीते

1. उद्योगसंस्थाची संख्या जास्त असते.

2. श्रमिक संघटित नसून ते आपल्या श्रमाची विक्री स्वतंत्रपणे करतात.

3. श्रमिकांमध्ये परिपूर्ण गतिक्षमता आढळते.

4. सर्व श्रमिक समान असतात.

5. वस्तू व श्रम बाजारात पूर्ण स्पर्धा असते.

6. सेवायोजक आणि श्रमिकांची चौदा शक्ती समान असते.

वेतनाच्या आधुनिक सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करण्यासाठी श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा या दोन संकल्पना स्वतंत्रपणे समजून घेणे आवश्यक आहे. श्रमाची मागणी

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

"श्रमाची मागणी म्हणजे विविध वेतनदर आणि त्या वेतनदाराला उत्पादक किती श्रमिक घेऊ इच्छितात ती श्रमिकाची संख्या होय."

श्रमिकांची मागणी ही प्रामुख्याने श्रमिकांची उत्पादकता आणि वस्तूंसाठी असणारी मागणी यावर अवलंबून असते. जेव्हा वस्तूकरिता असणारी मागणी वाढते तेव्हा उत्पादन वाढविण्यासाठी श्रमाच्या मागणीतही वाढ होते. अशा रीतीने श्रमाची मागणी अप्रत्यक्ष किंवा पराश्रित मागणी (Derived Demand) असते.

श्रमाच्या मागणीवर परिणाम करणारे घटक

श्रमाची मागणी पुढील प्रमुख घटकांवर अवलंबून असते.

(1) श्रमाद्वारे उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तूंची मागणी : वस्तूच्या मागणीवर श्रम या उत्पादन घटकांची मागणी अवलंबून असते. श्रमिक ज्या वस्तू तयार करतात त्या वस्तूच्या मागणीत वाढ झाल्यास श्रमाच्या मागणीत वाढ होते. श्रमिक ज्या वस्तू उत्पादित करतो त्या वस्तूंची मागणी कमी झाल्यास श्रमाच्या मागणीत घट होते.

(2) इतर उत्पादन घटकांच्या किमती : उत्पादनाचे घटक एकमेकांना पर्यायी असतात. जर श्रमाच्या तुलनेत इतर घटकांच्या किमती कमी असेल तर श्रमाऐवजी इतर घटकांचा वापर वाढून श्रमाच्या मागणीत घट होते. याउलट, इतर उत्पादन घटकांच्या किमतीच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

तुलनेत श्रम हा उत्पादन घटक स्वस्त असल्यास श्रमाचा वापर वाढून श्रमाच्या मागणीत वाढ होते.

(3) उत्पादन तंत्र : उत्पादन तंत्र भांडवलप्रधान आहे की श्रमप्रधान आहे यावर श्रमाची मागणी अवलंबून असते. भांडवलप्रधान तंत्राऐवजी श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर केला जात असेल तर श्रमाच्या मागणीत वाढ होते. याउलट, भांडवलप्रधान तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेल्यास श्रमाच्या मागणीत घट होते.

(4) सीमांत उत्पादकता : श्रमिकांची सीमांत उत्पादकता जास्त व श्रमिकाला दिले जाणारे वेतन कमी असल्यास श्रमाच्या मागणीत वाढ होते. ज्या ठिकाणी सीमांत उत्पादकता मूल्य वेतन होते तेथे श्रमाची मागणी संयोजक थांबवितो. थोडक्यात, प्रमिकाची सीमांत उत्पादकता जास्त व दिले जाणारे वेतन कमी असल्यास श्रमाच्या मागणीत वाढ होते.

(5) वस्तूच्या मागणीची लवचीकता : उत्पादक ज्या वस्तूची निर्मिती करतो त्या वस्तूला असणारी मागणी लवचीक असेल तर उत्पादक त्या वस्तूच्या किमतीत अल्पसा बदल करून वस्तूच्या मागणीत अधिक प्रमाणात बदल करू शकतो. या बदलामुळे वस्तूची मागणी वाढल्यास श्रमाच्या मागणीतही वाढ होते. याउलट, वस्तूची मागणी अलवचीक असल्यास श्रम या उत्पादन घटकाची मागणी अलवचीक राहते. थोडक्यात, वस्तूच्या मागणीच्या लवचीकतेचा परिणाम श्रम या उत्पादन घटकाच्या मागणीवर होतो. श्रमाचा मागणीचा वक्र

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

अल्पकाळात श्रमाच्या मागणीचा वक्र हा वरून खाली डावीकडून उजवीकडे उतरता म्हणजे ऋणात्मक असतो. याचा अर्थ असा की मजुरीत वाढ झाली तर श्रमिकाची मागणी कमी होते आणि मजुरीत घट झाली तर श्रमाची मागणी वाढते.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :



आकृती क्र. 3.8

आकृतीत X अक्षावर श्रमाची मागणी (श्रमिक संख्या) दर्शविली आहे. Y अक्षावर वेतनदर दर्शविला आहे. वेतनदर OP असताना श्रमाची मागणी ON आहे. वेतनाचे दर OP वरून OP_1 पर्यंत कमी झाल्यास श्रमाची मागणी वाढून ON1 नग होते कारण वेतनाचे दर श्रमिकाच्या सीमांत प्राप्ती उत्पादकतेवरून ठरतात. श्रमाच्या मागणीत होणाऱ्या वाढीबरोबर श्रमिकाची सीमांत उत्पादकता घटते. त्यामुळे श्रमिकाला दिले जाणारे वेतन कमी होते. वरील आकृतीत MR हा श्रमाचा मागणीवक्र आहे. या वक्रावरून वेतनदर व श्रमाची मागणी यामध्ये व्यस्त संबंध असतो असे स्पष्ट होते.

श्रमाचा पुरवठा

वेतनदर निश्चितीमध्ये श्रमाच्या मागणीएवढेच श्रमाच्या पुरवठ्याला महत्त्व आहे. श्रमाचा पुरवठा हा प्रामुख्याने श्रमिकांची संख्या आणि ते श्रमिक दिवसाला अथवा आठवड्याला किमी तास काम करू इच्छितात यावर अवलंबून असतो. इतर वस्तूंच्या पुरवठ्यापेक्षा श्रमाचा पुरवठा भिन्न असतो. श्रमाच्या पुरवठ्याचा विचार तीन पातळयांवर केला जातो.

1. **उद्योगसंस्थेच्या पातळीवर श्रमाचा पुरवठा :** पूर्ण स्पर्धेत प्रचलित मजुरीदाराला पाहिजे तेवढे श्रमिक उपलब्ध होत असल्याने उद्योगसंस्थेच्या दृष्टीने श्रमाचा पुरवठा पूर्णपणे लवचीक असतो व श्रमाचा पुरवठा वक्र X अक्षाला समांतर असतो.

2. **उद्योगाच्या पातळीवर श्रमाचा पुरवठा वक्र :** उद्योगाच्या बाबतीत मात्र श्रमाचा पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे वरच्या बाजूला सरकत जाणारा असून तो धनात्मक आकाराचा असतो. एखाद्या उद्योगास जास्तीचा श्रमपुरवठा हवा असेल तर त्यासाठी जास्त मजुरी द्यावी लागते. म्हणजेच उद्योगाच्या पातळीवर श्रमाचा पुरवठा मजुरी दर लवचीक असतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :



आकृती क्र. 3.9 (b) आकृती क्र. 3.9 (a) मध्ये उद्योगसंस्थेचा श्रमाचा पुरवठा वक्र SS असून, OS या वेतनदरास उद्योगसंस्थेला पाहिजे तेवढे श्रमिक उपलब्ध होतात. SS हा उद्योगसंस्थेचा श्रमाचा पुरवठा वक्र पूर्णपणे लवचिक असून तो X अक्षास समांतर आहे.

आकृती क्र. 3.9 (b) मध्ये उद्योगाच्या श्रमाचा पुरवठा SS1 वक्र असून हा श्रमाचा पुरवठा वेतनदरातील वाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वाढत जातो असे या पुरवठा वक्रावरून निदर्शनास येते. SS हा उद्योगाच्या श्रमाचा पुरवठा वक्र लवचिक असून तो डावीकडून उजवीकडे वरच्या दिशेने सरकत जाणारा आहे.

3) संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर श्रमाचा पुरवठा : संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर अल्पकाळात श्रमाचा पुरवठा हा अलवचीक असतो. तर दीर्घकाळात मात्र

श्रमाचा पुरवठा श्रमाच्या मागणीनुसार बदलतो. दीर्घकाळात अर्थव्यवस्थेच्या पातळीवर श्रमाचा पुरवठा लवचीक असतो. अर्थव्यवस्थेच्या पातळीवर असणाऱ्या श्रमाचा पुरवठा खालील घटकांवर अवलंबून असतो.

श्रमाचा पुरवठा निर्धारित करणारे घटक

(1) लोकसंख्या आकारमान व रचना : देशात लोकसंख्येचे प्रमाण जेवढे जास्त तेवढा श्रमाचा पुरवठा जास्त राहतो. याउलट, लोकसंख्या जेवढी कमी तेवढा श्रमाचा पुरवठा कमी असतो. एकूण लोकसंख्येत तरुण वर्गाचे (कर्त्या लोकसंख्येचे) प्रमाण जेवढे जास्त असते तेवढा श्रमाचा पुरवठा जास्त व एकूण लोकसंख्येत बालक व वृद्धांचे प्रमाण जेवढे जास्त तेवढा श्रमाचा पुरवठा कमी असतो,

(2) श्रमिकांची गतिशीलता : श्रमिक जेवढे जास्त गतिशील तेवढा श्रमिकाचा पुरवठा जास्त राहतो. याउलट, श्रमिकांची गतिशीलता जेवढी कमी तेवढा श्रमाचा पुरवठा कमी असतो. श्रमिकांची गतिशीलता श्रमिकांचे कौशल्य, नोकरीतील स्थैर्य, नोकरीत उपलब्ध असलेले आनुषंगिक लाभ इत्यादी घटकांवर अवलंबून असते.

(3) कामाचे तास : श्रमिक जेवढे जास्त तास काम करायला तयार होतील तेवढा श्रमाचा पुरवठा जास्त राहील. याउलट, श्रमिक जेवढे कमी तास काम करायला तयार होतील तेवढा श्रमिकांचा पुरवठा कमी राहतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(4) सामाजिक घटक : रूढी, परंपरा, शिक्षण, काम करण्याची प्रेरणा व निष्ठा इत्यादी घटकांमुळे श्रमाचा पुरवठा ठरतो. रूढी, परंपरा व दैववादाचे प्राबल्य असणाऱ्या ठिकाणी श्रमाचा पुरवठा कमी आढळतो. काम करण्याची प्रेरणा असणाऱ्या व प्रयत्नाला देव मानणाऱ्या समाजात श्रमाचा पुरवठा जास्त आढळतो.

(5) वेतनाचा दर : सामान्यत: वेतनदर वाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वाढत जातो. श्रमिक अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी विश्रांती ऐवजी अधिक काम करणे पसंत करतात त्यामुळे श्रमाचा पुरवठा वाढतो. परंतु काहीवेळा वेतन वाढीमुळे श्रमिकांचे उत्पन्न वाढते. या उत्पन्नवाढीमुळे श्रमिक अधिक काम करण्याऐवजी कमी काम करणे पसंत करतात. त्यामुळे वेतनदर वाढीमुळे श्रमाचा पुरवठा घटण्याची शक्यता असते. तरी पण सामान्यत: श्रमाचा पुरवठा वक्र हा डावीकडून उजवीकडे वर चढत जाणारा म्हणजे धनात्मक असतो.

थोडक्यात, वेतनाचा दर व श्रमाचा पुरवठा यात प्रत्यक्ष संबंध आढळतो. वेतनाच्या दरात वाढ झाली तर श्रमिकांचा पुरवठा जास्त राहील व वेतनाच्या दरात घट झाली तर श्रमिकांचा पुरवठा कमी राहील.

वेतनदर निर्धारण आणि श्रमाच्या मागणी पुरवठ्याचे संतुलन

आधुनिक वेतन सिद्धान्तानुसार पूर्ण स्पर्धेत एखाद्या विशिष्ट उद्योगातील वेतन दीर्घकाळात श्रमाच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :



आकृतीत X अक्षावर श्रमाचा. मागणी पुरवठा दर्शविला आहे. Y अक्षावर वेतनदर दर्शविला आहे. आकृतीत श्रमिकांच्या सर्वसाधारण मागणीचा वक्र DD हा आहे. श्रमिकांचा पुरवठा वक्र SS हा आहे. श्रमाचा मागणी वक्र आणि श्रमाचा पुरवठा वक्र 'E' बिंदूत परस्परांना छेदतात. त्यामुळे 'E' बिंदूला श्रमिकांची मागणी ON आहे व श्रमिकांचा पुरवठा ही ON आहे. 'E' बिंदूत श्रमाची मागणी = श्रमाचा पुरवठा झालेला आहे. त्यामुळे वेतनदर OP हा निश्चित होतो. E बिंदूशिवाय इतर कोणत्याही बिंदूला श्रमिकांची मागणी श्रमिकांचा पुरवठा नसतो म्हणून इतरत्र कोठेही वेतनदर निश्चित होत नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तावरील टीका

वेतनाचा आधुनिक सिद्धान्त वेतनाच्या सीमांत उत्पादकता सिद्धान्तापेक्षा सरस वाटत असला तरी या सिद्धान्तात सांगितल्याप्रमाणे अल्पकाळात वेतनाच्या दरावर

श्रमाच्या मागणी पुरवठ्याचा प्रभाव पडत नाही. तर वेतनाच्या दर निश्चितीत श्रमाचा पुरवठा फारसा प्रभाव पाडू शकत नाही. त्यामुळे वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तात अल्पकाळात श्रमाच्या पुरवठ्यापेक्षा श्रमाची मागणी जास्त प्रभावी आहे. तसेच श्रमिक आपल्या कार्याची किंमत निश्चित करू शकत नाही ही बाब दुर्लक्षित करण्यात आली आहे. या सिद्धान्ताचे विवेचन काही अवास्तव गृहीतांवर आधारलेले आहे. ही गृहीते प्रत्यक्ष व्यवहारात खरी ठरत नाही. वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तावर पुढील टीका केल्या जातात.

(1) पूर्ण स्पर्धा : हा सिद्धान्त पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारित आहे. पूर्ण स्पर्धेत मालक व मजुरांची संख्या खूप मोठी असते. मालक व मजूर संघटित नसतात. श्रमिक पूर्णपणे गतिशील असतात. श्रम हा घटक एकजिनसी असतो. परंतु पूर्ण स्पर्धा ही केवळ एक काल्पनिक स्थिती आहे. प्रत्यक्ष व्यवहारात अपूर्ण स्पर्धेची स्थिती आहे. अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत वेतनाचे दर कसे निश्चित होतात याचे स्पष्टीकरण करण्यात हा सिद्धान्त असमर्थ आहे.

(2) समान सौदाशक्ती : वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तात सेवायोजक व श्रमिक यांची सौदाशक्ती समान असते असे गृहीत मानण्यात आलेले आहे. परंतु हे गृहीत संपूर्णपणे चुकीचे असून श्रमिकांच्या तुलनेत सेवायोजकांची सौदाशक्ती कितीतरी पटीने जास्त असते. त्यामुळे श्रमिकांना किती वेतन अपेक्षित आहे हा मुद्दा गौण ठरतो.

(3) श्रमाच्या मागणी पुरवठ्याचे संतुलन : जेव्हा श्रमाची मागणी ही श्रमाच्या पुरवठ्याच्या तुलनेत बरीच कमी असते तेव्हा श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

यामध्ये मूलभूत स्वरूपाची असमानता दिसून येते, तेव्हा श्रमाची मागणी किंमत आणि श्रमाची पुरवठा किंमत यात संतुलन प्रस्थापित होणे कठीण असते.

(4) श्रमिक व सेवायोजक यांची सापेक्ष स्थिती : श्रमिकांची मागणी करणारे सेवायोजक कामगारांपेक्षा संख्येने अल्प असतात शिवाय ते आर्थिकदृष्ट्या प्रबळ असतात. कामगार मिळविण्यासाठी त्यांच्यामध्ये स्पर्धा नसते. याउलट, श्रमिकवर्ग संख्येने जास्त आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतो रोजगार मिळविण्यासाठी श्रमिकांमध्ये स्पर्धा असते त्यामुळे वेतनाचा दर कमी होण्याची शक्यताच जास्त असते.

(5) श्रमाची उत्पादकता व गतिशीलता : श्रम व भांडवल हे घटक एकमेकांना पर्यायी म्हणून उत्पादनाच्या प्रक्रियेत वापरले जातात. भांडवलाच्या तुलनेत श्रमाची उत्पादकता व गतिशीलता अत्यंत कमी असते. त्यामुळे श्रमाच्या मागणीत वाढ झाल्याने वेतनदरात वाढ होत असल्यास उत्पादक श्रमाऐवजी भांडवलाचा वापर करतील. त्यामुळे श्रमिकांची मागणी घटेल व श्रमिक कमी वेतनदरावर काम करण्यास तयार होतील.

(6) श्रमाची वैशिष्ट्ये : वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तात वेतनदर निश्चितीमध्ये श्रम या मानवनिर्मित उत्पादन घटकांच्या वैशिष्ट्यांचा फारसा विचार केलेला दिसत नाही. श्रमाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे श्रमाला श्रमिकापासून वेगळे करता येत नाही. श्रमिकांचे श्रम नाशवंत असतात. श्रमाचा संचय करता येत नाही. त्यामुळे श्रमिकाला वेतन कितीही असले तरी आपले श्रम ताबडतोब विकणे भाग पडते. कमी वेतनावरही श्रमिक आपल्या श्रमाची विक्री करतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

(7) श्रमिक संघटनाचा प्रभाव : श्रमिक संघटित नसतात. ते आपल्या श्रमाची विक्री स्वतंत्रपणे करतात या गृहीतावर हा सिद्धान्त आधारित आहे. परंतु आज मात्र संघटित क्षेत्रात श्रमिकांच्या संघटना कार्यरत असून वेतन निश्चितीवर त्यांचा प्रभाव पडलेला आहे. सामूहिक सौद्याच्या जोरावर श्रमिक संघटनांनी आपल्या वेतनात भरीव वाढ केलेली आहे. वेतन निश्चितीत श्रमिक संघटनाची भूमिका प्रभावी असूनही या सिद्धान्तात श्रमिक संघटनेच्या प्रभावाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

(8) वेतनदर व श्रमाच्या मागणीत व्यस्त संबंध : श्रमाच्या आधुनिक सिद्धान्तानुसार वेतनदरात वाढ झाल्यास श्रमाच्या मागणीत घट होते परंतु सर्वच श्रमिकांच्या बाबतीत हे तत्त्व लागू होत नाही. कुशल श्रमिक, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ यांची मागणी सतत वाढती असल्याने वेतनदर वाढीबरोबर कुशल श्रमिकांच्या मागणीत घट होत नाही.

(9) श्रमाच्या पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र : श्रमाच्या आधुनिक सिद्धान्तानुसार वेतनदर वाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वाढत जातो. वेतनदर आणि श्रमाचा पुरवठा यात प्रत्यक्ष संबंध आढळतो. परंतु प्रगत किंवा विकसित देशात वेतन पातळीची विशिष्ट मर्यादा गाठल्यानंतर वेतनदरात होणाऱ्या वाढीबरोबर श्रमाचा पुरवठा घटत जातो व श्रमाचा पुरवठा वक्र उजवीकडून डावीकडे वरच्या दिशेने सरकतो. वेतनदर वाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वाढण्याऐवजी घटतो.

वरील टीका वेतनाच्या आधुनिक सिद्धान्तावर केल्यातरी हा सिद्धान्त वेतनाच्या सीमांत उत्पादकता सिद्धान्तापेक्षा सरस असून वेतन निश्चितीत श्रमाच्या मागणी

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

इतकेच श्रमाच्या पुरवठ्याला महत्त्व असते ही महत्त्वाची बाब या सिद्धान्ताने नमूद केलेली आहे. त्यामुळे वेतनदर निश्चितीच्या सिद्धान्ताचे विवेचन विस्तृत झालेले आहे.

3.3.2 श्रमाचा पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र

(Backward Bending Supply Curve of Labour)

श्रमाच्या पुरवठ्याची व्याख्या :

- **"वेतनाचे दर भिन्न असताना विशिष्ट वेळी श्रमिक, विशिष्ट प्रकारच्या श्रमाचा किती तास अथवा किती दिवस पुरवठा करतात त्या तासांची अथवा दिवसांची एकूण संख्या म्हणजे श्रमाचा पुरवठा होय."**

श्रमाचा पुरवठा देशातील लोकसंख्येचे आकारमान व रचना, श्रमिकांची गतिशीलता, वेतन, कार्यक्षमता, रूढी-परंपरा, स्त्री श्रमिकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या सामाजिक व शिक्षणप्रसार, सांस्कृतिक मूल्य यांसारख्या सांस्कृतिक घटकांवर अवलंबून असतो. श्रमाच्या पुरवठ्यावर श्रमिकांच्या काम आणि आराम या विषयीचा दृष्टिकोन या घटकाचा प्रभाव पडतो.

काम व आराम याबाबतचा दृष्टिकोन या घटकांमुळेच श्रमाचा पुरवठा वक्र सुरुवातीला वस्तूच्या पुरवठा वक्राप्रमाणेच डावीकडून खालून-वर सरकत जातो व एका विशिष्ट मर्यादेनंतर मजुरी दरवाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वक्र मागे वळून उजवीकडून

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

डावीकडे वरच्या दिशेने सरकत जातो. यालाच 'श्रमाचा पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र' किंवा श्रमाचा मागे फिरून चढत जाणारा पुरवठा वक्र' असे म्हणतात.

काम आणि आराम यातील निवड या घटकाचा श्रमाच्या पुरवठ्यावर परिणाम होतो. सामान्यतः सुरुवातीला श्रमाचा पुरवठा वक्र अन्य पुरवठा वक्राप्रमाणेच डावीकडून-उजवीकडे वरच्या दिशेने सरकत जातो. सुरुवातीला जेव्हा कामगाराचे वेतन व उत्पन्न कमी असते तेव्हा कामगार आपल्या जास्त गरजांची पूर्ती व्हावी म्हणून फुरसतीचा वेळ उपभोगण्याऐवजी जादा तास काम करण्याचा दृष्टिकोन स्वीकारतो.

वेतनदरात होणाऱ्या वाढीमुळे कामगारांना पूर्वीपेक्षा अधिक तास काम करण्याची इच्छा होते. तसेच कमी वेतन असल्यामुळे जे कामगार काम करण्यास तयार नव्हते किंवा ज्यांची इच्छा नव्हती ते आता काम करण्यास तयार होतात. या दोन कारणांमुळे कामगार कमी आराम व जादा काम करण्याचा दृष्टिकोन स्वीकारतात. या मजुरी दरवाढीच्या परिणामास **'पर्यायिता परिणाम'** असे म्हणतात. वरील दोन कारणांमुळे सुरुवातीला वेतन दरवाढीबरोबर श्रमाचा पुरवठा वक्र अन्य पुरवठा वक्राप्रमाणे डावीकडून-उजवीकडे वरच्या दिशेने सरकतो.

उत्पन्न पातळीची एक विशिष्ट मर्यादा गाठल्यानंतर मात्र श्रमिकाच्या दृष्टिकोनात बदल होतो. वेतन दरवाढीमुळे कामगारांना पुरेसे उत्पन्न प्राप्त होते त्यामुळे कामगारांच्या दृष्टिकोनात बदल होतो. मिळेल तेवढी मजुरी पुरे, त्याहून अधिक नको, त्यापेक्षा आपण जास्त आराम करावा, असा दृष्टिकोन श्रमिक स्वीकारतात यालाच मजुरी दरवाढीचा 'उत्पन्न परिणाम' असे म्हणतात. या ठिकाणी मजुरी दरवाढीच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

पर्यायिता परिणामापेक्षा मजुरी दरवाढीचा उत्पन्न परिणाम जास्त प्रभावी होतो. त्यामुळे जसजसे वेतन वाढत जाते, तसतसा श्रमाचा पुरवठा कमी होतो व श्रमाचा पुरवठा कमी झाल्याने श्रमाचा पुरवठा वक्र उजवीकडून-डावीकडे वरच्या दिशेने सरकत जातो. यालाच **'पाठीमागे झुकणारा श्रमाचा पुरवठा वक्र'** किंवा 'श्रमाचा मागे फिरून चढत जाणारा पुरवठा वक्र' असे म्हणतात. अशा प्रकारे वाढत्या वेतनाचा कामगारांच्या पुरवठ्यावर होणारा परिणाम अत्यंत गुंतागुंतीचा आहे. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की, विशिष्ट मर्यादेपर्यंत श्रमाचा पुरवठा वक्र हा धन असतो किंवा वरच्या दिशेने सरकणारा असतो. त्यानंतर मात्र तो मागे सरकतो.

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण

वेतनदर (दरताशी) (₹)	श्रमाचा पुरवठा (तास)	दर दिवसाला मिळणारे उत्पन्न (₹)
10	4	40
20	5	100
30	6	180
40	7	280
50	8	400
60	7	420
80	6	480

HRM (S1) S.Y.B.A.

वरील उदाहरणात सुरुवातीला वेतन दर तासाला ₹.10 असताना श्रमिक 4 तास काम करतो. वेतनदर वाढून दरताशी ₹ 20 झाल्यास श्रमिक 5 तास काम करतो. या ठिकाणी दर तासाला मिळणाऱ्या वेतनात जसजशी वाढ होते तसतसा श्रमाचा पुरवठा वाढत जातो. परंतु त्यानंतर मजुरी अथवा वेतन जसजसे वाढत जाते म्हणजेच दर तासाला वेतन ₹ 30 होताच श्रमाचा पुरवठा 6 तास होतो. ₹ 40 होताच श्रमाचा पुरवठा 7 तास होतो. ₹ 50 होताच 8 तास होतो. दरताशी वेतन ₹ 50 वरून ₹ 60, ₹ 80 असे वाढत गेल्यास श्रमाचा दर दिवसाचा पुरवठा अनुक्रमे 7 तास, 6 तास असा घटत जातो. या परिस्थितीत श्रमिक अधिक वेळ काम करून जादा वेतन मिळविण्याऐवजी जादा आराम करणे पसंत करतो. म्हणून अशा वेळी श्रमाचा पुरवठा दर्शविणारा वक्र मागे फिरून डावीकडे वरच्या बाजूला चढत जातो. म्हणून या श्रमाच्या पुरवठा वक्राला **'श्रमाचा पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र' किंवा 'श्रमाचा मागे फिरून चढत जाणारा पुरवठा वक्र'** असे म्हणतात.



HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण : वरील आकृती क्र. 3.11 मध्ये X अक्षावर - श्रमाचा पुरवठा तासांमध्ये व Y अक्षावर दर तासाला वेतनदर रूपयांमध्ये दर्शविला आहे. SS, श्रमाचा पुरवठा दर्शविला आहे. वेतन दर दरताशी ₹ 10, 20, 30, 40, 50 वाढत असताना श्रमाचा दररोजचा पुरवठा अनुक्रमे 4, 5, 6, 7 आणि 8 तास असा वाढतो त्यामुळे S बिंदूपासून E बिंदूपर्यंत श्रमाचा पुरवठा वेतन वाढीबरोबर वाढत जातो व श्रमाचा पुरवटा वक्र धन असतो. मात्र वेतनदर दरताशी ₹ 60, 80 असा वाढत गेल्यास श्रमाचा पुरवठा अनुक्रमे 7, 6 तास असा घटत जातो. म्हणजे पूर्वीपेक्षा श्रमाचा पुरवठा कमी होतो. अशा परिस्थितीत श्रमाचा पुरवठा वक्र E बिंदूपासून S1 बिंदूपर्यंत मागे सरकतो व उजवीकडून डावीकडे मागे वळून वरच्या दिशेने चढत जातो म्हणून या श्रमाच्या पुरवठा वक्राला 'पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र' किंवा 'श्रमाचा मागे फिरून जाणारा पुरवठा वक्र' असे

3.4 व्याज : अर्थ, व्याजाचा रोखता पसंती सिद्धान्त, व्याजाचा कर्जाऊ निधी सिद्धान्त (Interest : Meaning, Loanable Fund Theory, Liquidity Preference Theory)

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

व्याज अर्थ (Meaning of Interest)

उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रमानंतर वापरला जाणारा महत्त्वाचा घटक भांडवल हा आहे. भांडवलामुळे उत्पादनाचा वेग व श्रम, भूमी या घटकांची उत्पादकता वाढते. त्यामुळे आधुनिक काळात भांडवलाला उत्पादन प्रक्रियेत अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. भांडवलाचे वस्तुरूप भांडवल आणि मौद्रिक भांडवल असे दोन प्रकार पडतात. उत्पादन

प्रक्रिया सुरू करण्यासाठी मौद्रिक भांडवल आवश्यक असते. जर उत्पादकाकडे मौद्रिक भांडवलाचा तुटवडा असेल तर उत्पादक इतरांकडून परत करण्याच्या अटीवर असे मौद्रिक भांडवल कर्जाऊ घेतो. कर्जाऊ घेतलेल्या पैशाच्या वापराबद्दल भांडवलदाराला दिला जाणारा मोबदला म्हणजे व्याज होय. अर्थशास्त्रज्ञांनी व्याजाच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत. त्यापैकी महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेल्या आहेत -

- **'भांडवलाच्या निधीपासून मिळणारे उत्पन्न म्हणजे व्याज होय." "ऋणदेय निधीच्या उपयोगाबद्दल दिली जाणारी किंमत म्हणजे व्याज होय."**

  - सेलीगमन

- **"भांडवलदाराला मिळणारे उत्पन्न म्हणजे व्याज होय."**

  - मेयर्स प्रा. कार्व्हर

- **"धनकोला ऋणकोने भांडवलाच्या अंगी उत्पादकता हे गुणवैशिष्ट्य असल्यामुळे दिलेला मोबदला म्हणजे व्याज होय. हा मोबदला भांडवलदाराला त्याच्या संयमाबद्दल दिला जातो."** **- नट विकसेल**

- **“एका निश्चित कालावधीकरिता रोखतेच्या कराव्या लागणाऱ्या त्यागाचे बक्षीस म्हणजे व्याज होय.”** **- जे. एम. केन्स**

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

या सर्व व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, भांडवलाच्या वापराबद्दल किंवा भांडवल वापरण्यासाठी मिळावे म्हणून ऋणकोने धनकोला दिलेला मोबदला म्हणजे व्याज आहे. सकल किंवा मिश्र व्याज आणि शुद्ध किंवा निव्वळ व्याज ((Gross and Net Interest)

(1) सकल किंवा मिश्र व्याज (Gross Interest) : कर्जदार भांडवलदाराला जे। व्याज देतो त्याला 'मिश्र व्याज' असे म्हणतात. समजा एखाद्या भांडवलदाराने सावकाराकडून (एका वर्षासाठी ₹ 100 कर्जाऊ घेतले. सावकाराने या कर्जाऊ रकमेवर 16% व्याज आकारले तर ₹ 16 व्याज हे मिश्र व्याज होय, या 16 रुपयांत सावकाराने ₹ 100 जे भांडवलदाराला वापरण्यासाठी दिले त्याच्या मोबदल्यात इतर काही बाबींचा पण मोबदला घेतलेला आहे. त्या मोबदल्याचा समावेश 16 रुपयांत आहे म्हणून त्याला मिश्र व्याज असे म्हणतात. मिश्र व्याज ही व्यापक संकल्पना आहे. मिश्र व्याजात शुद्ध व्याज समाविष्ट असते.

मिश्र व्याजाचे सूत्र :

मिश्र व्याज = शुद्ध व्याज + गैरसोईचा मोबदला + जोखमेचा मोबदला + व्यवस्थापन खर्च

(अ) जोखमीचा विमा : आपल्याजवळील भांडवल कर्जाऊ देताना सावकाराला जोखीम स्वीकारावी लागते. ही जोखीम दोन प्रकारची असते (i) वैयक्तिक जोखीम (ii) व्यावसायिक जोखीम. कर्ज घेणारी व्यक्ती अप्रामाणिक असल्यास कर्ज बुडून सावकाराचे

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

नुकसान होते याला 'वैयक्तिक जोखीम' असे म्हणतात. ज्या व्यवसायाकरिता कर्ज दिले तो व्यवसाय तोट्यात आला तर सावकाराचे बरेच मोठे नुकसान होते. या जोखमीला 'व्यावसायिक जोखीम' असे म्हणतात. ही जोखीम जेवढी जास्त असेल तेवढा मिश्र व्याजाचा दर जास्त राहील. ही जोखीम जेवढी कमी असेल तेवढा मिश्र व्याजाचा दर कमी राहील.

(ब) व्यवस्थापन खर्च : सावकाराला कर्जदाराच्या कर्जाचा हिशेब ठेवावा लागतो. हिशेब ठेवण्यासाठी हिशेबपुस्तकांची खरेदी करावी लागते. काही कर्मचारी ठेवावे लागतात. प्रसंगी न्यायालयात जावे लागते. सावकाराला कर्जदारापासून जे उत्पन्न मिळते त्यात व्यवस्थापन खर्चाचादेखील समावेश असतो.

(क) गैरसोईचा मोबदला : धनको ऋणकोला विशिष्ट कालावधीसाठी कर्जाऊ रक्कम देतो. त्या कालावधीत धनकोला पैशाची गरज असली तरी ती रक्कम परत मिळत नाही. अशा वेळी धनकोची जी गैरसोय होते त्या गैरसोईचा मोबदला मिश्र व्याजात समाविष्ट केला जातो. कर्जाची मुदत जेवढी जास्त तेवढी गैरसोय जास्त. म्हणून गैरसोईचा मोबदला म्हणजे जास्त व्याजदर आकारले जाते. याउलट, कर्जाची मुदत जितकी कमी तेवढा गैरसाईचा मोबदला म्हणजे व्याजदर कमी आकारला जातो.

थोडक्यात, मिश्र व्याजातून जोखीम पत्करण्याचा मोबदला, कर्जाऊ रकमेचा हिशेब ठेवण्याचा मोबदला आणि गैरसोय पत्करण्याचा मोबदला वजा केल्यास धनकोला शुद्ध व्याज मिळते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(2) निव्वळ किंवा शुद्ध व्याज (Net Interest) : भांडवलाच्या उपयोगाबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे शुद्ध व्याज होय. साधारणतः शुद्ध व्याजाचा दर सर्व बाजारात एका विशिष्ट काळात समान असतो. भांडवलाच्या निव्वळ उत्पादकतेकरिता शुद्ध व्याज दिले जाते.

शुद्ध व्याजाचे सूत्र :

शुद्ध व्याज = मिश्र व्याज (जोखमीचा मोबदला + व्यवस्थापन खर्च + गैरसोईचा मोबदला)

मिश्र व्याज ही संकल्पना शुद्ध व्याज या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे. मिश्र व्याजात शुद्ध व्याजाशिवाय वरील तीन घटकांचा समावेश होतो.

व्याजाचा रोखता अभिलाषा किंवा रोकड पसंती (तरलता अधिमान) सिद्धान्त

लॉर्ड जे.एम. केन्स यांनी 1936 साली प्रकाशित केलेल्या 'रोजगारी, व्याज आणि मुद्रा याबाबतचा सर्वसामान्य सिद्धान्त' (The General Theory of Employment, Interest and Money) या ग्रंथात व्याजदराचा रोखता अभिलाषा सिद्धान्त मांडला. केन्सच्या मते, व्याज ही पूर्णपणे मौद्रिक घटना आहे. व्याज पैशासाठी दिले जाते व पैशात दिले जाते असे प्रतिपादन केन्सने व्याजाच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

संदर्भात केले. म्हणून केन्सच्या व्याजदराच्या या सिद्धान्ताला 'मौद्रिक सिद्धान्त' म्हटले जाते.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला रोख पैशाविषयी नैसर्गिक आकर्षण असते. मुद्रा ही अशी रोख संपत्ती आहे की जिचा उपयोग करून कोणतीही हवी ती गरजेची वस्तू तत्काळ मिळविता येते. त्यामुळे समाजातील लोक रोख रक्कम जवळ बाळगतात, यालाच 'रोखतेची अभिलाषा' असे म्हणतात. थोडक्यात, रोख रक्कम जवळ बाळगण्याची तीव्र इच्छा म्हणजे

रोखता अभिलाषा होय. रोख रकमेचे नैसर्गिक आकर्षण कमी करण्यासाठी दिली जाणारी किंमत म्हणजे व्याज होय. लॉर्ड केन्सच्या मते, “विशिष्ट कालावधीसाठी रोखतेचा त्याग करण्याबद्दल देण्यात येणारे बक्षीस किंवा मोबदला म्हणजे व्याज होय.” (Interest is the reward or payment for parting with liquidity for a specified period) केन्सने आपला व्याजदरविषयक सिद्धान्त मांडताना मुद्रेच्या मूल्यसंग्रहण कार्याला विशेष महत्त्व दिलेले आहे.

केन्सच्या मते, व्याजाचा दर रोखता प्राधान्याकरिता असणारी पैशाची मागणी आणि रोखता प्राधान्याकरिता होणारा पैशाचा पुरवठा यांच्या अनुरोधाने ठरतो. ज्या दराला रोखता प्राधान्याकरिता असणारी पैशाची मागणी आणि रोखता प्राधान्याकरिता होणारा पैशाचा पुरवठा समान होतो त्या दराला बाजारातील 'स्थिर व्याजदर' असे म्हणतात. समाजातील लोकांची रोखता अभिलाषा जेवढी जास्त तेवढा व्याजाचा दर

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

जास्त असतो आणि समाजातील लोकांची रोखता अभिलाषा प्रवृत्ती जेवढी कमी तेवढा व्याजाचा दर कमी दिला जातो.

केन्सच्या व्याजदर सिद्धान्ताचा विचार करताना रोखतेकरिता असणारी पैशाची मागणी आणि रोखतेकरिता होणारा पैशाचा पुरवठा या संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे ठरते. रोखतेकरिता असणारी मागणी

पैशामध्ये 100% रोखता हे गुणवैशिष्ट असल्याने समाजातील लोक आपल्याजवळ रोख रक्कम धारण करणे पसंत करतात. केन्सच्या मते, पुढील तीन हेतूंमुळे रोखता प्राधान्याकरिता पैशाची मागणी निर्माण होते.

(1) दैनंदिन व्यवहार किंवा खरेदी अथवा विनिमय हेतू : समाजातील प्रत्येक व्यक्तीला व उत्पादन संस्थेला दैनंदिन व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी रोख रकमेची गरज असते. व्यक्तीला उपभोक्ता म्हणून विविध प्रकारच्या वस्तू खरेदी कराव्या लागतात उदा., भाजीपाला, फळे, प्रवासखर्च, वह्या, पेन इत्यादींवरील खर्च, उत्पादकांनासुद्धा व्यवसाय चालविताना दैनंदिन खर्च करावा लागतो. उदा., कच्चा माल खरेदी, नोकरांचे पगार, वाहतूक खर्च, वीज, इंधनावरील खर्च इत्यादी. अशा प्रकारचे दैनंदिन व्यवहार सहज पार पाडता यावेत. यासाठी उपभोक्ते व उत्पादक आपल्या उत्पन्नातील काही हिस्सा रोख स्वरूपात जवळ बाळगतात. अशा रोख पैशाला केन्सने दैनंदिन व्यवहाराच्या पूर्ततेसाठी असलेली पैशाची मागणी असे म्हटलेले आहे. व्यक्तीची रोख रकमेची मागणी ही व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असते. उत्पन्न जास्त असल्यास रोखतेकरिता रोख पैशाची मागणी जास्त राहील.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

याउलट, उत्पन्न कमी असल्यास रोखतेकरिता रोख पैशाची मागणी कमी राहील. उत्पादन संस्थांची रोख रकमेची मागणी त्यांच्या व्यवसायाच्या आकारावर अवलंबून असते. व्यवसाय जेवढा मोठा तेवढी त्यांची रोख रकमेकरिता असणारी पैशाची मागणी जास्त, व्यवसायाचे आकारमान लहान असेल तर रोख रकमेकरिता असणारी पैशाची मागणी कमी राहील. अशा प्रकारे दैनंदिन व्यवहार हेतूकरिता असणारी रोखतेकरिता मागणी ही अ) उत्पन्न हेतू व (ब) व्यवसाय हेतूवर अवलंबून असते.

(2) तरतुदीचा किंवा खबरदारीचा हेतू (दक्षता हेतू) : भविष्यकाळ हा अनिश्चित असतो. भविष्यकाळात एखादी अनपेक्षित घटना घडल्यास अथवा संकट कोसळल्यास (आजारपण, अपघात, अपंगत्व, वृद्धत्व, अपमृत्यू) या संकटांवर मात करण्यासाठी रोख रकमेची मागणी केली जाते. तसेच भविष्यकाळात काही अपेक्षित गोष्टी साध्य करण्यासाठी (मुला-मुलींचे शिक्षण, लग्नकार्य, घरबांधणी) रोख रकमेची मागणी केली जाते. उद्योगसंस्थांना अपघात, आग, चोरी इत्यादी संकटांना सामोरे जाण्यासाठी वर्तमानकाळात रोख रकमेची तरतूद करावी लागते. भविष्यकाळात संकटांची शक्यता जेवढी जास्त तेवढी तरतुदीच्या हेतूसाठी होणारी मुद्रेची मागणी जास्त असते. तरतुदीच्या हेतूसाठी होणारी मुद्रेची मागणी ही प्रामुख्याने उत्पन्न पातळीवर अवंलबून असते. दैनंदिन व्यवहार हेतू व तरतुदीच्या हेतूकरिता असणारी रोख रकमेची मागणी ही अल्पकाळात सामान्यत: स्थिर असते व या मागणीवर व्याजदराचा फारसा परिणाम होत नाही.

(3) परिकल्पन किंवा सट्टेबाजीचा हेतू : केन्सच्या मते, रोखतेच्या मागणीचा सर्वांत महत्त्वाचा हेतू म्हणजे परिकल्पन हेतू होय. कर्जरोखे किंवा प्रतिभूतींच्या किंमतीत

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

होणाऱ्या चढ-उताराचा फायदा घेण्यासाठी रोख रकमेची केली जाणारी मागणी म्हणजे परिकल्पन होय. केन्सच्या मते, व्याजाच्या दरातील बदलाचा कर्जरोखे किंवा प्रतिभूतींच्या किंमतीशी निश्चित संबंध आहे. जेव्हा व्याजाचा दर जास्त असतो, तेव्हा रोख्यांच्या किंमती कमी असतात व अशा वेळी लोक रोख्यांची खरेदी करतात. म्हणून लोकांची परिकल्पन हेतूसाठी रोख रकमेची मागणी वाढते. जेव्हा व्याजदर कमी होतो तेव्हा रोख्यांच्या किंमती वाढतात. लोक आपल्याजवळील रोखे विकून रोख रक्कम जवळ बाळगतात. अशा वेळी रोखतेची अभिलाषा वाढते. स्वस्त किमतीला रोखे खरेदी करणे व रोख्यांच्या किंमतीत वाढ झाल्यास रोख्यांची विक्री करून भरमसाट नफा मिळविणे हा परिकल्पनमागे हेतू असतो. परिकल्पन हेतूसाठी असणारी मुद्रेची मागणी व्याजदरावर अवलंबून असते. व्याजदर जास्त असेल तर परिकल्पन हेतूसाठी होणारी मुद्रेची मागणी कमी असते. याउलट, व्याजाचा दर कमी असेल तर परिकल्पन हेतूसाठी मुद्रेची मागणी जास्त असते.

केन्सच्या मते, वरील हेतूंकरिता रोख रकमेची मागणी केली जाते. परंतु या तीन हेतूपैकी परिकल्पनाचा हेतू व्याजदरावर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण दैनंदिन व्यवहार हेतू व तरतूद हेतू हे दोन्ही साधारणतः स्थिर असतात. परंतु परिकल्पनाचा हेतू कर्ज देणाऱ्याच्या मानसशास्त्रावर अवलंबून असल्याने तो अत्यंत अनिश्चित असतो.

रोखता अभिलाषा वरील तीन हेतूंवर अवलंबून असते. यापैकी दैनंदिन व्यवहार हेतु आणि तरतुदीच्या हेतूसाठी होणाऱ्या मागणीला केन्सने L1 असे म्हटलेले आहे. तर परिकल्पनाच्या हेतूसाठी होणाऱ्या मुद्रेच्या मागणीला केन्सने L2 असे संबोधले आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

केन्सच्या मते, L1 + L2 म्हणजेच रोखतेची एकूण मागणी होय. एकूण मागणीला केन्सने L असे संबोधले जाते.

रोखतेच्या मागणीचे समीकरण L = L1 + L2

रोखतेचा (मुद्रेचा) पुरवठा

अल्पकाळात दैनंदिन व्यवहार हेतू आणि तरतूद असणारी मुद्रेची मागणी (L.) स्थिर असल्यामुळे परिकल्पन हेतूकरिता होणाऱ्या रोख रकमेचा मागणीचा (L2) मुख्यत्वे व्याजदरावर परिणाम होतो. त्यामुळे अल्पकाळात L2 हाच मुद्रेची मागणी ठरविणारा निर्णायक घटक आहे.

मुद्रेचा पुरवठा म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण उपलब्ध मुद्रा परिमाण होय. मुद्रा दोन प्रकारच्या असतात. (अ) विधिग्राह्य मुद्रा - कागदी चलन आणि नाणी (ब) प्रत्यय मुद्रा - धनादेश, अधिकोष विकर्ष.

विधिग्राह्य मुद्रा हे कायदेशीर चलन असते. हे चलन देशातील सर्व व्यक्ती व संस्था यांना स्वीकारणे बंधनकारक असते. विधिग्राह्य मुद्रेची निर्मिती देशाची मध्यवर्ती बँक करते. विधिग्राह्य मुद्रेला M1 असे संबोधले जाते.

प्रत्यय मुद्रेची निर्मिती व्यापारी बँका करतात. प्रत्यय मुद्रेचे नियंत्रण मध्यवर्ती बँक करते. प्रत्यय मुद्रेला M2 असे संबोधले जाते. मुद्रेचा एकूण पुरवठा M या नावाने

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

ओळखला जातो. म्हणून मुद्रेचा एकूण पुरवठा M म्हणजे M1 + M2 होय. देशातील मुद्रेचा पुरवठा प्रामुख्याने मध्यवर्ती बँकेच्या धोरणावर अवलंबून असतो. अल्पकाळात मध्यवर्ती बँकेचे धोरण स्थिर असते. त्यामुळे अल्पकाळात पैशाचा पुरवठाही स्थिर असतो. अल्पकाळात मुद्रेचा पुरवठा हा व्याजदराशी अलवचीक असतो. व्याजदरातील बदलांचा परिणाम मुद्रेच्या पुरवठ्यावर होत नाही.

व्याजदर निर्धारण : केन्सच्या मते, रोखतेकरिता असणारी मुद्रेची मागणी आणि रोखतेकरिता होणारा मुद्रेचा एकूण पुरवठा यांच्या संतुलनाने व्याजदर निश्चित होतो. अल्पकाळात मुद्रेचा पुरवठा स्थिर असल्याने व्याजदर ठरविण्यात मुद्रेच्या मागणीची भूमिका जास्त महत्त्वाची असते. व्याजदरावर रोखतेकरिता होणाऱ्या मुद्रेच्या मागणीचा प्रभाव पडतो. व्याजाचा दर आणि मुद्रेची मागणी दोहोंमध्ये परस्परविरुद्ध संबंध असतो.

व्याजाच्या दरात वाढ झाल्यास रोखता प्राधान्याकरिता असणाऱ्या पैशाच्या मागणीत घट होते आणि व्याजाच्या दरात घट झाल्यास रोखता प्राधान्याकरिता पैशाची मागणी वाढते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण,



आकृती 3.12

HRM Micro Eco

आकृती क्र. 3.12 मध्ये X अक्षावर मुद्रेची मागणी कोटी रुपयांमध्ये दर्शविली असून Y अक्षावर व्याजाचा दर टक्केवारीत दर्शविला आहे. व्याजाचा दर 4% असताना समाजातील लोक ₹ 50 कोटी मुद्रेची मागणी करतात. व्याजदर वाढून 5% झाल्यास समाजातील लोक ₹ 30 कोटी मुद्रेची मागणी करतात म्हणजेच व्याजाचा दर आणि रोखता प्राधान्याकरिता मुद्रेची मागणी यांच्यात व्यस्त संबंध असतो.

व्याजाच्या दरात वाढ झाल्यास रोखता प्राधान्याकरिता पैशाची मागणी घटते आणि व्याजाच्या दरात घट झाल्यास रोखता प्राधान्याकरिता मुद्रेची मागणी वाढते. आकृतीत LP हा रोखता अभिलाषा वक्र असून तो वरून-खाली डावीकडून उजवीकडे

उतरणारा आहे. व्याजदर 2% असताना मुद्रेच्या मागणीचा वक्र Ox अक्षाला समांतर होतो. व्याजदराची किमान पातळी गाठल्यानंतर समाजातील लोक सर्व उत्पन्न रोख स्वरूपात जवळ बाळगतात, यालाच रोखता सापळा असे म्हणतात. आकृतीत TP हा रोखता सापळा आहे.

व्याजदरनिर्धारण



आकृती क्र. 3.13 मध्ये X अक्षावर रोखतेकरिता मुद्रेची मागणी आणि मुद्रेचा पुरवठा दर्शविला आहे. Y अक्षावर व्याजदर दर्शविला आहे. LP, LP आणि LP2 हे मुद्रेचे मागणी वक्र असून MM हा मुद्रेचा पुरवठा वक्र आहे. केन्सच्या मते, अल्पकाळात मुद्रेचा पुरवठा स्थिर असल्याने मुद्रेचा पुरवठा वक्र Y अक्षाला समांतर असतो. मुद्रेचा मागणी वक्र LP आणि मुद्रेचा पुरवठा वक्र MM परस्परांना E बिंदूत छेदतात व OR

हा व्याजाचा दर निश्चित होतो. मुद्रेची मागणी वाढल्यास रोखता प्राधान्य वक्र वरच्या बाजूला स्थानांतरित होतो व LP1 आकार धारण करतो. त्यामुळे मुद्रेचा मागणी-पुरवठ्याचे संतुलन E बिंदूच्या ठिकाणी होते व व्याजदरात OR1 पर्यंत वाढ होते.

समजा, मुद्रेच्या मागणीत घट झाली तर मुद्रेचा मागणी वक्र मूळ रोखता प्राधान्य वक्राच्या डावीकडे स्थानांतरित होतो व LP2 आकार धारण करतो. त्यामुळे मुद्रेच्या मागणीपुरवठ्याचे संतुलन E2 बिंदूच्या ठिकाणी होतो व व्याजदर R, पर्यंत घटतो. थोडक्यात अल्पकाळात मुद्रेचा पुरवठा स्थिर असताना रोखतेकरिता मुद्रेची मागणी वाढल्यास व्याजदरात वाढ होते आणि रोखतेकरिता मुद्रेची मागणी घटल्यास व्याजदरात घट होते. अशा रीतीने अर्थव्यवस्थेतील व्याजदर रोखतेकरिता मुद्रेच्या मागणीत होणाऱ्या बदलानुसार बदलतो.

केन्सच्या व्याजदराच्या रोखता अभिलाषा सिद्धान्तावरील टीका

केन्स यांनी प्रतिपादन केलेल्या रोखता अभिलाषा सिद्धान्तावर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी टीका केल्या आहेत. त्यातील काही प्रमुख टीका पुढीलप्रमाणे आहेत.

(1) अनिर्णित सिद्धान्त : परंपरागत व्याजदर सिद्धान्ताप्रमाणे केन्सचा सिद्धान्तसुद्धा सिद्धान्त आहे. केन्सच्या व्याजदर सिद्धान्तात मुद्रेच्या मागणीला महत्व दिलेले आहे. परंतु मुद्रेची मागणी उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. उत्पन्नाची पातळी समजल्याशिवाय मुद्रेची मागणी किती राहील हे समजू शकत नाही. हॅन्सनच्या मते, रोखता अभिलाषा सिद्धान्तसुद्धा व्याजदराचे निर्धारण करण्यास अयोग्य ठरला आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(2) रोख पैशाच्या मागणीचे अपूर्ण स्पष्टीकरण : केन्सने रोख पैशाची मागणी दैनंदिन व्यवहार हेतू, तरतुदीचा तू आणि परिकल्पन हेतू या तीन हेतूंमुळेच होते असे नमूद केले. प्रत्यक्षात मात्र या तीन हेतूंशिवाय गैरसोय टाळण्यासाठी, व्यवसाय विस्तार हेतू, सोय किंवा सुविधा हेतू, किमती कमी करण्याचा हेतू इत्यादी हेतूंसाठीसुद्धा रोख पैशाची मागणी केली जाते.

(3) रोखता अभिलाषा संदिग्ध स्वरूपाची : केन्सच्या मते, व्यक्तीला रोखता किंवा व्याज या दोहोंपैकी एकाची निवड करावी लागते. परंतु बचत ठेवीमध्ये केलेली गुंतवणूक व्याजप्रदान करते शिवाय बचत ठेवीतून हवी तेव्हा रक्कम काढता येते. रोखतासुद्धा प्राप्त करता येते. त्यामुळे रोखता किंवा व्याज अशी निवड करावी लागत नाही.

(4) वास्तव घटकांकडे दुर्लक्ष : केन्सने आपल्या सिद्धान्तात व्याज ही मौद्रिक घटना आहे. व्याज पैशाशी संबंधित असून पैशातच दिले जाते यावर भर दिलेला आहे. परंतु वस्तूच्या स्वरूपात कर्ज घेतल्यास व्याज दिले जाते. म्हणजे केन्सने वस्तुगत कर्ज, कालप्राधान्य, प्रतीक्षा, बचत व भांडवलाची उत्पादकता या वास्तव घटकांकडे दुर्लक्ष केलेले आहे.

(5) भांडवलाच्या उत्पादकतेकडे दुर्लक्ष : भांडवली वस्तूंमध्ये उत्पादकता असल्यामुळे रोख मुद्रेची मागणी भांडवली वस्तूत गुंतवणूक करण्यासाठी केली जाते. ही मागणी भांडवलाच्या सीमांत उत्पादकतेवर अवलंबून असते. परंतु या गोष्टीकडे केन्सने दुर्लक्ष केलेले आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(6) पैशाचा पुरवठा स्थिर नसतो : व्याजदराचा सिद्धान्त स्पष्ट करताना केन्स असे गृहीत मानतात की, अल्पकाळात मौद्रिक धोरण स्थिर असल्यामुळे पैशाचा पुरवठा स्थिर असतो. टीकाकारांच्या मते, अल्पकाळात मौद्रिक धोरण स्थिर असले तरी पैशाचा पुरवठा अल्पकाळात ज्या घटकांवर अवलंबून असतो ते घटक बदलते असतात. उदा., पैशाचा भ्रमणवेग, पतपुरवठा त्यामुळे अल्पकाळात पैशाचा पुरवठा स्थिर असतो असे म्हणणे म्हणजे सत्याचा विपर्यास होय.

(7) एकांगी सिद्धान्त : केन्सने आपल्या सिद्धान्तात फक्त मुद्रेच्या मागणीचाच विचार केला. मुद्रेच्या पुरवठ्याचा व्याजदरावरील परिणाम विचारात घेतलेला नाही. म्हणून हा सिद्धान्त एकांगी वाटतो.

(8) दीर्घकाळाचा विचार नाही : या सिद्धान्तात अल्पकाळात व्याजाचा दर कसा ठरतो याचेच विवेचन आहे. व्यक्तीच्या दृष्टीने अल्पकाळ महत्त्वाचा असला तरी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने दीर्घकाळ महत्त्वाचा असतो. त्यामुळे व्याजदर ठरविताना दीर्घकाळाचा विचार व्हायला पाहिजे. या सिद्धान्ताने व्याजदराचे विवेचन करताना दीर्घकाळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.

(9) अति तेजी आणि अति मंदी : केन्सचा व्याजदराचा सिद्धान्त अति तेजी व अति मंदी असताना लागू पडत नाही. कारण तेजीच्या काळात व्याजाचा दर जास्त असताना लोकांची पैशाची मागणी जास्त असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

याउलट मंदीच्या काळात व्याजदर अल्प असूनही पैशाची मागणी अत्यंत कमी असते. या बाबी सिद्धान्ताच्या विरुद्ध आहेत. याचे कारण असे की, तेजीच्या काळात पैशाची मागणी जास्त असते. मंदीच्या काळात पैशाची मागणी कमी असते.

(10) व्याजदर आणि बचत : केन्सने आपल्या सिद्धान्तात बचतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. जर बचत झालीच नाही तर रोखता प्राधान्याकरिता पैशाचा पुरवठा कसा होणार, बचत नसेल तर गुंतवणूक कशी होणार या बाबींचा केन्सने विचार केलेला नाही.

(11) व्याज हे बक्षीस : केन्सच्या मते, व्याजदर म्हणजे रोखता प्राधान्याचा त्याग केल्याबद्दल दिले जाणारे बक्षीस होय. टीकाकारांच्या मते, व्याज हे बक्षीस नसून जर भांडवलाची उत्पादकता शून्य असेल तर कोणीही पैशाची मागणी करणार नाही व व्याज देण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. ही बाब सिद्धान्तात विचारात घेण्यात आलेली नाही.

वरील टीका या सिद्धान्तावर केल्या जात असल्या तरी रोखता हे वेगळे वैशिष्ट्य लक्षात घेऊन केन्सने हा सिद्धान्त मांडला आहे. या सिद्धान्ताने व्याजदर निर्धारणात मौलिक भर घातली.हा सिद्धान्त व्याजदराचा परंपरागत सिद्धान्त व कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्तापेक्षा निश्चितच श्रेष्ठ आहे. पैशाचा पुरवठा कमी-जास्त करून व्याजाचे नियंत्रण करता येणे मध्यवर्ती बँकेला शक्य आहे ही गोष्ट या सिद्धान्ताने स्पष्ट केली आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

(1) व्याजाचा ऋणयोग्य निधी किंवा कर्जाऊ रकमा निधी (Loanable Funds Theory of Interest) : व्याजाचा ऋणयोग्य निधी सिद्धान्त सर्वप्रथम स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ नट विकसेल यांनी मांडला. पुढे हा सिद्धान्त ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ रॉबर्टसन, मोहलिन, मिर्डाल व जेकब वायनर या अर्थशास्त्रज्ञांनी विकसित केला. हा सिद्धान्त रंपरागत व्याजदर सिद्धान्ताचे विकसित रूप आहे. नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी याजदराच्या परंपरागत सिद्धान्तातील दोष दूर करून सुधारित स्वरूपाचा हा सिद्धान्त डला म्हणून या सिद्धान्ताला 'व्याजदराचा नवसनातन सिद्धान्त' असे म्हणतात,

परंपरागत व्याजदर सिद्धान्तात व्याजदर ठरविताना पैशाचा पुरवठा या घटकांचा विचार करताना गुंतवणूक आणि बचत या दोन घटकांना महत्त्व दिलेले होते. नवसनातनवादी ज्यशास्त्रज्ञांनी या सिद्धान्तात वास्तव व चलनी घटकांचा एकत्रित विचार करून पैशाची नागणी व पैशाचा पुरवठा यांचा विस्तृत विचार केलेला आहे. वास्तव घटकांमध्ये प्रतीक्षा, कालप्राधान्य, भांडवलाची उत्पादकता या घटकांचा विचार केलेला आहे. चलनी (मौद्रिक) घटकांमध्ये पैशाची साठवणूक (संग्रहण), पतपैसा या घटकांचा विचार केलेला आहे.

या सिद्धान्तानुसार कर्जाऊ देण्यात येणाऱ्या रकमेच्या उपयोगाची किंमत म्हणजे व्याज होय. या सिद्धान्तानुसार व्याजाचा दर ऋणयोग्य रकमांची मागणी आणि ऋणयोग्य रकमांचा पुरवठा यांच्या संतुलनाने ठरतो. ज्या दराला ऋणयोग्य रकमांची मागणी आणि ऋणयोग्य रकमांचा पुरवठा समान होतो त्या दराला व्याजदर असे म्हणतात.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.

व्याजाच्या ऋणयोग्य निधी सिद्धान्तानुसार व्याजाचा दर कसा ठरतो हे समजण्यासाठी कर्जाऊ रकमेची मागणी आणि कर्जाऊ रकमेचा पुरवठा या दोन संकल्पनानुसार विचार करणे आवश्यक आहे.

कर्जाऊ रकमेची मागणी (Demand for Lonable Funds)

कर्जाऊ रकमेची मागणी पुढील घटकांवर अवलंबून असते.

(1) गुंतवणूक (Investment) : गुंतवणूक म्हणजे भांडवली वस्तू खरेदी करणे, वसामग्री, कच्चा माल, कारखान्यासाठी जागा खरेदी करणे, कारखान्याची इमारत उभारणे त्यादी. उत्पादक भांडवलासाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवल आवश्यक असते. जेव्हा त्पादक स्वतःच्या उत्पन्नातून हा भांडवली खर्च भागवू शकत नाही तेव्हा उत्पादक कर्ज तो व गुंतवणूक करतो. गुंतवणुकीसाठी केली जाणारी कर्जाऊ रकमेची मागणी भांडवलाची मांत लाभक्षमता आणि व्याजाचा दर यांच्यावर अवलंबून असते. भांडवलाची सीमांत समक्षमता जास्त व व्याजाचा दर कमी असेल तर गुंतवणुकीसाठी कर्जाऊ रकमेची मागणी न राहील. याउलट, व्याजाचा दर जास्त व भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी असेल तवणुकीसाठी कर्जाऊ रकमेची मागणी कमी होते. थोडक्यात, व्याजाचा दर जास्त असेल जाऊ रकमेची गुंतवणुकीसाठी मागणी कमी होते. व्याजाचा दर कमी असेल तर तवणुकीसाठी कर्जाऊ रकमेची मागणी जास्त राहते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(2) उपभोग (Consumption) : समाजातील उपभोक्त्यांना आपल्या दनादन उपभोगाबरोबर राहण्यासाठी घर, मोटार, मोटारसायकल, फ्रिज, वॉशिंग मशीन, रंगीत दूरदर्शन संच इत्यादी टिकाऊ वस्तू खरेदी करायच्या असतात. जेव्हा उपभोक्त्याला आपल्या चालू उत्पन्नातून अशा टिकाऊ व किमती वस्तू खरेदी करणे शक्य नसते, अशा वस्तू खरेदी करण्यासाठी उपभोक्ते कर्जाऊ रकमांची मागणी करतात. व्याजाचा दर कमी असल्यास उपभोग कर्जाच्या मागणीत वाढ होते आणि व्याजाचा दर जास्त असल्यास उपभोग कर्जासाठी कर्जाऊ रकमांची मागणी घटते. व्याजाचा दर आणि उपभोगासाठी कर्जाऊ रकमांची मागणी यातील संबंध व्यस्त असतो.

(3) संग्रहण किंवा पैशाची साठवणूक (Hoarding) : संग्रहण म्हणजे स्वतःजवळ रोख स्वरूपात रक्कम बाळगणे होय. आपल्याजवळील रक्कम, भाग, कर्जरोखे यामध्ये गुंतविल्यास गरज असेल तेव्हा पैसे परत मिळविता येत नाही. शिवाय भागामध्ये पैसे गुंतविल्यास तोटा होण्याची शक्यता असते. म्हणून रोख रक्कम जवळ बाळगली जाते. भविष्यकालीन संकटावर मात करण्यासाठी व भविष्यकाळात काही अपेक्षित बाबी साध्य करण्यासाठी रोख स्वरूपात रक्कम जवळ बाळगली जाते. व्याजदर अधिक असेल तर स्वतःजवळ कमी रोख रक्कम ठेवली जाते व कर्ज देण्यासाठी जास्तीत जास्त रोख रक्कम वापरली जाते. याउलट, व्याजाचा दर कमी असला तर रोख रक्कम कर्जाऊ देण्यापेक्षा जवळ बाळगणे पसंत केले जाते. थोडक्यात, संग्रहणासाठी केली जाणारी कर्जाऊ रकमेची मागणी व व्याजाचा दर या दोहोंमध्ये परस्परव्यस्त संबंध आढळतो.

(3) **सरकारची मागणी (Government Demand)** : सरकारला विविध कल्याणकारी योजना (रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य) राबविण्यासाठी

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सार्वजनिक खर्च करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी सरकार विविध मार्गांनी कर्ज उभारते यालाच 'सरकारची कर्जाऊ रकमेची मागणी' असे म्हणतात. व्याजाच्या दरात वाढ झाल्यास सरकारच्या कर्जाऊ रकमेच्या मागणीत घट होते आणि व्याजाच्या दरात घट झाल्यास सरकारच्या कर्जाऊ रकमेच्या मागणीत वाढ होते.



आकृती क्र. 3.14 मध्ये Ox अक्षावर कर्जाऊ रकमेची मागणी तर OY अक्षावर व्याजदर दर्शविलेला आहे. II, CC, HH, GG हे अनुक्रमे गुंतवणूक, उपभोग, संग्रहण आणि सरकारचे मागणी वक्र आहेत. या सर्व वक्रांची आडवी बेरीज केल्यास DD हा कर्जाऊ रकमेचा एकूण मागणी वक्र मिळतो.

थोडक्यात, गुंतवणूक, उपभोग, संग्रहण आणि सार्वजनिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी केलेली कर्जाऊ रकमेची मागणी म्हणजेच अर्थव्यवस्थेतील एकूण कर्जाऊ रकमेची मागणी होय. कर्जाऊ रकमेच्या मागणीचा वक्र ऋण असतो. कारण व्याजाचा दर घटल्यास कर्जाऊ रकमेच्या मागणीत वाढ व व्याजाचा दर वाढल्यास कर्जाऊ रकमेच्या मागणीत घट होते. व्याजाचा दर व कर्जाऊ रकमेची मागणी या दोहोंमध्ये व्यस्त परस्परसंबंध असतो. कर्जाऊ रकमेच्या मागणीचा वक्र वरून-खाली डावीकडून-उजवीकडे उतरणारा असतो.

कर्जाऊ निधीचा पुरवठा (Supply of Lonable Funds)

कर्जाऊ रकमेचा पुरवठा पुढील घटकांवर अवलंबून असतो.

(1) बचत (Savings) : बचत हा कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्याचा महत्त्वाचा घटक आहे. बचत म्हणजे उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम होय. बचत ही व्यक्तिगत आणि संस्थात्मक पातळीवर केली जाते. व्याजाचा दर जास्त असेल तर वाढत्या व्याजदराचा फायदा घेण्यासाठी जास्त बचत केली जाते आणि व्याजाचा दर कमी असेल तर बचतीचे प्रमाण घटते. बचतीतून निर्माण होणाऱ्या कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्याचा वक्र धनात्मक उताराचा असतो.

(2) अ-संग्रहण किंवा अपसंग्रहण (Dishoarding) : भूतकाळात स्वतःजवळ संग्रह करून ठेवलेला पैसा कर्ज देण्यासाठी उपलब्ध करून देणे म्हणजे अपसंग्रहण होय. पैशाची साठवणूक केल्यास तो पैसा निष्क्रिय स्वरूपात पडून राहतो. जर बाजारात

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

व्याजदरात वाढ झाली तर समाजातील व्यक्ती वाढीव व्याजदराचा लाभ घेण्यासाठी साठवणुकीतून पैसा बाहेर काढतात. त्यामुळे कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्यात वाढ होते. व्याजदरात घट झाल्यास संग्रहण वाढून कर्जाऊ रकमेचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे अपसंग्रहणाचा वक्रसुद्धा धनात्मक आकाराचा असतो.

(3) अधिकोष प्रत्यय (Bank Credit) : बँका आपल्या ठेवीतून कर्जाऊ रकमेचा पुरवठा करतात. व्याजदर जास्त असेल तर बँकांद्वारे जास्त प्रमाणात प्रत्ययाचा पुरवठा केला जाईल. याउलट, व्याजाचा दर कमी असेल तर बँकांद्वारे होणारा प्रत्ययाचा पुरवठा कमी राहील. यामुळे बँकांच्या प्रत्ययाद्वारे केल्या जाणाऱ्या कर्जाऊ रकमेचा पुरवठा वक्र हा धनात्मक आकाराचा असतो.

(4) अपगुंतवणूक किंवा निर्गुंतवणूक (Disinvestment) जेव्हा भांडवलाची सीमांत उत्पादकता व्याजदरापेक्षा कमी असते तेव्हा उद्योगसंस्थांना गुंतवणुकीत तोटा येतो. हा तोटा टाळण्यासाठी उद्योगसंस्था स्थिर व चालू भांडवल उद्योगसंस्थेतून अथवा उद्योगातून काढून घेतात यालाच 'अपगुंतवणूक' असे म्हणतात. व्याजदर जास्त असल्यास उद्योजक अपगुंतवणूक करून कर्जाऊ रकमेचा पुरवठा वाढवितात. भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी झाल्यास उद्योजक घसारा निधीची रक्कम नवीन यंत्राच्या :

खरेदीसाठी न वापरता कर्जाऊ देतात. त्यामुळे कर्जाऊ रकमांचा पुरवठासुद्धा वाढतो, म्हणूनच अपगुंतवणुकीचा वक्र धनात्मक आकाराचा आढळतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(5) सरकारी अनुदाने आणि आर्थिक साहाय्य (Government Grants and Subsides) : सरकारला कर, दंड, देणग्या, सरकारी उद्योगातील नफा या मार्गाने उत्पन्न प्राप्त होते. या उत्पन्नाचा काही भाग सरकार उद्योग क्षेत्राला नुकसान भरून काढण्यासाठी अनुदाने, आर्थिक साहाय्य या मार्गाने मदत करते.

व्याजाचा दर उच्च असताना आजारी उद्योग मोठ्या प्रमाणात आर्थिक साहाय्याची मागणी करतात त्यामुळे अनुदाने व आर्थिक साहाय्यात वाढ होऊन कर्जाऊ रकमेचा पुरवठा वाढतो. याउलट, व्याजदर कमी असताना आजारी उद्योग कर्ज घेण्याचे धोरण स्वीकारतात. त्यामुळे अनुदाने व आर्थिक साहाय्य घटून कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्यात घट होते. अनुदाने आणि आर्थिक साहाय्यातून होणारा कर्जाऊ रकमांचा पुरवठा वक्र धनात्मक आकाराचा असतो.



आकृती 3.15

HRM Eco (S1) S.Y.B.A.

थोडक्यात, बचत, अपसंग्रहण, अधिकोष प्रत्यय, अपगुंतवणूक, सरकारी अनुदाने व आर्थिक साहाय्य यासाठी केलेला कर्जाऊ रकमांचा पुरवठा म्हणजेच अर्थव्यवस्थेतील एकूण कर्जाऊ रकमांचा पुरवठा होय. या कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्याचा वक्र धनात्मक आकाराचा असतो. व्याजाच्या दरात वाढ झाल्यास कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्यात वाढ होते. व्याजाच्या दरात घट झाल्यास कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्यातही घट होते. म्हणजेच व्याजाचा दर आणि कर्जाऊ रकमांचा पुरवठा या दोहोंमध्ये प्रत्यक्ष किंवा समप्रमाण संबंध असतो.

कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्याचा वक्र डावीकडून-उजवीकडे वरच्या दिशेने सरकणारा असतो.

कर्जाऊ निधीच्या मागणी-पुरवठ्याचे संतुलन व व्याजदर निश्चिती

कर्जाऊ रकमेकरिता असणारी मागणी आणि कर्जाऊ रकमेचा होणारा पुरवठा यांच्या संतुलनाने व्याजाचा दर निश्चित होतो.

आकृती क्र. 3.16 मध्ये ox अक्षावर कर्जाऊ रकमेचा पुरवठा आणि OY अक्षावर व्याजदर दर्शविलेला आहे. SS, DH, BC, DI आणि GG हे अनुक्रमे बचत, अधिकोष प्रत्यय, अपगुंतवणूक आणि सरकारी अनुदाने/अर्थसाहाय्याचे वक्र आहेत. या सर्व अपसंग्रहण,वक्रांची बेरीज केल्यास SS, हा कर्जाऊ रकमेचा एकूण पुरवठा वक्र मिळतो. कर्जाऊ रकमेकरिता असणारी मागणी आणि कर्जाऊ रकमेचा होणारा पुरवठा यांच्या संतुलनाने व्याजदर ठरतो.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.



आकृती 3.16

वरील आकृती क्र. 3.16 मध्ये X अक्षावर कर्जाऊ रकमेची मागणी व पुरवठा दर्शविला आहे. तर Y अक्षावर व्याजदर दर्शविला आहे. कर्जाऊ रकमेची एकूण मागणी दर्शविणारा DD हा वक्र आहे. DD1 हा कर्जाऊ रकमेचा मागणी वक्र ऋणात्मक आहे. या वक्रावरून असे स्पष्ट होते की, व्याजाचा दर आणि कर्जाऊ रकमेची मागणी यांच्यामध्ये व्यस्त संबंध असतो.

आकृतीमध्ये SS1 हा कर्जाऊ रकमेचा पुरवठा दर्शविणारा वक्र धनात्मक आकाराचा आहे. या वक्रावरून असे स्पष्ट होते की व्याजाचा दर आणि कर्जाऊ रकमेचा पुरवठा यांचा सम वा प्रत्यक्ष स्वरूपाचा संबंध आहे. कर्जाऊ रकमेचा एकूण मागणी वक्र DD आणि कर्जाऊ रकमेचा एकूण पुरवठा वक्र SS1 यांचे संतुलन E बिंदूत होऊन

HRM Micro Eco (S1).

व्याजाचा दर OR हा निर्धारित होतो. येथे कर्जाऊ रकमेची मागणी व कर्जाऊ रकमेचा पुरवठा हे दोन्ही OM म्हणजे समान झालेले आहेत.

व्याजदरनिश्चितीमध्ये कर्जाऊ रकमेची मागणी व कर्जाऊ रकमेचा पुरवठा या दोन्ही बाजूंचे महत्त्व या सिद्धान्ताने स्पष्ट केले. त्यामुळे व्याजदराच्या परंपरागत सिद्धान्तापेक्षा हा सिद्धान्त व्यापक व सरस आहे.

सिद्धान्तावरील टीका किंवा आक्षेप

(1) वास्तविक व मौद्रिक घटकांचे एकत्रीकरण विसंगत : कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्तात वास्तविक व मौद्रिक घटकांचे एकत्रीकरण केलेले आहे. परंतु असे एकत्रीकरण विसंगत वाटते कारण बचत व गुंतवणूक हे प्रवाही घटक आहेत तर संग्रहण व प्रत्यय मुद्रा हे साठा स्वरूपाचे घटक आहेत. प्रवाही व साठा स्वरूपाच्या घटकांचे एकत्रीकरण म्हणजे विसंगत मिश्रण आहे. टीकाकारांच्या मते, वास्तव व चलनी घटकांचा परस्परांशी संबंध जोडणे अयोग्य आहे.

(2) राष्ट्रीय उत्पन्नाची स्थिर पातळी : या सिद्धान्तात राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी स्थिर आहे असे गृहीत मानण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात गुंतवणूक पातळीत बदल झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीत बदल होतो ही बाब या सिद्धान्ताने विचारात घेतलेली नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(3) संग्रहणाची भ्रामक कल्पना : जे. एम. केन्सच्या मते, संग्रहण ही भ्रामक कल्पना आहे. एका व्यक्तीचे संग्रहण म्हणजे दुसऱ्या व्यक्तीचे विसंग्रहण असते. त्यामुळे संग्रहण व विसंग्रहणामुळे पैशाच्या पुरवठ्यात बदल होऊ शकत नाही.

(4) बचत आणि व्याजदर : या सिद्धान्तानुसार बचत व्याजदरावर अवलंबून असते. परंतु बचतीकरिता व्याजदराशिवाय कुटुंबाविषयी प्रेम, जबाबदारीची जाणीव भविष्यकालीन संकटाची चाहूल इत्यादी इतर कारणे असतात. परंतु या बाबींचा विचार सिद्धान्तात करण्यात आला नाही.

(5) अवास्तव गृहीते : पूर्ण स्पर्धा, पूर्ण रोजगार इत्यादी बाबी हा सिद्धान्त गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात अपूर्ण स्पर्धा आणि अपूर्ण रोजगार अस्तित्वात असतो. अपूर्ण स्पर्धेच्या आणि अपूर्ण रोजगारीच्या परिस्थितीत व्याजाचा दर कसा निर्धारित होतो याचे विवेचन देण्यास हा सिद्धान्त असमर्थ आहे.

(6) चक्रापत्तीचा दोष : या सिद्धान्तात व्याजाचा दर कर्जाऊ रकमा निधीवर अवलंबून असतो. कर्जाऊ रकमा निधी बचतीवर अवलंबून असतो. बचत उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. उत्पन्न पातळी गुंतवणुकीवर अवलंबून असते. गुंतवणूक पातळी व्याजदरावर अवलंबून असते व व्याजदर कर्जाऊ रकमा निधीवर अवलंबून असतो.

(7) व्याजदर आणि गुंतवणूक : व्याजदराच्या परंपरांगत सिद्धान्ताप्रमाणे कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्तानुसार गुंतवणूक ही व्याजदराशी ऋण असते. व्याजदरातील बदलाच्या विरुद्ध दिशेने गुंतवणूक बदलते. टीकाकरांच्या मते, गुंतवणूक व्याजदरावर अवलंबून

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

नसते तर ती भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर अवलंबून असते. कारण व्याज हे भांडवलाच्या वापराबद्दल दिला जाणारा मोबदला आहे. भांडवलापासून मिळणारा लाभ वाढता असेल तर व्याजदर वाढत असतानासुद्धा भांडवलाची मागणी वाढते.

(8) अस्थिरता : या सिद्धान्तानुसार कर्जाऊ रकमांची मागणी व पुरवठा समान होऊन व्याजदर ठरतो. प्रत्यक्षात कर्जाऊ रकमेची मागणी ठरविणारे घटक हे कर्जाऊ रकमेचा पुरवठा ठरविणाऱ्या घटकाइतकेच असतीलच असे म्हणता येत नाही. जसे बचतीबरोबर गुतवणूक नसतानाही कर्जाऊ रकमेची मागणी व कर्जाऊ रकमे, 4ठा समान होऊ शकतो. परंतु बचत गुंतवणुकीच्या असमानतेतून अस्थिर परिस्थिती निर्माण होऊ शकते. या बाबींचा विचार या सिद्धान्ताने केलेला नाही.

(9) जुन्या संकल्पनेचा नवीन अवतार : या सिद्धान्तामध्ये चालू बचत या जुन्या शब्दाऐवजी कर्जाऊ रकमा निधी हा नवीन शब्दप्रयोग वापरलेला आहे. त्यामुळे या सिद्धान्तात नवीन असे काहीही नाही. त्यामुळे 'Old wine in new bottle' अशी टीका या सिद्धान्तावर केली जाते. हा सिद्धान्त जुन्या परंपरागत सिद्धान्ताची पुनरावृत्ती आहे.

(10) अनिर्धारित सिद्धान्त : प्रा. हॅन्सन यांच्या मते, परंपरागत व्याजदर सिद्धान्ताप्रमाणेच कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्त अनिर्धारित आहे. कर्जाऊ रकमेचा पुरवठा पभ्न पातळीवर अवलंबून असतो. जोपर्यंत उत्पन्न पातळी किती आहे हे माहीत नसते यंत व्याजदराचे निर्धारण करता येत नाही. उत्पन्न पातळीचे स्पष्टीकरण सिद्धान्तात लेले नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

या सिद्धान्तावर वरील टीका केल्या जात असल्या तरी व्याजदराचा कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्त व्याजदराच्या परंपरागत सिद्धान्तापेक्षा श्रेष्ठ आहे. या सिद्धान्ताने व्याजदराचा परंपरागत सिद्धान्त व केन्सचा रोखता अभिलाषा सिद्धान्त यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या सिद्धान्ताने व्याजदर निर्धारण करताना चलनी व वास्तव घटकांचा एकत्रित विचार केलेला आहे ही या सिद्धान्ताची जमेची बाजू आहे. हा सिद्धान्त व्याजदराचा व्यापक सिद्धान्त म्हणूनही ओळखला जातो.

3.5 नफा : अर्थ, नफ्याचा धोका / जोखीम आणि अनिश्चितता सिद्धान्त, नफ्याचा नवप्रवर्तन सिद्धान्त

(Profit : Meaning, Risk and Uncertainty Theory, Innovation Fund Theory)

नफा अर्थ

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ भांडवलदार संघटक असल्याने नफा व व्याज यात फरक करत नाही. औद्योगिक क्रांतीनंतर संघटक हा उत्पादनाचा महत्त्वाचा घटक ठरला व त्यामुळे वाटणीतील एक स्वतंत्र घटक म्हणून संयोजक या घटकांचा विचार झाला. उत्पादन कार्यात जोखीम स्वीकारल्याबद्दल संयोजकाला राष्ट्रीय उत्पन्नातील मिळणारा हिस्सा म्हणजे नफा होय.

उत्पादनापासून होणाऱ्या एकूण प्राप्तीतून इतर उत्पादन घटकांचे मोबदले वजा जाता शिल्लक राहणारा भाग म्हणजे 'नफा' होय.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

नफा व्याख्या : 'नफा' या संकल्पनेची सर्वमान्य होईल अशी एक व्याख्या देता येत नाही. ही संकल्पना अनेक अर्थाने वापरली जाते.

- **"वस्तूंच्या उत्पादन खर्चावरील किमतीचे आधिक्य म्हणजे नफा होय."**

  जे.बी. क्लार्क

- **'भूतकालीन खर्चावर वर्तमानकालीन उत्पन्नाचे आधिक्य म्हणजे नफा होय."**

  ड्रकर

- **"धोका पत्करल्याबद्दल संघटकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे नफा होय. •**

  एफ. बी. हॉले

- **“अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल संघटकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे नफा होय."**

  प्रा. एफ. एच. नाईट

- **“नवप्रवर्तनाबद्दल संघटकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे नफा होय."**

  जे. ए. शुम्पीटर

नफ्याची वैशिष्ट्ये :

नफ्याच्या वरील व्याख्यांवरून नफ्याची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील. -

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

1. संयोजकाला संयोजन कार्य केल्याबद्दल नफा हा मोबदला दिला जातो.

2. संयोजकाशिवाय इतर घटकांचे मोबदले करारानुसार ठरतात पण नफा हा कराराने ठरत नाही.

3. उत्पादनाच्या इतर घटकांचे मोबदले नेहमी धन असतात तर नफा हा कधी धन तर कधी ऋण असतो.

4. इतर घटकांना मिळणारा मोबदला किंमत या स्वरूपाचा असतो. परंतु संयोजकाला मिळणारा मोबदला किंमत या स्वरूपाचा नसतो.

5. नफा हा इतर घटकांच्या मोबदल्यापेक्षा अधिक अनिश्चित असतो. त्यामुळे नफ्यात फार मोठ्या प्रमाणात चढ-उतार होतात. इतर उत्पादन घटकांच्या मोबदल्यात होणारे बदल अतिशय अल्प व निश्चित असतात.

एकूण किंवा मिश्र नफा आणि शुद्ध किंवा निव्वळ नफा
(Gross Profit and Net Profit)

एकूण किंवा मिश्र नफा (Gross Profit) : एकूण किंवा मिश्र नफ्याला स्थूल किंवा सकल नफा असेही म्हटले जाते. व्यवहारात 'नफा' हा शब्द एकूण किंवा मिश्र नफा या अर्थानेच वापरला जातो. एकूण उत्पन्नातून एकूण प्रकट खर्च किंवा व्यक्त खर्च वजा केल्यानंतर शिल्लक राहिलेले उत्पन्न म्हणजे एकूण नफा होय.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

एकूण नफा काढण्याचे सूत्र : एकूण नफा = एकूण उत्पन्न - प्रकट खर्च

एकूण उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण : संघटकाने 1000 नगांचे उत्पादन इतर शदन घटकांच्या मदतीने केले. प्रत्येक वस्तूची किंमत ₹ 10 आहे. त्यामुळे एकूण उत्पन्न 10,000 येते. समजा संयोजकाने मजुराच्या वेतनासाठी ₹ 1000, भांडवलावरील याजासाठी ₹ 1000, इमारत भाडे ₹ 1000 व कच्च्या मालाच्या खरेदीसाठी ₹ 1000 खर्च कल्यास एकूण उत्पादन खर्च ₹ 4000 होईल व संयोजकाला मिळणारा मिश्र नफा 10,000 4000 = 6000 रुपये होईल.

शुद्ध किंवा निव्वळ नफा (Net Profit) : एकूण नफ्यातून अप्रकट खर्च किंवा व्यक्त खर्च वजा केल्यानंतर शिल्लक राहिलेले उत्पन्न म्हणजे शुद्ध किंवा निव्वळ नफा होय. निव्वळ नफा फक्त संयोजकाला मिळतो. अव्यक्त खर्चाचे घटक

(1) भूमीचे भाडे : संयोजकाने उत्पादन कार्यात स्वतःच्या मालकीची जागा जापरल्यास एकूण नफ्यात या भूमीवर मिळू शकणाऱ्या भाडे समावेश करावा. कारण संयोजकाने ही भूमी दुसऱ्यांना भाडेतत्त्वावर दिली असती तर त्याला भाडे मिळाले असते.

(2) भांडवलावरील व्याज : जर संघटकाने स्वतःचे भांडवल उद्योगात गुंतविले तर एकूण नफ्यात व्याज समाविष्ट होते. जर संघटकाने हेच भांडवल भांडवलदाराकडून कर्ज हणून घेतले तर त्याला व्याज द्यावे लागले असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(3) व्यवस्थापनाचे वेतन : जर संघटकाने स्वतः संयोजन/समन्वय व यवस्थापनाचे कार्य केले तर एकूण नफ्यात व्यवस्थापनाच्या वेतनांचा समावेश होतो. त्याने होच कामे व्यवस्थापकाकडून करून घेतली असती तर त्याला वेतन द्यावे लागले असते. .

(4) घसारा खर्च : उत्पादन करीत असताना यंत्राची झीज होते. संयंत्र काही काळांने निकामी होते. एकूण नफ्यात घसारा खर्च समाविष्ट असतो.

(5) विमा हप्ते : आग, अपघात, चोरी इत्यादी अपेक्षित जोखमींचा विमा काढता येतो. विमा हप्त्यांची रक्कम उद्योगसंस्था विमा कंपनीला देते, विमा हप्त्यांची रक्कम एकूण तफ्यात समाविष्ट असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

शुद्ध नफा काढण्याचे सूत्र

शुद्ध नफा = एकूण नफा - खंड + व्याज + व्यवस्थापकाचे वेतन + घसारा + विमा हप्ते

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण : संघटकाला 1000 वस्तूंची निर्मिती ल्यानंतर ₹ 10,000 उत्पन्न प्राप्त झाले व त्या उत्पन्नातून प्रकट खर्च ₹ 4000 वजाकेल्यानंतर एकूण नफा ₹ 6000 झाला. संयोजकाने स्वतः जागा वापरल्याबद्दल ₹ 1000 मोबदला, व्यवस्थापन कार्याबद्दल ₹ 1000 मोबदला, स्वतःचे भांडवल वापरल्याबद्दल ₹ 1000 मोबदला, घसारा खर्च ₹ 500 व विमा हप्ते ₹ 500 स्वतः घेतल्यास संघटकाला निव्वळ

नफा 6000 - 4000 2000 रुपये होईल. थोडक्यात, संयोजकाला व्यक्तिगत कर्तृत्वाचा मोबदला म्हणून शुद्ध नफा प्राप्त होतो.

नफ्याचे सिद्धान्त

(1) एफ. एच. नाईट यांचा नफ्याच्या जोखीम आणि अनिश्चितता वहन F.H. Knights Risk and Uncertainty Bearing Theory of Profits

(अ) नफ्याचा जोखीम सिद्धान्त Riechod (The Risk Theory of Profit)

प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा. एफ. बी. हॉले यांनी 1907 साली (Enterprise and Productive Process) या सुप्रसिद्ध ग्रंथातून नफ्याचा जोखीम किंवा धोका पत्करण्याचा सिद्धान्त मांडला. उद्योगात जोखीम पत्करणे हेच संयोजकाचे मुख्य कार्य असते याबद्दल संयोजकाला नफ्याच्या स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. हॉलेच्या मते, उत्पादनाच्या प्रक्रियेत भूमी, श्रम व भांडवल हे घटक निव्वळ मदतनीस असतात तर संयोजकाला उत्पादनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. प्रा. हॉले यांच्या मते, नफा हे संयोजकाला इतर उत्पादन घटकांचे मोबदले दिल्यानंतर शिल्लक राहणारे उत्पन्न (Residual Income) होय. नफा हा जोखीम पत्करण्याचा मोबदला असतो. नफा हा व्यवस्थापनाचा मोबदला नसून धोका पत्करल्याबद्दल किंवा जोखीम स्वीकारल्याबद्दल मिळणारा मोबदला असतो. संयोजक जोखीम स्वीकारून उत्पादन घटकांना त्यांचे मोबदले देऊन जास्तीत जास्त उत्पन्न कसे शिल्लक राहील यासाठी प्रयत्न करतो. नफा हा

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

गतिशीलतेतून किंवा बदलांमुळे निर्माण होत नसून बदलांमुळे उत्पादन कार्यात जो धोका निर्माण होतो तो संयोजक पत्करतो त्याबद्दल संयोजकाला नफा हा मोबदला मिळतो.

उत्पादनाचे कितीही यशस्वीपणे नियोजन केले तरी उत्पादनाच्या यशाबद्दल 100% खात्री देता येत नाही, म्हणजे संयोजक एक प्रकारे जुगारच खेळतो. आधुनिक युगात संयोजक भविष्यकालीन मागणीचा आगाऊ अंदाज करून वस्तूचे उत्पादन करतो. संयोजकाचे मागणी, उत्पादन, व्यय आणि किंमत याबाबतचे आगाऊ अंदाज बरोबर ठरल्यास त्याला नफा प्राप्त होतो. त्याचे आगाऊ अंदाज चुकल्यास भविष्यकाळात उत्पादित वस्तू विकल्या जाणार नाही व त्याला नुकसान सहन करावे लागेल. अशा कोणत्याही वस्तूच्या उत्पादन कार्यात जोखीम असते. ही जोखीम संयोजक पत्करतो व उत्पादन करण्याचा निर्णय घेतो. म्हणूनच जोखीम पत्करणे हे संयोजकाचे एक विशेष कार्य आहे. ही जोखीम पत्करल्याबद्दल संयोजकाला मिळणारा मोबदला म्हणजे नफा होय. प्रत्येक संयोजकाला काही अंशी कमी-जास्त प्रमाणात धोक चकाराव लागतो. त्याउन करीत नाना निर्माण होणाऱ्या विशिष्ट परिस्थितीत ते धोकं लंकरण्याचं नलब्ध निय सर्व जबाबदारी संयोजकावर पडले. संयोजक के उत्पादन क्टक एकत्रित करो. अन्यापन करणे. देखरेख करणे एवढीच न्यादित जबाबदारी घेत नह नर उत्पादन कार्यात अनेक धोके पत्करणे हे संयोजकाचे महत्वाचे कार्य आहे. या वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा बना हान संयोजकाला प्राप्त होणारे उत्पन्न म्हणजे नफा होय.

पाच कारणांमुळे संयोजकाला धोका पत्करावा लागतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(1) विपणनविषयक जोखीम : जेवढे उत्पादन केले तेवढ्या वस्तूची विक्री झाली नई. तर किती नुकसान होईल हे विचारात घेऊन संयोजक धोका पत्करतो.

(2) लोकांच्या आवडीनिवडीत बदल : उत्पादित केलेल्या वस्तूबाबत लोक भवडनिवड, फॅशनमध्ये बदल झाला व त्यामुळे उत्पादित वस्तूची मागणी घटल्यास हमाच्या नुकसानीची जोखीम संयोजक स्वीकारतो.

(3) वाहतुकीविषयी अडचण : वाहतुकीतील अडचणीमुळे उत्पादित माल ग्राहकापर्यंत जहचला नाही तर होणारे नुकसान संयोजकाला सहन करावे लागते.

(4) यंत्रसामग्री बिघाड : उत्पादनाची प्रक्रिया चालू असताना यंत्रात बिघाड झाला ॐ यंत्र निरुपयोगी झाले तर उत्पादनात खंड पडून संयोजकाला नुकसान सहन करके लागते. झीज झालेल्या यंत्राच्या प्रतिस्थापनाची तरतूद करावी लागते.

(5) उत्पादन तंत्र व पद्धतीत बदल : जर उत्पादन तंत्रात किंवा उत्पादन पद्धतीत योजकाने बदल केला तर यंत्रसामग्रीत पूर्वी केलेली गुंतवणूक वाया जाते ते यंत्र निरुपयोगी ठरते. त्यामुळे संयोजकाला नुकसान सहन करावे लागते.

वरील पाचही प्रकारचे धोके अप्रिय व त्रासदायक असतात. ते धोके टाळण्यास किंवा या धोक्याचे आव्हान स्वीकारण्यास संयोजकाला काहीतरी मोबदला मिळाला पाहिजे अन्यया असे अप्रिय धोके संयोजक पत्करायला तयार होत नाही. म्हणजे संयोजकाला धोके करल्याबद्दल मोबदला मिळाला पाहिजे. प्रा. हॉले यांच्या मते, असे

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

धोका पत्करण्याचा बदला म्हणजेच नफा होय. संयोजक धोका पत्करतो म्हणून त्याला नफा मिळतो. त्याला मिळाला नाही, तर संयोजक धोका पत्करणार नाही. त्यामुळे धोका पत्करण्यासाठी योजकाने तयार व्हावे म्हणून नफ्याची प्रेरणा आवश्यक असते.

उद्योगधंद्यांत धोक्यांचे प्रमाण कमी-जास्त असते त्यामुळे सर्व संयोजकांना मिळणारा लासुद्धा सारखा नसतो. ज्या उद्योगात जोखमीचे प्रमाण जास्त असते त्या उद्योगात प्रमाणसुद्धा जास्त असते. याउलट, जोखमीचे प्रमाण जेवढे कमी तेवढे नफ्याचे माणही कमी असते. उत्पादन कार्यात मोठी जोखीम असेल तर अशा उद्योगात प्रवेश करण्याचे धाडस फारच थोडे संयोजक करतात. त्यामुळे अशा उद्योगात संयोजकांची कमी राहून त्यांना नफ्याचा मोठा हिस्सा प्राप्त होतो. अशा रीतीने नफ्याचा संबंध जोखमीच्या प्रमाणाशी निगडित आहे. डॉ. मार्शल यांनी या सिद्धान्ताचे समर्थन केले त्यामुळे या सिद्धान्ताची लोकप्रियता वाढली.

सिद्धान्तावरील टीका किंवा आक्षेप

नफ्याच्या इतर सिद्धान्ताप्रमाणे प्रा. हॉले यांच्या नफ्याच्या सिद्धान्तावर पुढीलप्रमाणे टीका करण्यात आल्या आहेत.

(1) जोखमीचा अर्थ स्पष्ट केला नाही : प्रा. एफ. एच.नाईट यांच्या मते, जोखमीचे दोन प्रकार पडतात.

(अ) विमायोग्य जोखीम किंवा अपेक्षित जोखीम

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

(ब) विमा न काढता येणारी जोखीम किंवा अनपेक्षित जोखीम

नाईट यांच्या मते, विमायोग्य जोखीम विमा काढून टाळता येते. परंतु विमा न काढता येणाऱ्या जोखमींचा मोबदला म्हणजे नफा होय. नाईट यांच्या मते, नफा हा धोका पत्करण्याचा मोबदला नसून अनिश्चितता स्वीकारण्याचा मोबदला आहे.

(2) जोखीम टाळण्याचा मोबदला : प्रा. कार्व्हर यांच्या मते, नफा हा जोखीम स्वीकारल्याबद्दलचा मोबदला नसून जोखीम टाळण्याचा मोबदला आहे. जो संयोजक जोखीम स्वीकारतो आणि ती जोखीम प्रभावीपणे टाळतो त्याला नफा हा मोबदला मिळतो. याउलट, जो संयोजक जोखीम स्वीकारतो पण टाळू शकत नाही त्याला तोटा होतो. प्रा. कार्व्हरच्या मते, जोखीम स्वीकारल्याबद्दल नफा मिळत नाही. तर जोखीम टाळल्याबद्दल नफा हा मोबदला मिळतो.

(3) संयोजकाची इतर कार्ये : या सिद्धान्तात जोखीम स्वीकारणे या संयोजकाच्या एकाच कार्यावर लक्ष केंद्रित केलेले असून इतर कार्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. उदा., घटकांची जुळवाजुळव करणे, संघटन, विक्रीचे व्यवस्थापन, उत्पादन पद्धतीत बदल करणे.

(4) नफ्याचे मापन : उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रम, भूमी भांडवल, व्यवस्थापन, वाहतूक खर्च, कच्चा माल, इत्यादी घटकांचा मोबदला किंमत या स्वरूपाचा असतो परंतु अमुक धोक्यामुळे नेमका किती नफा झाला याचे मापन करता येत नाही. हा

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(5) नवप्रवर्तन आणि नफा : प्रा. जे. ए. शुम्पीटर यांच्या मते, नफा अर्थव्यवस्थेत जी नवप्रवर्तने होत असतात त्यातून उद्भवतो. कारण अशा नवप्रवर्तनातून उत्पादन खर्च कमी होतो व संयोजकाला जास्तीचे उत्पन्न मिळून नफा प्राप्त होतो.

वप्रवर्तन हे नफ्याच्या निर्मितीचे महत्त्वाचे कारण असून त्या कारणांचा साधा उल्लेखही या सिदान्तात आढळत नाही.

(6) संयोजकाची कर्तबगारी : नफ्याच्या भाटक सिद्धान्तानुसार संयोजकांमध्ये कर्तबगारीच्या दृष्टीने भिन्नता असते. जास्त कर्तबगार संयोजकाला जास्त नफा तर कमी कर्तबगार संयोजकाला कमी नफा प्राप्त होतो. याचा अर्थ नफा हा संयोजकाच्या कर्तबगारी । भिन्नतेमुळे मिळतो. त्यामुळे संयोजक जोखीम स्वीकारतो म्हणून नफ्याची निर्मिती होत

(7) अपूर्ण सिद्धान्त : प्रा. हॉले यांचा जोखीम सिद्धान्त अपूर्ण आहे. कारण या सिद्धान्तात नफ्याच्या फक्त एकाच घटकांचा विचार केला आहे. इतर घटकांमुळेसुद्धा नफा मिळतो. त्या घटकांकडे सिद्धान्तात पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले आहे.

नफ्याचा अनिश्चितता वहन सिद्धान्त
(The Uncertainty Bearing Theory of Profit)

प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ एफ.एच.नाईट यांनी सन 1921 मध्ये आपल्या Risks, Uncertainty and Profit या सुप्रसिद्ध ग्रंथातून नफ्याचा अनिश्चितता वहन सिद्धान्त प्रा. हॉले यांच्या नफ्याच्या जोखीम सिद्धान्तातील दोष टाळून मांडला. प्रा.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

नाईट यांच्या मते, प्रा. हॉले यांचा नफ्याचा जोखीम- विषयक सिद्धान्त नफ्याचे पूर्णपणे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. प्रा. नाईट यांच्या मते, धोका पत्करणे हे संयोजकाचे मुख्य कार्य नाही धोका पत्करल्याबद्दलचा मोबदला म्हणजे नफा नाही, तर अनिश्चितता स्वीकारणे हे संयोजकाचे मुख्य कार्य आहे. अनिश्चितता स्वीकारल्याबद्दलचा मोबदला म्हणजे नफा होय. प्रा. हॉलेच्या सिद्धान्तातील 'जोखीम' या मध्यवर्ती कल्पनेवरच प्रा. नाईट यांचा नफ्याचा सिद्धान्त आधारलेला आहे.

प्रा. नाईट यांच्या उत्पादनातील सर्व प्रकारच्या जोखमींना संघटक स्विकारत नाही तर तो फक्त अनिश्चित जोखीम स्विकारतो. ही अनिश्चित जोखीम स्वीकारल्याबद्दल संयोजकाला नफा प्राप्त होतो. प्रा. नाईट यांच्या मते, जोखमीचे किंवा धोक्याचे दोन प्रकार पडतात.

(1) अपेक्षित जोखीम किंवा विमायोग्य जोखीम (Insurable Risk) : ज्या जोखमीविषयी आगाऊ अंदाज बांधता येतो तसेच ज्या जोखमीचे संख्यात्मक मापन करता येते. या जोखमीपासून होणाऱ्या नुकसानीचा विमा काढता येतो, अशा जोखमींना विमायोग्य जोखीम असे म्हणतात. अशा जोखमीपासून किंवा धोक्यापासून संघटकाला स्वतःचे व उद्योगधंद्याचे संरक्षण करता येते. विमायोग्य जोखमीचे दोन प्रकार पडतात.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(अ) निसर्गनिर्मित जोखीम : भूकंप, महापूर, आग, वादळ आणि अपघात इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे उद्योगाचे बरेच नुकसान होते. हे नुकसान होऊ नये यासाठी संयोजक निसर्गनिर्मित जोखमींचा विमा काढतो व ही जोखीम विमा कंपन्यांवर ढकलतो.

(ब) मानवनिर्मित जोखीम : चोरी, लूटमार, दरोडा, अफरातफर, जाळपोळ यांसारख्या विघातक व विध्वंसक कारवायांमुळे संयोजकाला नुकसान सहन करावे लागते. परंतु मानवनिर्मित जोखमींचा विमा उतरवून संयोजक होणारे नुकसान टाळू शकतो.

अशा प्रकारे विमायोग्य जोखमीमुळे कोणत्याही प्रकारची अनिश्चितता निर्माण होत नाही. म्हणून विमायोग्य जोखमीमुळे नफा प्राप्त होत नाही असे प्रा. नाईट यांचे मत आहे.

(2) अनपेक्षित किंवा विमायोग्य नसणारी जोखीम (Non Insurable Risks) : आजच्या गतिमान युगात भविष्यकाळात होणारे बदल अनाकलनीय असतात. या बदलाचे आगाऊ अंदाज करता येत नाही. या बदलामुळे होणाऱ्या जोखमीचे संख्यात्मक मापन करता येत नाही. या जोखमीची पूर्वकल्पना नसते व या जोखमींचा विमा उतरविता येत नाही म्हणून या जोखमींना विमायोग्य नसणारी जोखीम असे म्हणतात. अनपेक्षित जोखीम स्वीकारणे म्हणजे अनिश्चितता होय आणि अशी अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल संयोजकाला मिळणारा मोबदला म्हणजे नफा होय. अनपेक्षित जोखमीचे पुढील प्रकार पडतात.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(अ) मागणीतील बदलांमुळे निर्माण होणारी जोखीम : लोकसंख्येतील बदल, लोकांच्या आवडीनिवडीतील बदल, रूढी, परंपरा आणि फॅशन बदल यामुळे जर वस्तूच्या मागणीत घट झाली तर त्यामुळे होणाऱ्या नुकसानीचा विमा उतरविता येत नाही.

(ब) तांत्रिक जोखीम : काही उद्योगसंस्था नवीन उत्पादन तंत्राचा अवलंब करतात त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च घटतो जर इतर उद्योगसंस्थांना हे नवीन उत्पादन तंत्र वापरता आले नाही तर त्यांच्या वस्तूची मागणी कमी होऊन त्यांचे नुकसान होते.

(क) व्यापारचक्रविषयक जोखीम : देशात मंदीची लाट आल्यास लोकांच्या क्रयशक्तीत घट होते, उपभोग घटतो व त्यामुळे वस्तूंच्या मागणीत घट होऊन संयोजकाचे नुकसान होते.

(ड) स्पर्धेमुळे निर्माण होणारी जोखीम : बाजारपेठेतील स्पर्धकांना पराभूत करण्यासाठी स्वस्त किमतीला नवीन उद्योगसंस्थांनी वस्तूची विक्री केली तर विद्यमान उद्योगसंस्थांच्या वस्तूंची मागणी कमी होते व त्यांना नुकसान सहन करावे लागते. या जोखमीचा विमा काढता येत नाही. ही जोखीम संयोजकच स्वीकारतो.

(आ) सरकारी हस्तक्षेपामुळे निर्माण होणारी जोखीम : सरकारने करविषयक धोरणाद्वारे वस्तूंच्या किमतीत वाढ केली किंवा काही वस्तूंची किंमत ठरवून दिल्यास उद्योगसंस्थेचा नफा कमी होतो त्यामुळे होणाऱ्या नुकसानीचा विमा उतरविता येत नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

ई) युद्धामुळे निर्माण होणारी जोखीम : युद्धामुळे निर्यात बंद झाल्यास किंवा कच्च्या लाची आयात बंद झाल्यास उद्योगसंस्थांचे उत्पन्न घटून नुकसान होते या नुकसानीचाही केला उतरविता येत नाही.

वरील सर्व अनपेक्षित जोखमींना प्रा. नाईट यांनी अनिश्चितता असे म्हटले आहे. अशा आवमींचा कोणतीही विमा कंपनी विमा उतरू शकत नाही. वरील प्रकारच्या जोखीमुळे माया नुकसानीचे आकडेशास्त्राच्या आधारे अचूक मापन करता येत नाही. या अनपेक्षित माखनी संयोजकाला स्वीकाराव्या लागतात. संयोजक अशा अनपेक्षित जोखमींना किंवा निश्चिततेला तोंड देत असतो म्हणून संयोजकाला नफा हा मोबदला मिळतो. ही अनिश्चितता जेवढी जास्त तेवढा जास्त नफा उद्योगधंद्यात होत असतो. अशा प्रकारे नफा ह जोखमीचा मोबदला नसून उद्योगात येणाऱ्या अनिश्चिततेचा मोबदला आहे.

थोडक्यात, प्रा. नाईट यांच्या मते, नफ्याचा संबंध अपेक्षित जोखमीशी नसून अनपेक्षित जोखमीशी आहे. अनपेक्षित जोखीम म्हणजेच अनिश्चितता होय आणि अशी अनिश्चितता फक्त संयोजकच स्वीकारतो. अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल संयोजकाला नफा हा मोबदला प्राप्त होतो. हा सिद्धान्त वास्तवाशी जवळचा असून जेथे हॉलेचा सिद्धान्त संपतो तेथून पुढे नाईटच्या सिद्धान्ताची सुरुवात होते.

सिद्धान्तावरील टीका किंवा आक्षेप

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

प्रा. नाईट यांच्या नफ्याच्या अनिश्चितता सिद्धान्तावर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी टीका केलेल्या आहेत. त्यातील काही टीका पुढीलप्रमाणे आहेत.

(1) अनिश्चिततेचा मोबदला म्हणजे नफा : नफा हा अनिश्चिततेतून उद्भवतो असे म्हणणे बरोबर नाही. कारण नफा हा एका घटकाचे फल नसून विविध घटकांचा तो परिणाम आहे. संयोजक केवळ अनिश्चितता स्वीकारण्याचे काम करतो असे नाही. उत्पादनाचे धोरण आखणे, उत्पादन घटकांचे एकत्रीकरण करणे, संघटन करणे, वस्तूंची विक्री करणे इत्यादी अनेक कामे संयोजकाला करावी लागतात. त्यामुळे नफा केवळ अनिश्चिततेचा मोबदला असतो असे म्हणणे बरोबर नाही.

(2) अनिश्चितता उत्पादनाचा स्वतंत्र घटक : नफा हा अनिश्चिततेचा मोबदला मानला तर अनिश्चितता हा श्रम, भांडवल, भूमी याप्रमाणेच उत्पादनाचा एक स्वतंत्र घटक मानावा लागेल. टीकाकारांच्या मते, अनिश्चितता हा उत्पादनाचा स्वतंत्र घटक होऊ शकत नाही.

(3) भांडवलदार आणि भागधारक : संयुक्त भांडवली संस्थेत उद्योगसंस्थांना भागधारक भांडवल पुरवितात. संयोजक व्यवस्थापनाचे कार्य करतो. भागधारकांना जर भांडवल पुरविताना नुकसान होत असेल तर भांडवलाचा पुरवठा करणार नाही. त्यामुळे संयोजकापेक्षा उद्योगसंस्थेला भांडवल पुरविणारे भांडवलदार किंवा भागधारक हे सुद्धा एक प्रकारची अनिश्चितता स्वीकारत असतात. ही बाब सिद्धान्तात विचारात घेतलेली नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(4) नवप्रवर्तन आणि नफा : प्रा. नाईटच्या सिद्धान्तावर टीका करताना प्रा. जे.ए. शुम्पीटर असे म्हणतात की, उद्योगात अनिश्चितता असते म्हणून नफा मिळत नाही, तर नवप्रवर्तनातून संयोजकाला नफा होतो.

(5) एकाधिकारी नफा : या सिद्धान्तात एकाधिकारी नफ्याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. जर एखाद्या उद्योगसंस्थेची मक्तेदारी प्रस्थापित झाली तर अनिश्चितता कमी होते व एकाधिकारी पेढीला स्पर्धात्मक पेढीपेक्षा जास्त नफा प्राप्त होतो. याचे स्पष्टीकरण हा सिद्धान्त देऊ शकत नाही.

(6) नफा हे शेष उत्पन्न : उत्पादनाचे श्रम, भूमी, भांडवल व संयोजक हे चार घटक आहेत. श्रम, भूमी, भांडवल या तीन घटकांना मजुरी, खंड, व्याज हे घटक मोबदले दिल्यानंतर विक्रीयोग्य उत्पन्नाचा शिल्लक राहणारा भाग हा नफा असतो. म्हणजेच नफा हे शेष उत्पन्न असते. ही बाब या सिद्धान्ताने विचारात घेतलेली नाही.

(7) अनिश्चितता आणि तोटा : संयोजक अनिश्चितता स्वीकारीत असल्यामुळे त्याला नेहमीच नफा मिळाला पाहिजे. परंतु अनिश्चितता स्वीकारूनसुद्धा काही वेळेला संयोजकाला तोटा होऊ शकतो. तोटा का होतो याची कारणमीमांसा हा सिद्धान्त देत नाही. सिद्धान्तात अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल संयोजकाला

(8) नफ्याचे मापन : अनिश्चिततेचे कोणत्याही भौतिक स्वरूपात मापन करता येत नाही. तसेच अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल किती नफा प्राप्त होईल हे निश्चितपणे समजू

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

शकत नाही. अपेक्षित नफ्याचा अंदाज करूनच संयोजक गुंतवणुकीचा निर्णय घेतो या बाबीकडे सिद्धान्तात दुर्लक्ष करण्यात आले आहे.

(9) नफ्याचा दर : या सिद्धान्ताने नफा का निर्माण होतो याची कारणमीमांसा दिलेली आहे. परंतु नफ्याच्या दराविषयी काहीही सांगितले नाही.

(10) नफ्याच्या इतर कारणांकडे दुर्लक्ष : अपूर्ण स्पर्धा, नवीन उद्योगसंस्थांच्या प्रवेशाला बंदी, आकस्मिक लाभ इत्यादी अनेक कारणे नफा निर्माण करतात त्यामुळे अनिश्चितता हे नफानिर्मितीचे एक कारण आहे एकमेव कारण नाही.

प्रा. नाईट यांच्या नफ्याच्या अनिश्चितता सिद्धान्तावर वरील टीका करण्यात येत असल्या तरी या सिद्धान्तात दोष कमी व गुण जास्त आहेत. हा सिद्धान्त नफ्याचे समाधानकारक स्पष्टीकरण देतो. त्यामुळेच नफाविषयक सिद्धान्तात या सिद्धान्ताचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

शुम्पीटरचा नफ्याचा-नवप्रवर्तन किंवा नवोन्मेष सिद्धान्त

Innovation Theory of Profit

जर्मन अर्थशास्त्रज्ञ प्रा. जे. ए. शुम्पीटर यांनी त्यांच्या "Theory of Soonomic Development" या ग्रंथात नफ्याचा नवप्रवर्तन सिद्धान्त मांडला. . शुम्पीटर हे प्रा. जे.बी. क्लार्क यांच्या नफ्याच्या गतिमानता सिद्धान्ताशी सहमत आहेत, लेमानतेमुळे नफा मिळतो हे शुम्पीटर यांना मान्य आहे. शुम्पीटरच्या मते, नफा उत्पादन उलीत होणाऱ्या नवप्रवर्तनामुळे निर्माण होतो; नफा हे नवप्रवर्तनाचे पारितोषिक होय, व्यवस्थेत नवप्रवर्तन घडवून आणणे हे संयोजकाचे कार्य असते. त्याच्या या कार्याचा मोबदला म्हणून संयोजकास नफा मिळतो.

नवप्रवर्तनाचा अर्थ (Meaning of Innovation) : उत्पादन व्यय कमी करण्याच्या दृष्टीने उत्पादन प्रक्रियेत जे बदल करण्यात येतात त्यांना 'नवप्रवर्तन' असे म्हणतात. नवप्रवर्तन म्हणजे नवीन शोध किंवा नवीन कल्पना नाही तर नवप्रवर्तन म्हणजे बीन कल्पनांचा किंवा नवीन शोधाचा व्यावहारिकदृष्ट्या प्रत्यक्ष वापर करणे होय. आजच्या पर्धात्मक युगात संशोधक वेगवेगळे शोध लावतात. उदा., नवीन यंत्राचा शोध, नवीन उत्पादन प्रक्रियेचा शोध. त्या शोधामुळे नवीन वस्तू किंवा वस्तूचा आकृतिबंध उदयाला बतो. संशोधकाकडे व्यापारी दृष्टिकोन व आर्थिक पाठबळ नसते त्यामुळे संशोधक आपला रोध किंवा शोध वापरण्याचा हक्क संयोजकांना विकतात. संयोजक व्यापारी वृत्तीने व पैशांच्या पाठबळाने प्रत्यक्ष व्यवहारात या शोधाचा उपयोग करतात. यामुळे नवप्रवर्तन

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

घडून येते. नवप्रवर्तनामुळे संयोजकाला नफा प्राप्त होतो. स्थितिशील अर्थव्यवस्थेत नवप्रवर्तने वापरात आणली जात नाही. म्हणून स्थितिशील अर्थव्यवस्थेत नफा निर्माण होत नाही. थोडक्यात, नवप्रवर्तन म्हणजे असे काहीही की ज्यामुळे वस्तूचा उत्पादन खर्च कमी होतो आणि वस्तूची विक्री वाढते. परिणामतः उत्पादन व्यय आणि वस्तूची विक्री किंमत यातील अंतर वाढून नफा निर्माण होतो.

नवप्रवर्तनाचे प्रकार किंवा मार्ग : शुम्पीटरच्या मते, नवप्रवर्तन ही पाच प्रकारची असतात.

(1) नवीन वस्तूची निर्मिती : शुम्पीटरच्या मते, अर्थव्यवस्थेत नवीन शोध लागत असतात. त्यातून असा एखादा शोध लागतो की, त्यामुळे नवीन वस्तू उदयाला येते. उदा., शोधातून दूरदर्शन, दूरध्वनी, रेडिओ, धुलाई यंत्र इत्यादी अनेक वस्तू उदयाला आल्या. अशा प्रकारची एखादी वस्तू जेव्हा संयोजक बाजारात आणतो तेव्हा तिच्या नावीन्यातून त्या नवीन वस्तूला मोठी मागणी निर्माण होते. त्यामुळे त्या वस्तूच्या किमतीत वाढ होऊन संयोजकाला भरपूर नफा मिळतो.

(2) नवीन उत्पादन तंत्र : संयोजकाने उत्पादनाचे नवीन तंत्र किंवा उत्पादनाच्या नवीन पद्धतीचा वापर केल्यास उत्पादन खर्चात घट होऊन संयोजकाला नफा प्राप्त होतो.

(3) नवीन कच्च्या मालाचा शोध : संयोजकाने प्रचलित कच्च्या मालाऐवजी नवीन प्रकारच्या कच्च्या मालाचा वापर केल्यास कच्च्या मालावरील खर्चात कपात होते व

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

उत्पादन खर्चात घट होऊन संयोजकाच्या नफ्यात वाढ होते. उदा., कापड उत्पादनात कापसाबरोबर रेशीमाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

(4) नवीन बाजारपेठांचा शोध : आकर्षक पॅकिंग, जाहिरातीचे नवीन तंत्र वापरून उत्पादक वस्तूची विक्री अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत करून आपला नफा वाढवितो.

(5) व्यवस्थापनातील शोध : उद्योगसंस्थांच्या वाढत्या आकारमानामुळे व्यवस्थापनाचे महत्त्व वाढत आहे. संयोजकाने नवीन व्यवस्थापन तंत्राचा वापर केल्यास उत्पादन खर्चात घट होऊ शकते. त्यामुळे संयोजकाला नफा प्राप्त होतो.

अशा रीतीने शुम्पीटर यांनी नवप्रवर्तन या संकल्पनेचा उपयोग व्यापक अर्थाने केला. नवप्रवर्तनामुळे अर्थव्यवस्थेत बदल घडून येतात आणि किंमत व उत्पादन खर्चातील तफावत वाढून नफ्याची निर्मिती होते.

नवप्रवर्तनामुळे संयोजकाला प्राप्त होणारा नफा स्थायी स्वरूपाचा नसतो तर तात्पुरता किंवा अस्थायी असतो. दीर्घकाळात हा नफा नष्ट होतो. नवप्रवर्तन ही सातत्य असणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे नवप्रवर्तनाने नफा निर्माण होतो. नवप्रवर्तनातील गुप्तता संपल्यास नफा नाहीसा होतो व पुनप्रवर्तनामुळे नफ्याची पुनर्निर्मिती होते. उदा., एखाद्या संयोजकाने नवीन शोधाचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करून नवीन वस्तू बाजारात विकायला आणली तर त्या वस्तूची मागणी एकदम वाढते. त्या वस्तूच्या किमतीत वाढ होऊन नवीन वस्तूचे उत्पादन करणाऱ्या संयोजकाला नफा मिळायला

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सुरुवात होते. सुरुवातीला फक्त या संयोजकालाच असा नफा मिळतो व त्या वस्तूच्या निर्मितीबाबत त्या संयोजकाची मक्तेदारी निर्माण होते. स्पर्धात्मक युगात इतर संयोजक पहिल्या संयोजकाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात व तशाच प्रकारची वस्तू निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रयत्नात जर इतर संयोजक यशस्वी झाले तर नवप्रवर्तनातील गुप्तता नष्ट होते व इतर संयोजकांनाही नफा मिळू लागतो. पहिल्या संयोजकाला मिळणारा नफा कमी होतो कालांतराने तो नष्ट होतो. पुन्हा संशोधक नवीन शोध लावतात. संयोजक या नवीन शोधांचा व्यापारी दृष्टिकोनातून प्रत्यक्ष वापर करतात. नवप्रवर्तन करणाऱ्या संयोजकाला पुन्हा नफा प्राप्त होतो व नफ्याचा प्रवाह सतत सुरू राहतो यातूनच देशाची आर्थिक प्रगती होते; जुन्या वस्तू इतिहासजमा होऊन नवीन वस्तू उदयाला येतात ही प्रक्रिया सतत चालू राहते. थोडक्यात, शुम्पीटरच्या मते नवप्रवर्तन करणाऱ्या संयोजकालाच अर्थव्यवस्थेत नफा प्राप्त होतो. हा नफा भांडवलामुळे प्राप्त होत नाही तर संयोजकाच्या कृतीमुळे प्राप्त होतो.

नफ्याच्या प्रेरणेने संयोजक नवप्रवर्तन करतो म्हणजेच नवप्रवर्तनासाठी नफ्याची प्रेरणा आवश्यक असते. त्यामुळे नफा हे नवप्रवर्तनाचे उगमस्थान आहे व नवप्रवर्तनामुळे संयोजकाला नफा प्राप्त होतो, म्हणजेच नफा हा नवप्रवर्ताचा परिणाम आहे. नवप्रवर्तन फक्त संयोजकच करतो. नवप्रवर्तन केल्याबद्दल संयोजकाला नफा हा मोबदला मिळतो.

सिद्धान्तावरील टीका किंवा आक्षेप : या सिद्धान्तावर टीकाकारांनी पुढील टीका केलेल्या आहेत.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(1) जोखमीचा मोबदला : शुम्पीटरच्या मते, जोखीम स्वीकारणे हे भांडवलदाराचे कार्य आहे. हॉले यांच्या मते, नफा म्हणजे जोखीम पत्करल्यावर दिला जाणारा मोबदला होय. जोखीम पत्करणे हे संयोजकाचे मुख्य कार्य आहे. शुम्पीटर यांनी संघटकाच्या जोखीम पत्करण्याच्या कार्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

(2) अनिश्चिततेकडे दुर्लक्ष : प्रा. एफ.एच. नाईट यांच्या मते, अनिश्चितता हा नफा मिळवून देणारा एक गतिमान घटक आहे. ज्या जोखमींचा विमा उतरविता येत नाही अशा जोखमी अनिश्चितता निर्माण करतात. अनिश्चितता स्वीकारल्याबद्दल संयोजकाला नफा हा मोबदला प्राप्त होतो. परंतु शुम्पीटरने आपल्या सिद्धान्तात अनिश्चिततेचा विचार केलेला नाही.

(3) इतर घटकांकडे दुर्लक्ष : नफा हा केवळ नवप्रवर्तनाचा परिणाम नाही तर नफा अनेक कारणांमुळे निर्माण होतो जसे अर्थव्यवस्थेची गतिमानता, संघटकाचे कौशल्य व चातुर्य या घटकांचा विचार शुम्पीटरने आपल्या सिद्धान्तात केलेला नाही.

(4) संघटकाची इतर कार्ये : शुम्पीटर यांनी संयोजकाच्या उत्पादन पद्धतीत बदल घडवून आणणे म्हणजेच नवप्रवर्तन करणे या एकाच कार्यावर भर दिलेला आहे. परंतु संयोजक नवप्रवर्तन हे एकमेव कार्य पार पाडत नाही, तर उत्पादन घटकांची जुळवाजुळव करणे, संघटन करणे, व्यवस्थापन करणे इत्यादी अनेक कार्य पार पाडतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(5) नवप्रवर्तन न करता नफा : या सिद्धान्तानुसार नवप्रवर्तन केले तरच संयोजकाला नफा मिळतो. परंतु हे मत चुकीचे असून काही वेळा उद्योगसंस्थांना उत्पादन पद्धती व संघटन पद्धतीत बदल न करता वर्षानुवर्षे नफा मिळत राहतो.

(6) तोटा : शुम्पीटर नफ्याच्या नवप्रवर्तन सिद्धान्तात असाधारण व साधारण नफा का मिळतो याचे विवेचन करतात पण नवप्रवर्तन करूनही काही उद्योगसंस्थांना तोटा सहन करावा लागतो याचे स्पष्टीकरण देत नाही.

(7) मक्तेदारी नफा : जर सरकारने किंवा कायद्यानुसार एखाद्या संयोजकाने एखाद्या वस्तूच्या निर्मितीचे पेटंट प्राप्त केले तर त्या वस्तूच्या निर्मितीमुळे प्राप्त होणारा नफा नवप्रवर्तन नफा राहणार नाही तर मक्तेदारीत नफा राहील.

(8) संयोजकाची कुशलता किंवा पात्रता : फक्त नवप्रवर्तन केले म्हणजे नफा मिळतो असे नाही, तर संयोजकाला उत्पादन घटकांचे एकत्रीकरण करणे, उत्पादनाविषयी निर्णय घेणे इत्यादी कार्ये करावी लागतात. ही कार्ये पार पाडण्यासाठी संयोजकाजवळ एक विशिष्ट प्रकारची पात्रता असणे आवश्यक असते. ही बाब शुम्पीटरने आपल्या सिद्धान्तात विचारात घेतलेली नाही.

प्रा. शुम्पीटरच्या सिद्धान्तावर वरीलप्रमाणे टीका झाली असली तरी शुद्ध नफानिर्मितीचे नवप्रवर्तन हे एक महत्त्वाचे कारण आहे ही प्रमुख बाब या सिद्धान्ताने स्पष्ट केलेली आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

*** खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. सीमांत उत्पादकतेची व्याख्या द्या.

2. खंडाची व्याख्या द्या.

3. बदली उत्पन्न म्हणजे काय ?

4. आभास खंडाची व्याख्या द्या.

5. खंड आणि आभास खंड यातील दोन फरक सांगा.

6. मजुरीची व्याख्या द्या.

7. श्रमाच्या पुरवठ्याची व्याख्या द्या.

8. तरलता प्राधान्य म्हणजे काय ?

9. कर्जाऊ रकमा निधीची मागणी म्हणजे काय ?

10. नफ्याची व्याख्या द्या.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

11. तरलता सापळा म्हणजे काय ?

12. नवप्रवर्तनाची व्याख्या द्या.

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

1.सीमांत उत्पादकतेचे प्रकार स्पष्ट करा,

2.बदली उत्पन्नाची संकल्पना स्पष्ट करा.

3.नफ्याचा जोखीम सिद्धान्त स्पष्ट करा.

3. खंडाचा आधुनिक सिद्धान्त स्पष्ट करा.

5. नफ्याचा नवप्रवर्तन सिद्धान्त स्पष्ट करा.

6. आभास खंडाची संकल्पना स्पष्ट करा.

खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

1. श्रमाचा पाठीमागे झुकणारा पुरवठा वक्र ही संकल्पना स्पष्ट करा.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.

2. रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धान्ताचे टीकात्मक परीक्षण करा.

3. आधुनिक खंड सिद्धान्ताची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

4. कर्जाऊ रकमा निधीचा पुरवठा ही संकल्पना स्पष्ट करा.

5.खंडाचा आधुनिक सिद्धान्त स्पष्ट करा.

6. विभाजनाच्या सीमांत उत्पादकता सिद्धान्ताचे टीकात्मक परीक्षण करा.

7. व्याजाचा केन्सचा रोखता पसंती सिद्धान्त स्पष्ट करा.

8. व्याजाचा कर्जाऊ रकमा निधी सिद्धान्त स्पष्ट करा.

9. नफ्याचा धोका आणि अनिश्चितता सिद्धान्ताचे टीकात्मक परीक्षण करा.

10. नफ्याचा नवप्रवर्तन/नवोन्मेष सिद्धान्त स्पष्ट करा.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

संदर्भसूची

1. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) अथर्व प्रकाशन,डॉ.आर.जी.आघाव,डॉ.टि.जी.गिते,प्रा.आर.डी.जाधवर.2013.

2. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म)निराली प्रकाशन,डॉ.डी.जी.उशीर,डॉ.आर.के.दातीर,एस.आर.जावळे,श्रीमतीबी.डी.पाटील,डॉ.जी.आर.पिंपळे, प्रथमावृत्ती, जुलै 2019.
3. सूक्ष्म अर्थशास्त्र(अर्थशास्त्र स्पेशल पेपर 1)डॉ. डी.जी उशीर, डॉ.एस. आर. जावळे ,डॉ. एच.डी आव्हाड ,डॉ. डी .बी. पवार ,निराली प्रकाशन, (सेमिस्टर 3) प्रथमावृत्ती ,जुलै 2020.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.